# माणूस

शनिवार । ८ जानेवारी १९७७ । साठ पैसे


एक चांगले चरित्रबीज
निव्वळ मांसाच्या चिखलात
जिरून गेले.......

मीरा आणि मेरेलिन
यांचे गुणावगुण घेऊन
घडलेले-घडवलेले
कमला दास नामक
एका कवयित्रीचे जीवन !

□

माझी गोष्ट
एन्ते कथा
माय स्टोरी

पृष्ठ : २२

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक बत्तिसावा
८ जानेवारी १९७७
मूल्य : साठ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◻
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
◻


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
◻


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◻
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◻
दूरध्वनी : ४३४५९
◻


# रोटरॅक्शन' ७६

अनिल काळे, ग्रामायन

पुण्यात नुकतेच पार पडलेले रोटरॅक्शन' ७६ हे युवकांचे श्रमदान–शिबिर अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण होते. २९ डिसेंबर ते १ जानेवारी या काळात पुण्याच्या रोटरॅक्ट क्लबने आयोजित केलेल्या या शिबिरास भारताच्या सर्व राज्यांतून चारशेहून अधिक रोटरॅक्ट प्रतिनिधी आले होते. रोटरी क्लब्स् आणि त्यांच्या पालकत्वाने चालणारे युवकांचे रोटरॅक्ट क्लब्स् यांच्या कामाचे नेहमीचे स्वरूप लक्षात घेतले तर त्याही दृष्टीने या शिबिराचे वेगळेपण उठून दिसणारे होते.

सिंहगडच्या पायथ्याशी असलेले खानापूर आणि आळंदीजवळचे आनंदग्राम या दोन ठिकाणी दोन दिवस रोज सकाळी चार तास श्रमदान हा या शिबिरातील एक प्रमुख कार्यक्रम होता. आणि म्हणूनच 'ग्रामायन'चा कार्यकर्ता या नात्याने या शिबिरात मला विशेष रस वाटला. या निमित्ताने ग्रामीण विकासाच्या कामाचे स्वरूप काय असते आणि त्यांचे महत्त्व काय आहे याची जाणीव या तरुणांना झाली. या स्वरूपाचा लोकांच्यात जाऊन, लोकांच्या सहभागाने करावयाचा कार्यक्रम रोटरॅक्टने प्रथमच आखला होता. एरवी रोटरॅक्ट सदस्यांनी रक्तदान करणे किंवा रस्ते व वाहने यांची रंगरंगोटी करणे किंवा मोफत आरोग्य–तपासणी करणे हे कार्यक्रम तसे एकतर्फी स्वरूपाचे असतात.

खानापूर येथे डॉ. गोपाळराव मोडक आणि त्यांचे 'सह्याद्री विकास मंडळ' गेली अनेक वर्षे खानापूर व परिसरातील खेड्यांच्या विकासाचे काम सातत्याने करीत आहेत. 'ग्रामायन'ने रोटरॅक्टच्या तरुण कार्यकर्त्यांची व डॉ. मोडक यांची गाठ घालून दिली. प्राथमिक बैठका–पाहण्या झाल्या. त्यानंतर या तरुणांनी प्रशंसनीय अशा पूर्वनियोजनाने श्रमदानाचा एक चांगला कार्यक्रम आखून तो यशस्वी करून दाखवला. मणेरवाडी ते खानापूर हा दीड मैलाचा कच्चा रस्ता दर वर्षीच्या पावसाळ्यात चिखल-पाण्यात हरवून जात असे. आता रोटरॅक्टच्या तरुणांनी या रस्त्यातून बेबंदपणे वाहणाऱ्या पावसाच्या पाण्याला ठिकठिकाणी सिमेंट पाईप्स् टाकून व बांध घालून वाटा करून दिल्या आहेत. त्यामुळे वाडीच्या लोकांना खानापूरकडे नेणारी वाट पावसाळ्यातही शाबूत राहील अशी आशा आहे. या वर्षीच्या जोरदार पावसाने फुटलेल्या काही छोट्या शेतकऱ्यांच्या शेतांच्या तालीही श्रमदानाने दुरुस्त करण्यात आल्या आहेत. तसेच आरोग्य केंद्राचे डिझाईन तयार करून त्याचा पाया खणण्याच्या कामाची सुरुवातही या तरुणांनी करून दिली आहे.

आनंदग्राम हे कुष्ठरोगी पुनर्वसन केंद्र आहे. श्रीमती इंदुताई पटवर्धन या १९६५ पासून हे केंद्र चालवीत आहेत. या ठिकाणी रोटरॅक्टच्या तरुणांनी केंद्राच्या शेतजमिनी-पैकी टेकडीच्या उतारावर असलेली काही जमीन मशागत-योग्य करण्याचे व तिचे बंडिंग करण्याचे काम केले.

कुदळी, फावडी आणि पहारी या आयुधांशी रोटरॅक्टच्या बहुतेक तरुणांचा कधीही संबंध आलेला नाही. तरीही या युवक, युवतींनी अतिशय उत्साहाने आणि मनापासून श्रम करून ठरवलेली कामे पूर्ण केली. डॉ. गोपाळराव मोडक व इंदुताई पटवर्धन या दोघांनीही त्यांच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. डॉ. मोडक म्हणाले, 'शहरातील शिकलेली मुले मोठ्या संख्येने आपल्या गावात येऊन ही कामे करतात ही गोष्ट माझ्या गावकऱ्यांना निश्चितच प्रेरणा देणारी आहे. मुलांना हा एक नवा अनुभव असल्याने त्यातून खूप काही शिकता आले. त्याचबरोबर गावकऱ्यांनाही नियोजनबद्ध रीतीने एखादे काम कसे करावे याचे एक प्रात्यक्षिक

पाहायला मिळाले.

दोन दिवस खेड्यात श्रमदान केल्यानंतर तिसऱ्या दिवशी पुण्यात जंगलीमहाराज रस्त्यावर पुणे पोलिसांच्या सहकार्याने वहातूक-चिन्हे रंगविण्याचे काम तरुणांनी केले. त्याशिवाय नागरिकांना रक्तदान करण्याचे आवाहन करून ब्लड बँकेसाठी रक्त गोळा करण्याचेही काम करण्यात आले.

डॉ. वि. म. दांडेकर आणि रोटेरिअन श्री. सोली पावरी या दोन तज्ञ व्यक्तींची भाषणे आणि त्यानंतर गटचर्चा हा शिबिरातील वैचारिक कार्यक्रमाचा भाग होता. कमी बोलणे, अधिक काम हे ठीक असले तरी समाजातील कोणत्या घटकासाठी काम करावयाचे याचा तरुणांनी विचार करावा; सध्याच्या परिस्थितीत तरुणांनी अधिक बोलले पाहिजे, अधिक विचार केला पाहिजे. आधी औद्योगिक विकास की आधी शेती-विकास हा प्रश्न नसून या दोन्हीच्या सहयोगातून कुणासाठी उत्पादन करण्यात येत आहे, करायला हवे याचा विचार करावा असे काही बोचरे मुद्दे डॉ. वि. म. दांडेकरांनी आपल्या भाषणात मांडले. डॉ. वाय. एस्. भोरगे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्‌घाटन झाले आणि मेजर जनरल ए. एस्. वैद्य यांच्या हस्ते समारोप झाला.

केवळ भाषणबाजीच्या राष्ट्रीय परिषदांपेक्षा अशा स्वरूपाच्या 'अॅक्शन कॅम्पस 'मुळे राष्ट्रीय एकात्मतेचा हेतु अधिक परिणामकारकरित्या सफल होतो. दावणगिरीचा पी. बी. जैन, कोलार गोल्ड फील्डसचा सोमा रेड्डी, कटकचा प्रेमशंकर मिश्रा, ठाण्याचा शशी मंत्रवादी, वाईचा आर. एम्. प्रभुणे अशा अनेक तरुणांशी मी बोललो. त्यांच्या क्लबकडून कोणते कार्यक्रम केले जातात याची चौकशी केली. रक्तदान, मेडिकल चेक अप, व्यवसाय मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास असे कार्यक्रम बऱ्याच ठिकाणी घेतले जातात. त्याचबरोबर काही ठिकाणी खेडे दत्तक घेऊन रोटरी व रॉटरॅक्ट संयुक्तपणे त्या खेड्याच्या विकासासाठी प्रयत्न करीत असल्याचेही काही जणांनी सांगितले. पुण्याच्या कार्यकर्त्यांनी शिबिराचे संयोजन अतिशय उत्तम केल्याचेही सर्वांनी मनापासून सांगितले.

प्रमोद जेजुरीकर, शिरीष राव, सतीश घाटपांडे, प्रकाश यार्दी, वंदना गोडबोले, रजनी खिरे, राजीव राजे, अजित केसकर, सुधीर सोहोनी, माधव बांदिवडेकर हे पुण्यातील रोटरॅक्ट क्लबचे तरूण कार्यकर्ते आणि 'ग्रामायन 'चे श्री. पुरुषोत्तम हर्डीकर यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी गेले चारसहा महिने अविश्रांत परिश्रम केले. मुंबई, डोंबिवली येथील कार्यकर्त्यांनीही काही दिवस पुण्यात मुक्काम करून त्यांना साथ दिली.

आणि 'रोटरॅक्शन' ७६ हे शिबिर यशस्वी केले. भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या या उत्साही रोटरॅक्ट-युवक, युवतींनी युवाशक्तीचे एक प्रभावी दर्शन या शिबिरातून घडविले.

□

# सप्रेम नमस्कार....

### माचणूर महोत्सव

□ आपल्या लोकप्रिय साप्ताहिकातील शनिवार दि. ११ व १८ डिसेंबरमधील माचणूरच्या साधना–सप्ताह–महोत्सवावरील लेख वाचले. आपण दिलेल्या प्रसिद्धीबद्दल आणि केलेल्या मौलिक सूचनांबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. 'ग्रामायन 'चे सहकार्य आणि मार्गदर्शन आम्हास लाभले. हेच आमच्या परिश्रमाचे दृश्य फल मी समजतो.

एक महत्त्वाचा खुलासा मला उत्सवासंबंधी करावासा वाटतो. उत्सवापूर्वी महिनाभर सोलापूर जिल्ह्यात दुष्काळी वातावरण असल्याने महाराष्ट्र शासनाने– जिल्हाधिकारी, बी. डी. ओ. इ.– शेतकी व गुरांच्या प्रदर्शनाला परवानगी नाकारली होती. परंतु उत्सवापूर्वीच्या संकष्टी चतुर्थीला सर्वत्र उत्तम पाऊस पडला. साधना-सप्ताह-महोत्सवाचे व्यापक स्वरूप शासनाने पाहिले आणि ऐनवेळी पंढरपूर, सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील ग्रामसेवक, तलाठी व बी. डी. ओ. यांच्याकरवी शेतकी प्रदर्शनाचे उत्तम आयोजन करविले. उत्कृष्ट नमुने रविवार दि. ५ डिसेंबरच्या प्रदर्शनात आले. सोलापूरच्या जिल्हा परिषदेने आठशे रुपये बक्षिसांसाठी पाठविले. तीन दिवस हजारो लोकांनी हे शेतकी प्रदर्शन पाहिले.

सोलापूरचे डॉ. पाटील, व्हेटर्नरी सर्जन, यांच्या मार्गदर्शनाखाली पाचसहा पशुवैद्यांनी सुमारे साठ गाई, म्हशी व बैल यांच्यावर औषधोपचार व शस्त्रक्रिया दि. ५ डिसेंबर रविवारी, केल्या गेल्या. गोसंगोपनावर डॉ. पाटील यांचे व्याख्यान झाले.

त्याच दिवशी The Indian Medical Association च्या महाराष्ट्रातील पंढरपूर शाखेतर्फे डॉ. फडे आणि त्यांचे सात सहकारी डॉक्टर्स यांनी दोनशे दहा स्त्री-पुरुष बालके यांची विनामूल्य तपासणी करून औषधोपचार सुचविले.

२९ डिसेंबर ७६ — रं. स. गोडबोले
संयोजक
साधना–सप्ताह–महोत्सव समिति, माचणूर.

### पिंडे नव्हे, पिंडये

□ माणूस दि. २५ डिसेंबर १९७६ च्या अंकातील राजवाडे विचारदर्शन (पृ. ५) या वाचनीय लेखात राजवाड्यांनी संपादन केलेल्या राधामाधव विलास चंपू या शहाजी महाराजांच्या चरित्राख्यानाच्या कर्त्याचे नाव जयराम पिंडे असा उल्लेख आहे. परंतु हे नाव जयराम पिंडे असे नसून जयराम पिंडये असे आहे. ही नजर चूकच आहे. परंतु माणूस सारख्या दर्जेदार साप्ताहिकात तेवढीही चूक राहू नये म्हणून हा प्रपंच. माणूसचा एक नियमित वाचक या नात्याने हे कळवित आहे.

२५ डिसेंबर १९७६, डॉ. र. वि. हेरवाडकर
मुंबई.

कथा

# जोन्ससाहेब

सौ. उज्ज्वला पिंपळखरे

एक दिवसाच्या प्रवासानंतर, मध्यप्रदेशातल्या 'सागर' या ह्यांच्या बदलीच्या नव्या गावी मी सामानाच्या तेरा डागांसह स्टेशनवर उतरले अन् आगगाडी हलली. हे इथं दोन महिन्यांपूर्वीच रुजू झाले होते. मी मात्र पहिल्यांदाच इथं आले होते. मला नेण्यासाठी ह्यांची वाट पाहत मी आमच्या सामानाच्या पेटचावर बसून भोवतालचं स्टेशन पाहू लागले. सागर स्टेशन छोटं होतं, टुमदार होतं. कुठल्याही गावाची पारख त्याच्या स्टेशनावरून करता येते असं मी मनाशी ठरवीत असताना हे एका ऑर्डलीला घेऊन मला शोधत शोधत तिथं आले. 'कसा काय प्रवास झाला ? बरं झालं आलीस तू ! आता माझं मेसमधलं राहणं बंद झालं ! आपल्या नावावर जे घर मिळणार होतं ना ते मी कालच टेक ओव्हर केलं आणि बदलीचा हुकूम माझ्या हाती आला.'

'आता परत आपली बदली ?' मी आमच्या तेरा डागांकडे पाहू लागले. सागरला येऊन अर्धा तास सुद्धा झाला नव्हता अन् मी बदलीची बातमी ऐकत होते. प्रवासानं मी थकले होते. पण तशा स्थितीतही मला हसू आलं !

'आपली बदली आत्ता लगेच नाही हं ! दोन महिन्यांनंतर आमचं ऑफिस येथून रामगडला जाणार आहे. तोपर्यंत आपलं इथं घर !'...'आता असं करू या. आपला लचमन् आहेच इथं ! देखो लचमन यह सामान के वजन की यह रिसीट है. वह दिखानी पडेगी. ऐसा करो, बादमे सामान लेकर तुम ध्री रनरसे हमारे मकानपर आव. हम आगे जाते है !'...'आपण आपल्या मोटारनं निघू या.' 'चला !'

लचमनवर सामानाची जबाबदारी टाकून आम्ही मोटारनं निघालो. सागर गाव जुनाट वाटलं पण कॅन्टोनमेंट मात्र दाट झाडीत लपलेलं हिलस्टेशन वाटलं ! 'मध्यप्रदेश कसा काय वाटला तुला ? आपण कधी मध्यप्रदेशात नव्हतो.' हे म्हणाले.

'हवा तरी छान वाटली' मी म्हणाले.

'सागर हे मिलीटरी स्टेशन तर आहेच पण शिवाय कमिशनरचं ऑफिस आणि फॉरेस्ट डिपार्टमेंटचं ऑफिस इथं आहे. हरीसिंग गौरनं स्थापन केली ती सागर युनिव्हर्सिटी यामुळं सागरला चांगलंच महत्त्व आहे.' ह्यांनी कॅन्टोनमेंटमध्ये थोडं अंतर गेल्यानंतर उजव्या रस्त्याला वळण घेऊन मोटार एका बैठ्या बंगल्यापाशी थांबवली.

बंगल्याला आवार चांगलं प्रशस्त होतं ! आवारात समोरच्या बाजूला करंज्यांची उंचीपुरी झाडं होती. फाटक उघडून आत शिरल्यावर माझं लक्ष बंगल्याच्या पुढच्या जाळीदार व्हरांड्याकडे गेलं. तिथं पाटी लटकत होती, बिवेअर ऑफ स्नेकस् (Beware of snakes.) त्या अक्षरांमुळे मी पुरीच घाबरून गेले. माझ्या मनातली भीती ह्यांनी लगेच ओळखली. हे मला म्हणाले, 'अग, हा सगळाच दाट झाडीचा, जंगलाचा प्रदेश आहे. इथं साप असले तर नवल काय ? पण एक आहे. घराची उंची बरीच आहे. घरात साप येणं शक्य नाही. आवारात असेल एखादा ! पुढच्या अंगणात मी चांगले दोन खांब बसवून त्यावर दिवे बसवून घेतोच !' ह्यांनी दिलेल्या आश्वासनामुळं माझ्या मनाला जरा हलकं वाटलं !

पहिले दोन-चार दिवस मी घरातलं सामान लावण्यात घालवले; सामान लावण्यात मी अडकले त्यामुळं बाहेर कुठं गेलेच नाही. आमच्याच आवारात जरा चक्कर मारली. आवारात मागच्या बाजूला माळ्याची खोली होती. माळी बागकाम करायचा आणि त्याची बायको माझ्याकडे धुणंभांडी, केरकचरा वगैरे काम करायला यायची. एकदा ती कचरा काढीत असताना मी तिला विचारलं, 'काय ग पार्वती आपल्य आवारात खूप साप आहेत का ग ?'.

'हा हा, वैनीबाय ! हतं सापांना काय तोटा ? योक तर लई म्हातारं जनावर हाये. त्यो पन साप कसला पोसलाय् निस्ता ! त्येच्या अंगावर केस हायेत. लोक म्हनत्यात हा साप हतल्या भागाचा राखणदार हाये, कुणाला काय बी करत नाय ! म्होरल्या फाटकाला लागून करंज्याचं झाड हाये ना, ततं त्यो ऱ्हातो.' तिनं नवी बातमी सांगितली.

हे संध्याकाळी आल्यावर मी ह्यांना पार्वती जे बोलली ते सांगून टाकलं.

'काय त्या पार्वतीच्या बोलण्यावर लक्ष ठेवतेस तू ! उद्योग नाही म्हणून हे सारं सुचतंय् ! त्यापेक्षा असं कर ना ! आपल्या घरापुढनं, तसंच उजव्या रस्त्यानं जायचं.तुला इथल्या सागर क्लबची इमारत दिसेल. क्लब अगदी छोटा आहे पण क्लबची लायब्ररी आहे. आपण या क्लबचे मेंबर आहोत. तू जायला लागलीस तर तुलाही वाचायला पुस्तकं मिळतील—' ह्यांनी मला सुचविलं !

इथं आल्यापासून मला तसा भरपूर वेळ असायचा. माझा सकाळचा स्वयंपाक दहा साडेदहालाच आटपत असे. दुपारी जेवायला म्हणून हे दीड वाजता घरी यायचे. साडेदहा वाजल्यापासून ते दीड वाजेपर्यंत निदान वाचन करावं म्हणून मी सागर क्लबच्या लायब्ररीत जाऊन बसायचं ठरविलं.

एक दिवस सकाळी साडेदहाच्या सुमाराला मी घराला कुलूप लावून बाहेर पडत असताना आमच्या माळीबुवानं सांगितलं, 'वैनीबाय, माजं म्हाताऱ्याचं ऐका. माज्यापाशी रोज वाईच दूध, लाह्या द्येत जावा. मी ते सारं सापाच्या बिलापाशी ठिवीत जाईन. त्यात तुमचं भलं तर होईल.'

'बरं हं. उद्या पासनं देते.' असं म्हणून कुलूप नीट लागल्याची खात्री करून मी फाटकाबाहेर पडले आणि सागर क्लबकडे जाण्यासाठी उजव्या बाजूनं जाऊ लागले. जवळपास घर नव्हतं की, दुकान नव्हतं. रस्त्यावर चिटपाखरूही नव्हतं. पावसाळ्याच्या सुरुवातीचे दिवस होते. त्यामुळे सगळीकडे हिरवेगार दिसत होतं. हिरव्यागार झाडाझुडपात सागर क्लबची टुमदार इमारत

पृष्ठ २९ वर

# सोलकढी

## □ आकाश कोणासाठी ?

आजच्या माणसाला जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा आणि विमाने हवीत, हे कोणालाही मान्य होईल. विमान असले की, प्रवास कसा सुखात होतो. मात्र कधीमधी विमानाला अपघात होतो आणि प्राणसंकट ओढवते. विमानातच काही बिघाडबिघाड होऊन अपघात झाला तर आपला नाईलाजच असतो. पण माहितगार मंडळीच्या मते बरेचसे पक्ष्यांमुळे होतात. आकाशात विमानाची आणि पक्ष्याची टक्कर होते. पक्षी मरतो. पण सरळ मरत नाही. त्याच्यामुळे विमानालाही लहानमोठी दुखापत होते. ही गोष्ट बरी नव्हे. आकाश विमानांसाठी आहे, आपल्यासाठी नाही, हे त्या उडाणटप्पूंना समजावून घ्यायचे नाही की काय कोणास ठाऊक.

त्यावर भारतीय हवाईदलाच्या अभ्यासमंडळाने परिणामकारक उपाय आता सुचवला आहे. उपाय असा की, प्रत्येक विमानतळाच्या भोवतालच्या सात किलोमीटर्स परिसरातले सगळेच्या सगळे पक्षी नीट मारून टाकायचे. (मारून टाकलेले पक्षी काही उडून विमानाला तकलीफ देणार नाहीत.) एवढेच नाही तर ज्यामुळे पक्षिगण त्या परिसरात आकर्षिले जातील ते सारे साफ निपटून काढायचे : त्या आरक्षित भोवतालात फुलझाडे, फळझाडे नकोत; शेते नकोत; कचरापट्ट्या नकोत; पाणथळ जागा नकोत; किडेकीटकसुद्धा नकोत.

यावर, केवढे हे क्रौर्य, असे उद्‌गार एखाद्या मुखातून कणवेने बाहेर फाकतील. त्याकडे फार गांभीर्याने लक्ष द्यायचे मुळीच कारण नाही. ही पृथ्वी माणसाची, माणसासाठी, माणसापर्यंत आहे; बाकीचे गैरमानवी अस्तित्व मानवाच्या समर्पित सेवेसाठीच निर्माणलेले आहे, हे तुमच्यासारख्या रोखठोक-बुजव भोक माणसांनी कध्धीकध्धी विसरायचे नाही. पक्षी माणसाच्या आधीपासून येथे असतील, ते उडतही असतील; पण त्यामुळे आकाशात उडण्याचा वहिवाटीचा हक्क आपल्याला प्र प्त झाला असे त्यांनी मानू नये. समजुतदार माशांनी पाहा पाण्यावर आपला अधिकार कधी सांगितला नाही. उत्तर-दक्षिण ध्रुवावरच्या बर्फात आम्हीच बागडणार असे तेथले, आणि वाळवंटात आम्हीच जहाजणार असे वाळवंटातले, चतुष्पाद कधीच म्हणत नाहीत.

तेव्हा पक्ष्यांनीसुद्धा आम्ही मानव-विमानव आदेशू तसे आणि तितकेच उडावे. म्हणजे आम्ही त्यातल्या 'मोरा-माळढोकासारख्या पक्ष्याला राष्ट्रीय पक्षी म्हणून गौरवू; गरुडाला ध्वजावर बसवू; कोकिळाच्या सुरांचे काव्यकौतुक करू; शुभ्र कबुतरांना शांतीचे आणि मुक्तीचे प्रतीक म्हणून खुल्या, निळ्या आकाशात आम्ही आमच्या हातांनी उडवू. कसे ?

□

## □ माणसे : वाचणारी—न वाचणारी

पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्रे यांच्या गराड्यात मी सदैव असतो. तो गराडा उभा करणाऱ्यांमध्ये माझे पुस्कळ दोस्त आहेत. आता ही गोष्ट मोठी हवेशीर नाही, हे मलाही कळते. पण तिला माझा इलाज नाही. मात्र पुस्तके वगैरेंच्या गराड्यात असलो तरी वाचन वाचन असे ज्याचे अभिवर्णन केले जाते. ते मला फारच थोडे जमते. अभ्यास, व्यासंग, चिंतन, मनन, निदिध्यास, आलोडन, परिशीलन या वाचनसंबंधित सखोल वस्तूंची अनुभवसिद्ध ओळख मला नाही.

माझे परिचित-अपरिचित दोस्त मात्र या वस्तूंची साठेबाजी करून असतात. त्यांना हे जमते तरी कसे, याचा मला नित्य ओ-अचंबा वाटत आलेला आहे. त्यांच्या दिवसाला चोवीसापेक्षा जास्त तास असले पाहिजेत हे उघड आहे. एरवी चोवीसच तासांचा दिवस ज्या माझ्यासारख्यांच्या वाट्याला येतो त्यांनी काय, कधी, किती, कोठपर्यंत वाचायचे ?

वास्तविक माझे काम असे आहे की वाचन मला फारफार आवश्यक आहे. पण माझा वाचनाचा वेग अतिमंद आहे. त्यामुळे ताडगोळा सोलताना जितका कंटाळा येतो तितका थोडेसुद्धा वाचताना मला येतो. शिवाय माझी स्मरणशक्ती अशी बेइमानी आहे की वाचलेल्या ओंजळभरातले कोरड्या थेंबाएवढेच ती राखून ठेवते. बरे, वाचतावाचता काही लोकांना जसा थुईथुई आनंद होतो आणि त्याबद्दल नंतर त्यांना जसे हायहुय बोलता येते तसे मला मुळीच साधत नाही. तरी वेळ फुंकरून टाकण्यासाठी मला वाचावे हे लागतेच. मी वाचतो.

पण फ्रान्समधल्या एकूण प्रौढांपैकी निम्म्या लोकांना काहीही वाचायची कधीही गरज वाटत नाही, असे त्या देशाच्या सांस्कृतिक खात्याने केलेल्या पाहणीत आढळून आले आहे. त्यामुळे सांस्कृतिक खाते हबकले आहे.



पुस्तके वाचण्याऐवजी ही प्रौढ माणसे टी. व्ही. बघतात; म्हणून टी. व्ही. वर सांखारोष झाला आहे.

वाचणारी माणसे आणि न वाचणारी माणसे, असे माणसांचे पक्के दोन प्रकार करणे मला मंजूर नाही. कारण (१) वाचणाऱ्या माणसांमध्येसुद्धा माझ्यासारखी काही न वाचणारी माणसे ?लेली असतात; (२) वाचणारी काही णसे वाचून जे मिळवतात तेच न वाच काही माणसे न वाचून मिळवतात. □

## □ दीड अकलेचा कांदा

कांदा ही एक स्वस्त, चविष्ट; अद्भुत गोष्ट आहे. स्वैपाकात कांद्यामुळे जी खुमारी येते ती दुसऱ्या कशानेही येऊ शकेल, असे मला वाटत नाही. कांदा मनमिळावू आहे. संबंधित पदार्थांशी तो असे काही झकास जमवून घेतो की त्याचे असणे जाणवते पण खुपत नाही. कांदा नसेल तर आमच्या स्वैपाकाचे काय होईल कोणास ठाऊक. रॉबिन्सन क्रूसोसारखे कधीकाळी मलाही एखाद्या एकाकी बेटावर राहावे लागले तर त्या बेटावर कांदे पिकत असल्यास माझे एकाकी राहणे पुष्कळच सुसह्य होईल. आणि ते कांदे वापरून मला मटण-मासे करून घालणारी एखादी झीनत अमन त्या बेटावर उद्भवली तर एकाकीपणाचे दुःख मी हसत सोशीन.

कांदा नुसताच चविष्ट नाही तर औषधीही आहे, ही गोष्ट प्रभु रामचंद्र आणि सीतामाई यांना ठाऊक होती. चौदा वर्षांच्या वनवासात कांद्यानेच आजारपणापासून त्यांचे संरक्षण केले. मात्र अगदी प्रभु रामचंद्र झाले तरी कांदा नेमके काय करतो हे त्यांनाही ठाऊक नव्हते. आत्ताच्या संशोधकांना ते ठाऊक झाले आहे : कांद्यामुळे रक्ताचे प्रवाहित्व कायम राहते; त्यात गुठळ्या होत नाहीत. शिवाय कांदा म्हणे पक्षघातप्रतिबंधक आहे !

आपल्या कर्तृत्वाच्या मानाने कांदा अगदीच पेद्रोपकाव दिसतो. डॉक्टरला उंबरठ्याबाहेर ठेवणारे सफरचंद कसे टप्पोरे दिसते. रक्तवर्धक संत्रे कसे कोवळ्या सूर्य-सूर्यकिरणांचे घडल्यासारखे दिसते. कांदा दिसतो कागदाच्या मुटकुळ्यासारखा. त्याला एक झिणझिण्या वाससुद्धा असतो. आणि फोडल्यावर तो डोळ्यांना फुकट पाणी आणतो. पण वाह्यात असला तरी दीड अकलेचा असल्यामुळे कांद्याला टाळता येत नाही.

आणि इतक्या नामी पदार्थाला कशाला टाळायचे ? उपासवाल्यांचे सोडा. त्यांना कांदा चालत नाही. कारण कांदा म्हणे कामवर्धक आहे. पण उपास करणाऱ्यांना, उपासच मुळात कामवर्धक आहे, हे माहीत नसावे. ते बरेच आहे म्हणा : कारण कांदा खाऊन उपास म्हणजे उल्हासात फाल्गुन मास. असो.

कांद्याच्या पाकळ्या काढाव्या तेवढ्या थोड्याच.

शेवटी उरते ते असे की कांदा आवडतो त्याने तो हवा तितका खावा; नावडतो त्याने तो (नाकाने) हवा तितका सोलावा.

—अनंतराव

# व्हिएटनाम

## आता भर पुनर्घटनेवर

वा. दा. रानडे

युद्धात विजय, देशाचे एकीकरण हे टप्पे पुढे केल्यानंतर देशाच्या पुनर्घटनेच्या तिसऱ्या महत्त्वाच्या टप्प्यास व्हिएटनामने आता सुरुवात केली आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या चौथ्या काँग्रेसचे अधिवेशन गेल्या महिन्यात हानोई येथे झाले. व्हिएटनाम वर्कर्स पार्टी हे आतापर्यंतचे नाव बदलून व्हिएटनाम कम्युनिस्ट-पक्ष हे नवे नाव पक्षाने धारण केले.

देशाचे एकीकरण होताना उत्तर विरुद्ध दक्षिण असा संघर्ष निर्माण होईल. उत्तरेकडचे म्हणजेच हानोईचे नेते दक्षिण व्हिएटनामच्या कम्युनिस्ट पक्षावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करतील असा अंदाज पाश्चात्य निरीक्षकांनी केले होते पण ते चुकीचे ठरले आहेत. पक्षाचे एकीकरण आणि देशाचे एकीकरण कोणताही संघर्ष न होता घडून आले आहे. याचे कारण एकीकरणाची भावना व्हिएटनामी जनतेत मुळातच खोल रुजलेली आहे. उत्तर दक्षिण भेद व्हिएटनामी नेते व जनता यांनी पूर्वीही मानला नाही व आताही मानीत नाहीत. साम्राज्यवादी शक्तींनी आपल्या सोयीसाठी देशाची ही कृत्रिम फाळणी केली होती. जर्मनीची फाळणी आता जवळ जवळ चिरस्थायी झाल्यासारखी आहे. कोरियाच्या एकीकरणासाठी मध्यंतरी वाटाघाटीची पावले टाकली गेली पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. व्हिएटनामच्या नेत्यांनी मात्र आपल्या देशाचे एकीकरण घडवून आणण्यात यश मिळविले.

युद्धातील हानी भरून काढून आर्थिक विकासाचा पाया घालणे हे व्हिएटनाम पुढील मुख्य उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीनेच पंचवार्षिक योजना आखण्यात आली आहे. देशात १९८० अखेर २१० लाख टन धान्य उत्पादन करणे, जादा दहा लाख हेक्टर जमीन लागवडीखाली आणणे, सिमेंट उत्पादन २० लाख टन, वीज उत्पादन ५०० कोटी किलोवॉट, विकासाचा वेग वर्षाला २·२५ टक्के आणि राष्ट्रीय उत्पन्नात १४ टक्के वाढ त्यात अपेक्षिली आहे. ही योजना पुरी झाल्यानंतर विकासाचा अधिक महत्त्वाकांक्षी असा वीस वर्षांचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. या शतकाअखेर व्हिएटनामला आधुनिक प्रगत राष्ट्राचा दर्जा प्राप्त करून देणे हा या नियोजनाचा उद्देश आहे.

विकासासाठी व्हिएटनामच्या नेत्यांना शांतता हवी असून देशात आणि देशाबाहेर संघर्ष टाळून सहकार्याने आपली उद्दिष्टे साधण्याचा त्यांचा प्रयत्न राहील. समाजवादाबद्दल पढीक किंवा सैद्धान्तिक भूमिका न घेता लवचिक धोरण त्यांनी स्वीकारले आहे. उत्तर व्हिएटनामच्या नेत्यांनी चीनचे अनुकरण करून १९५० ते ६० या दशकात सामुदायिक शेतीचा धडाकेबंद कार्यक्रम हाती घेतला होता पण लोकांची अनुकूल मनोभूमिका तयार न करता पूर्वतयारीशिवाय हा कार्यक्रम हाती घेतल्याने उत्पादनात घट झाली होती आणि लोकांचे हाल झाले होते. या अनुभवाचा धडा घेऊन यावेळची पंच-

वार्षिक योजना आखताना आटोक्यातली उद्दिष्टे पुढे ठेवली आहेत. आर्थिक विकासासाठी खासगी भांडवलदाराचे भांडवल आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेतला जात आहे. दक्षिणेकडे काहीकाळ मिश्र अर्थ व्यवस्थाच चालू राहील. महत्त्वाचे उद्योगधंदे सरकारी क्षेत्रात आणि बाकी उद्योगधंदे सरकारी व खासगी अशा संयुक्त क्षेत्रात राहतील. खासगी धंदेवाल्यांना सरकारी कर्ज मिळेल. उद्योग, वाहतूक, बांधकाम या क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या खासगी भांडवलदारांच्या बाबतीत कराबाबतचे धोरणही लवचिक राहील.

आर्थिक विकास जलद घडवून आणण्यासाठी परदेशी मदत घेण्याचीही व्हिएटनामच्या नेत्यांची तयारी आहे. किनाऱ्यालगतच्या समुद्रात तेलाचे साठे आहेत पण त्यातून तेल काढण्यासाठी आणि ते शुद्ध करण्यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान, आणि शिक्षित तंत्रज्ञ व्हिएटनाममध्ये नाहीत. त्यासाठी परदेशी सहकार्य सरकारला हवे आहे. तसेच निर्यातीसाठी माल तयार करणारे कारखाने परदेशी भांडवलदारांनी गुंतवणूक करून काढावेत अशीही सरकारची योजना आहे. त्याबाबत स्वीडिश आणि फ्रेंच उद्योगपतींशी बोलणी चालू आहेत. या उद्योगांचे काही वर्षे राष्ट्रीयीकरण केले जाणार नाही असे आश्वासन देण्यात येणार आहे. या उद्योगावर आणि त्यांच्या व्यवस्थापनावर भांडवल गुंतवणाऱ्या परदेशी उद्योगपतींचे पूर्ण नियंत्रण राहील व सर्व नफा त्याला स्वदेशी पाठविता येईल. परदेशी भांडवलाला सवलती देताना आपल्या अर्थव्यवस्थेवर त्यांचे नियंत्रण प्रस्थापित होणार नाही अशी दक्षता सरकार घेत आहे. आधुनिक तंत्रज्ञान मिळविणे हा या धोरणामागील उद्देश आहे तो साध्य झाल्यावर परदेशी मालकीच्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्यात येईल. रशियालासुद्धा अमेरिकन तंत्रज्ञानाची मदत घ्यावी लागते तर नवोदित व्हिएटनामने परदेशी मदत घ्यावी हे स्वाभाविक आहे. अप्रगत राष्ट्रांना आपला विकास साधताना सुरुवातीला अशा मार्गाचा अवलंब करावा लागतो. परदेशी मदतीबरोबर परदेशी वर्चस्व येऊ नये याबाबत व्हिएटनामचे नेते पुरेशी दक्षता घेत आहेत.

अर्थव्यवस्थेचे नियंत्रण तज्ञांकडे सोपवावयाचे की निष्ठावंत पक्षकार्यकर्त्यांकडे सोपवावयाचे ? हा प्रश्न इतर कम्युनिस्ट राष्ट्रांप्रमाणे व्हिएटनामपुढेही उभा आहे. पक्षकार्यकर्त्यांबद्दलचा अनुभव समाधानकारक नाही. सत्ता माणसाला भ्रष्ट करते याला कम्युनिस्टही अपवाद नाहीत. ज्या उद्योगाचे व्यवस्थापन त्यांच्याकडे सोपविलेले असते त्याचे खास ज्ञान तर त्यांना नसतेच पण सत्तेच्या जोरावर आपले चुकीचे निर्णय ते सर्वांवर लादतात. काही पक्षकार्यकर्त्यांची चैनीची राहणी, भ्रष्टाचार, अहंकार, जबाबदारी टाळण्याची वृत्ती, वैयक्तिक फायदा साधण्यासाठी इतरांची पिळवणूक, लोकांच्या गरजांकडे दुर्लक्ष या दोषांबद्दल कम्युनिस्ट अधिवेशनात टीका करण्यात आली. या कार्यकर्त्यांना सुधारण्याची संधी दिली जाईल पण अशी संधी देऊन त्यांच्यात सुधारणा झाली नाही तर त्यांची पक्षातून हकालपट्टी होईल असा इशारा देण्यात आला आहे. पक्षकार्यकर्त्यांकडून उद्योगांचे नियंत्रण समाधानकारकपणे होत नाही असे दिसून आल्याने तज्ञांकडेच हे नियंत्रण सोपविण्याकडे सरकारचा कल दिसू लागला आहे. पक्षकार्यकर्ते या धोरणाने स्वाभाविकच नाराज झाले आहेत. अर्थव्यवस्थेचे नियंत्रण तज्ञांकडे सोपविण्याने त्यांचे महत्त्व वाढून तज्ञशक्ती निर्माण होण्याचा धोका असतो. दोन्ही बाजूचे हे दोन धोके टाळायचे असतील तर पक्षकार्यकर्ते आणि तज्ञ ही वर्गवारीच नष्ट केली पाहिजे. पक्षकार्यकर्त्यांतून तज्ञ आणि तज्ञांतून पक्षकार्यकर्ते निर्माण केले पाहिजेत. यांपैकी कोणत्याही एका बाजूवर अवास्तव भर देण्याने एकांगीपणा व त्यातून विकृती निर्माण होतात.

परराष्ट्रधोरणातही संघर्ष टाळून जगातील जास्तीत जास्त राष्ट्रांशी सहकार्याचे संबंध व्हिएटनाम प्रस्थापित करीत आहे. परराष्ट्रधोरणाच्या दृष्टीने जगाची विभागणी व्हिएटनामच्या नेत्यांनी पाच परीघात केली आहे. रशिया आणि चीनशी संबंध हा पहिला परीघ. या दोन्ही बड्या कम्युनिस्ट सत्तांपैकी कोणाच्याही एकाच्या गोटात न जाता दोघांचीही मदत घ्यावयाची. मात्र आपले धोरण-स्वातंत्र्य कायम ठेवावयाचे अशी व्हिएटनामची भूमिका आहे. इतर समाजवादी राष्ट्रे हा दुसरा परीघ. त्याच्याशी निकटचे आर्थिक संबंध प्रस्थापित करण्याचे व्हिएटनामचे धोरण राहील. तिसरा परीघ कंबोडिया व लाओस या दोन शेजारी देशांचा. हानोई या देशांना आपल्या नियंत्रणाखाली आणील असे अंदाज व्हिएटनामच्या विजयानंतर काही पाश्चात्य निरीक्षकांनी केले होते पण ते खरे ठरले नाहीत. कंबोडिया आणि लाओसच्या स्वातंत्र्याला कोणत्याही प्रकारे बाध न आणता व्हिएटनामने त्यांच्याशी निकट सहकार्याचे संबंध प्रस्थापित केले आहेत. चौथा परीघ बिगर कम्युनिस्ट राष्ट्रांचा, विशेषतः तटस्थ राष्ट्रांचा. त्यांच्याशीही व्हिएटनामने मैत्रीचे संबंध जोडले आहेत. आशिया व फिलिपाइन्स, थायलंड, इंडोनेशिया, मलेशिया येथे आपले खास प्रतिनिधी पाठवून व्हिएटनामने या राष्ट्रांशी सहकार्य वाढविले. आपल्या उद्देशांबद्दलचे त्यांचे गैरसमज दूर केले. पाचवा परीघ-पाश्चात्य राष्ट्रांचा आपल्या हितसंबंधात बाध न आणता आर्थिक विकासासाठी त्यांची मदत मिळविण्याचा व्हिएटनाम प्रयत्न करीत आहे. □


**पूर्णिया**

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

# गोठलेला एक आत्मा

अनुवाद : अतुल गोरे

फॉलसम कारावास, ९ ऑक्टोबर १९६५.

मला पूर्णांशाने जाणीव आहे की, मी एक कैदी आहे. मी काळा (निग्रो) आहे. मी बलात्कारवादी होतो. शिक्षणाच्या बाबतीत मी फारच मागास आहे. अर्थात या गोष्टींना कितपत महत्त्व द्यावयाचं ते मला ठाऊक नाही. परंतु माझ्या व्यक्तित्वातील या पैलूमुळे, मी पश्चात्तापदग्ध असावं, एकलकोंडेपणानं राहावं व एखाद्या विषयावर माझी बत्तिशी मी चटकन् उघडू नये असं स्वतंत्र व सुशिक्षित लोक अपेक्षितात. पण माझा नाईलाज आहे. याबाबतीत तरी मला त्यांना समाधान देता येणार नाही. "तुझ्यात बराच दम आहे व समाजाचं तू काही ऋण लागतोस, हे तुला केव्हा समजणार ?" या विचारानं ते माझ्याकडं काही अपेक्षेने पाहतात. त्यांच्या सडक्या भेजातील व इंगळासारख्या नजरेतील या प्रश्नाला माझ्याकडे एकच उत्तर आहे. यांकी नावाच्या रोगानं जर्जर झालेल्या माझ्या व्हिएतनाममधील शेतकरीबंधूंनी मला या ऋणातून मुक्त केलेले आहे. एका बाजूला आपल्या घरकुलामध्ये बसून उत्तम प्रकारच्या अंड्यांबरोबर बेकन खायचं का हॅम ? अशा प्रश्नामधून नैराश्य निर्माण करणारे गांडू अमेरिकन अन् दुसऱ्या बाजूला हे यांकी आपल्याला जाळून टाकतील, का आपल्यावर बॉंबफेक करतील, अथवा गॅस सोडतील या चिंतेत असणाऱ्या माझ्या माणसांनी माझी सारी देणी देऊन टाकली आहेत.

या पत्राच्या सुरुवातीलाच मी माझ्या सद्यःकालीन परिस्थितीचे कंगोरे करू शकलो असतो. मला पूर्ण जाणीव आहे की, मी उंचापुरा पण फाटकाच आहे. मला इतकी कडकी आहे की, माझ्या आजीचे कोमेजलेले स्तन तोंडात घेऊनच माझी भूक भागेल. मला दाढी वाढवून चेगेव्हाराच्या संगतीत जेथे असेन त्या देशाचा पेहेराव करून क्रांतीच्या नव्या वाटा शोधत जायला नक्कीच आवडेल; किंवा बर्कलेमध्ये नुसतं राहण्यात, तिथल्या मातीत लोळण्यात, वारा पिऊन धुंद होण्यात; त्या फुसक्या क्रांतीच्या, डुक्करखान्यामध्ये, धमाल करण्यात मजा वाटेल. तिथं मी शोधेन एक नवा जॉन ब्राऊन, एक नवा माल्कम एक्स, एक अमेरिकन लेनिन, फायडेल कॅस्ट्रो, माओ... अन् यातील प्रत्येक भावना सच्ची आहे.

पण खरं तर वांधा असा आहे की, मी माझ्याच वकिलाच्या प्रेमात पडलो आहे. ही गोष्ट अद्भुत नव्हे काय ? माझ्यासारख्या गुन्हेगाराकडून त्याच्या सुटकेसाठी तन, मन, धनाने मदत करायला धावून येणाऱ्यासाठी नितांत आदर अपेक्षित आहे. तरी देखील एखादा गुन्हेगार आपल्या वकिलावर खरोखरच प्रेम करू शकेल काय ? ही गोष्ट अगदी नवलाचीच आहे ! तुरुंगात असताना आपल्या वकिलाविषयी एखादा शब्ददेखील चांगला बोलणं म्हणजे कैद्यांची नाराजी ओढवून घेणं. कारण याच बारच्या उपासकांनी कैद्यांना सळो की पळो करून सोडलं आहे. एखाद्याच्या विश्वसनीय अशिलाची उलटतपासणी घेणं ही अत्यंत न्याय्य गोष्ट आहे व फसवणूक करणं हे एक उच्चतम कर्म आहे, असा ध्येयवाद शिकवणारं एखादं तरी काळं पुस्तक या वकिलाजवळ असलं पाहिजे याविषयी कैद्यांची अगदी मनोमन खात्री आहे. अन् हो, हे पुस्तक मात्र कोणाला चाळायला देखील मिळत नाही. कैद्यांच्या ध्यानात आलं की मला वकिलाने दिलेल्या एका मासिकामुळं मी पकडला गेलो व त्याची शिक्षा म्हणून मला अंधारकोठडी मिळाली. कैदी सारं काही जाणून म्हणाले, "हं ! तर तू त्या रांडेच्या मागे गेला होतास ? तुझ्या वकिलानं टाकलेल्या जाळचात तू अडकत चालला आहेस व सर्व गोष्टी उमजून तू जर त्यातून बाहेर आला नाहीस तर..."

तरी देखील यावेळी मात्र विजय माझाच होता. तुरुंगाच्या भिंतीइतकाच कैदीसुद्धा संशयात्मा असतो आणि ते आवश्यकही असते. खरंच ! एखाद्यानं कुणावर विश्वास तरी का ठेवावा ? ज्यांच्याबरोबर आपण शेज सजवली. आयुष्यातील अत्यंत भाऊक क्षण उपभोगले, अत्यंत नाजूक नाती निर्माण केली अशी आपली पत्नी अन् आपल्या सख्या जर आपल्याला काही कालाने सोडून जातात, आपल्याला पाण्यात पाहतात, संबंधांचे नाजूक धागे तोडून टाकतात, आपला तिरस्कार करतात मग आम्ही एखाद्यावर विश्वास तरी का ठेवावा ? वर्षामधून एखाद्या ख्रिसमस कार्डाला सिगारेटच्या पाकिटालाच काय पण टूथपेस्टला देखील महाग होतो. आम्ही मग का विश्वास टाकावा कोणावर ? समाज तर गुन्हेगाराला अगदी गांडच दाखवतो व त्यानं तिचा मुका घ्यावा अशी अपेक्षा ठेवतो. मग गुन्हेगाराला खूर किंवा गोळी याखेरीज दुसऱ्या कशाचा उपयोग करावा असं वाटावं तरी का ? पण गुन्हेगाराला समाजाच्या नख्या व सुळे दिसत असतात. म्हणूनच तो आपल्या नख्या अगदी अंतिम क्षणासाठी राखून ठेवतो. अशा वेळी संस्कृतीची ध्येये व प्रेरणा यांची जपणूक करणं अगदी अशक्य असतं. अशा प्रकारे खाईत खितपत पडलेले असताना एखाद्या वकिलाच्या प्रेमात पडणं कठीण व त्याला तसं सांगणं तर निःसंशय असंभवनीय ! अगदी प्रेमातच पडायचं अन् तेही वकिलाच्या ? हो ! कारण सत्याची जाणीव तुम्हाला सतत असते. तुम्ही तुमच्या वकिलाला फसवू शकला तरी स्वतःला फसवू शकत नाही.

या नाजूक नि तऱ्हेवाईक गोफामध्ये तुम्ही सर्व गोष्टी गुंफत आहात या जाणिवेने तुम्ही कष्टी का होता ? कारण तुम्ही स्वप्नाळू आहात ! अगदी आत्यंतिक स्वप्नाळू !! तुमच्या ठिकाणी एक प्रज्वलित अंगार वसतो आहे जो तुम्ही स्वतः देखील विझवू अगर

नष्ट करू शकत नाही. विरोधी वातावरणाच्या झुळकेनें तो तर फुलतच राहतो. कुजक्या, सडलेल्या व क्रौर्यपूर्ण वातावरणात ती ठिणगी सौंदर्य, मानव्य, चांगुलपणा, थोरपणा जागवीत असते, प्रेमाच्या गुज-गोष्टी करीत असते.

तर माझं माझ्या वकिलावर प्रेम आहे. माझा वकील काही सर्व-सामान्य नाही. माझा वकील म्हणजे मूर्तिमंत बंड आहे. माझ्या-इतक्याच तीव्रतेने व निष्ठेने तो प्रस्थापितापासून मुक्त आहे. कदाचित या बाबतीत त्याची बुद्धिमत्ता, मानव्य व प्रेम माझ्यापेक्षा कांकणभर सरसच ठरेल. तुम्ही यदाकदाचित पेपर चाळत असाल तर अमेरिकन नाविकदलानं केलेली डोमिनिकन रिपब्लिकमधील हालचाल अथवा व्हिएतनाममधील अंतर्गत प्रश्नांच्यामध्ये केलेली लुडबूड यांसारख्या आमच्या सामाजिक नादानीविरुद्ध केलेल्या चळवळीत त्याचा अखंडपणे असलेला अंतर्भाव तुम्हाला ठाऊक असेल. माझा वकील नागरी हक्कांचे पुरस्कर्ते, सत्याग्रही, कॅलिफोर्निया विद्यापीठा-तील चालकांच्या झुंडशाहीविरुद्ध उठलेले भाषण, स्वातंत्र्यवादी विद्यार्थी या सर्वांची बाजू हिरिरीने मांडतो. अर्थात या गोष्टींमधील सक्रीय भाग व मतैक्य हे देखील प्रेमाला कारणीभूत आहेत. तसं माझ्या सर्व साथीगणांवर माझं प्रेम आहेच. तरीदेखील मी व माझा वकील यात काय घडतय याच्या स्पष्टीकरणास वरील सर्व गोष्टी अपुऱ्याच आहेत.

मी पुढं काही कथन करण्यापूर्वी माझा वकील एक स्त्री आहे हे मान्य करावं—का हे गुपितच ठेवावं ? —जी एक सुंदर चाकोरी सोडून विचार करणारी अशी छानशी तरुणी आहे. मला जाणीव आहे की माझं प्रेम हे वासना व कृतज्ञता यांचं मिश्रण आहे असं ती मानते. माझ्या मनात वासना व कृतज्ञता तर आहेच पण त्याबरोबर मी तिच्यावर प्रेमही करतो. पण मला भीती वाटते की, माझं तिच्यावर प्रेम नाही या खात्रीनेच ती माझ्याशी संबंध ठेवेल.

रात्री झोपेत मी तिच्याबरोबर लंब्याचौडया गप्पाही मारतो. त्याला ती प्रतिसाद देखील देते. नाटकातील भाषणासारखे उतारेच्या उतारे आम्ही एकामागोमाग म्हणत असतो. अर्थात ती बोलते त्यातील एकाही वाक्यावर मी विश्वास ठेवत नाही हे आधीच स्पष्ट केलेलं वरं. संभाषण सुरू असताना मी बोलत तर असतोच पण तिच्या बोलण्यावरही विश्वास ठेवतो. तिचा शब्द म्हणजे अगदी काळ्या दगडावरील रेघ मानतो. पण एकदा का माझी झोप उडाली, की माझा तिच्या शब्दांवरील विश्वास मावळतो, इतकंच काय पण आमच्यामध्ये संभाषण झालं आहे, हे देखील मी नाकारतो. तरीपण, अत्यंत उल्हसित मनाने; मी जागा होतो. माझी झोपमोड जरी झाली असली, तरी थकव्याचं नावही नसतं. गाढ निद्रेच्या काही घटका व आम्हा दोघांच्या चुकामुकीचे काही क्षण सोडले तर निरव शांतता व जागृतावस्था यांमध्ये मी कुठंतरी चाचपडत असतो. त्यातूनच मग संभाषण सुरू होतं. हल्ली या गोष्टीचा मला त्रास होत नाही. कारण जेव्हा एखादी गोष्ट माझ्या मनाची पकड घेते तव्हा अशा प्रकारची मन:स्थिती अटळच.

दोन माणसांनी एकमेकांचं बोलणं समजावून घेणं या गोष्टीला माझ्या दृष्टीनं खूपच महत्त्व आहे. कारण स्वत:च्या अगर दुसऱ्याच्या शब्दांची दखल घेणारे विरळाच. अर्थात तुरुंगाबाहेर असताना मी


☆ ☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

# राजहंस प्रकाशने

□ **सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

□ **टॉलस्टॉय - एक माणूस**
सुमती देवस्थळे

□ **श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर

□ **शतपावली**
रवींद्र पिंगे

□ **पुरंदऱ्यांची दौलत**

□ **पुरंदऱ्यांची नौबत**
ब. मो. पुरंदरे

☆ ☆

असा होतो असातील भाग नाही. फक्त या गोष्टीची बीजं थोडीफार असावीत. बाकी सर्व गोंधळ व वेडेपणाच डोक्यात भरलला होता. लोकांना जाणून घेण्याची मला तीव्र इच्छा होती, पण का कोणास ठाऊक मी ती कृतीत मात्र आणू शकत नव्हतो.

एखाद्या माणसाला जाणून घेण्यासाठी त्या नव्या जगात प्रवेश म्हणजे एक अगम्यात घेतलेली उडीच. यशाची आशा थरकाप उडवणारी पण बाजी तर मोठी. खरंच ! पण दोन माणसं एकमेकांसमोर नग्न होण्यास नाराज असतात कारण त्यामुळे ती एकमेकांस मर्मभेद्य मात्र होतात. मग यातूनच आत्यंतिक कष्टाची व दुःखाची निर्मिती होते. मग अशा वेळी वरवरची व उथळ नातीच बरी नव्हेत काय ? म्हणजे त्यातून होणाऱ्या जखमाही तितक्याच उथळ. अशी नाती हृदय पिळवटून निदान जीवनरस तरी शोषून घेत नाहीत.

तरीसुद्धा, या नाजूक नात्यांची अखेर रक्तबंबाळ होऊनच घडावी लागते असं मुळीच नाही, अथवा एकमेकांशी अनीतीचे नाते देखील ठेवावे लागत नाही. उलट जर आपण भ्रष्टाचारी प्रतिमा उभ्या करून एकमेकाला अगम्य रूपात पाहिलं अन् भावसमाधी भंग पावून निलाजरेपणाने सत्याला सामोरं जाणं भाग पडलं तर सारं काही भग्न होईल व कटुता, तिरस्कार याखेरीज काहीही शिल्लक राहणार नाही. नाजूक भावनांची जपणूक करण्याच्या समर्थनीय कारणास्तव काही माणसं मुखवट्याखाली वावरतात याची जाणीव मला आहे. परंतु ते स्वतःला इतके कमकुवत समजतात की, त्यामुळे त्यांना इतरांवर छाप पाडण्यासाठी अशा प्रकारचे मुखवटे धारण करणं भाग पडतं.

तुरुंग, राजसत्ता, रुग्णालय, पाणबुडी अथवा अंतराळ यानांसारख्या बंधनातून जर एखादा माणूस मुक्त असेल व समाजातील स्त्री व पुरुष या दोनही घटकांशी त्याचा वाढता संबंध आयुष्यात येत असेल तर कदाचित दुसऱ्या व्यक्तीचा त्याच्यावर पडणाऱ्या प्रभावाविषयी तो अनभिज्ञ असेलही. चढाओढीमुळे होणारे परिणाम व व्यक्तिमत्त्वाचे विविध परस्परविरोधी पैलू, त्याची भावनिक व मानसिक आकलनशक्ती क्षीण करत असतील. पण याचा परिणाम म्हणून तो दुसऱ्याच्या भावना जाणून घेण्यासही अपात्र ठरतो.

मला खात्री आहे की, ज्याचा आत्मा अथवा भावबंध सुप्तावस्थेत नरकात खितपत पडला आहे. अशा माणसाच्या भावविश्वात जेव्हा एखादी सुंदर स्त्री प्रवेश करते तेव्हा तो तिला प्रतिसाद देण्यास अकार्यक्षम ठरतो. जणू काही त्याची प्रतिसादशक्ती हवेत विरूनच गेलेली असते. खरं तर हळूहळू पण खोलवर रुजणारी, नसानसांना तटातट तोडून टाकणारी, उन्मळून पाडणारी ती अवस्था. जणूकाही त्याच्या शरीरात एखाद्या अद्भूत शक्तीने प्रवेश करावा, तिनं त्याचं पुनरुज्जीवन करावं व हळूहळू त्याच्या जाणिवा सजीव व्हाव्या. नवे तृणांकुर फुटावे.

प्रथम ती जेव्हा त्याच्या आयुष्यात प्रवेश करते, तेव्हा तो एकाकी असतो, त्याचं हृदय विदीर्ण असतं. तो स्त्रीत्वाची पूजा करीत असतो—ज्याखेरीज त्याचा सारा पुरुषार्थ असाहाय्य व विद्ध असतो. त्याला आस नसते कुशाची ? तिच्या ममत्वाची, करुणेची, समंजसपणाची. तिचं वाक्चातुर्य, तिच्या हास्याच्या लकेरी त्याची श्रवणद्रिये सार्थ करणार असतात. तिच्या नेत्रांमध्ये त्याला शांती सापडणार असते. तिच्या शरीराचा सुगंध त्याचे घ्राणेंद्रिय तृप्त करणार असतो. टेबलाखाली बैठक बदलताना होणारी तिच्या मादक कपड्यांची सळसळ, तिच्या हाताचा नाजूक स्पर्श सारं सारं काही त्याला नितांतपणे हवंहवंसं वाटत असतं. जणूकाही एकाकी रस्त्यावर एका झुडपाच्या कुशीत आपण अंतिम क्षण मोजत आहोत. उन्हं तापत आहेत. त्या झुडपाची सावली जरी मरण टाळू शकत नसली तरी मृत्यूला काही क्षण तिष्ठत मात्र ठेवत आहे. आता तर अगदी अंतिम क्षण येऊन ठेपला आहे. इतक्यात इंद्रधनूचा रंगाचा पिसारा पांघरूण एक पक्षी त्या झुडपाच्या नाजूक फांदीवर उतरतो; अन् त्याचा कंपणारा गोड स्वर व सुंदर पिसांचा फुलोरा मरणोन्मुखाला जीवनरस पाजतो. आपली रंध्रं त्या धुंद वातावरणात जागृत होतात व अंतर्ज्ञानानं म्हणाना, आपल्याला वाटतं की, जोपर्यंत हा पक्षी झाडावर आहे तोपर्यंत तरी आपलं जीवन शाश्वत आहे, तशीच तीही अवस्था.

मनःपटलावरील तिच्या आठवणी पुसट होऊ नये म्हणून किती आटापिटा. तिची एखादी आठवण तो मनाच्या एका कप्प्यात दडवून ठेवतो. एखाद्या कवडीचुंबकानं त्याच्या जवळील नाणी देखील ज्या हावरेपणाने पाहावी तसा तो अस्पष्ट होणाऱ्या आठवणी कुरवाळत असतो. अथांग पसरलेल्या सुप्त मनातून एखादी आठवण जागृत मनाच्या पृष्ठावर यावी व क्षणभर तिचा गोंडस उघडा हातच नजरेसमोर चमकून जावा (अशा वेळी तिच्या मृदू व थंड शरीराला चुंबित करून आग भडकवण्यासाठी त्याचे ओठ थरारले का नसतील ? त्या हातांना स्पर्शिण्यासाठी त्याची बोटे चावळली का नसतील ?) एखाद्या एकाकी माणसाला पुन्हा जिवंत करण्याची जादू मला फक्त स्त्रीत्वातच आढळते.

मी तुरुंगात आलो तेव्हा १८ वर्षांचा असेन. अर्थात गतकालात मी खूपच बदललो. पण अखेरच्या काळात माझं स्वत्व हरवत आहे ही जाणीव मला तीव्रतेने होत होती. जणूकाही माझ्या शरीरातील जीवनरसच आटत चालला होता. त्यामुळंच मला माझं मीपण शोधणं दिवसेंदिवस अशक्यप्राय होत होतं. ही बधिरावस्था, ही झीज मला उमजत होती व या गोष्टीनं माझा तर अगदी पिच्छा पुरवला होता. यामुळे मी कधी कधी माझं भान विसरे तर कधी कधी माझ्या मनात निर्माण झालेल्या पोकळीची जाणीव मला पोखरून टाकत असे. पण आता मला या गोष्टीचं मूळ ध्यानात आलं होतं. माझ्या कामात रस असणाऱ्या, माझ्या दुखल्या-खुपल्याची काळजी असणाऱ्या एका स्त्रीनं माझ्या आयुष्यात प्रवेश केला होता. तिच्या आगमनाने मला पुनर्जन्मच दिला. माझ्या मनातील पोकळी थोडीफार भरून येऊ लागली. माझ्या लटपटणाऱ्या पावलांना आधार मिळाला. त्यांच्यामध्ये एक नवा जोम, नवी शक्ती, निश्चितता येऊ लागली. लाथ मारीन तिथं पाणी काढीन अशी खात्री मला वाटु लागली व मी 'एक नव्या मनूचा नव्या दमाचा' शिपाई म्हणून मिरवू लागलो. □

[ समाज प्रबोधन पत्रिका : जुलै-ऑगस्ट १९७६ अंकावरून लेख साभार पुनर्मुद्रित ]



# अशी चौकशी, अशी फाशी !

लेखांक आठ । र. धों. घाणेकर

राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन ह्यांच्या कारकीर्दीत १९६४ व १९६५ ह्या वर्षी Civil Rights Acts पसार झाले व निग्रो जमातींना अधिक हक्क व सवलती कायद्याने दिल्या गेल्या. वर्षानुवर्षे खितपत पडलेली निग्रो जमात जसजशी अधिकाधिक हक्क मिळवू लागली तसतशी समाजकारण व राजकारण ह्या विभागात अधिक लक्ष घालू लागली. प्रत्येक निग्रो कुटुंबाची सांपत्तिक परिस्थिती सुधारू लागली. घरात आवक वाढली. शिक्षणासाठी मुले महाविद्यालयातून गोऱ्यांच्या बरोबर शिकू लागली. राजकारणात निवडणुकामधून भाग घेऊ लागली. निद्रीत समाज जागा झाला की तो कारणावाचून चवताळून उठतो. जमातीतील पुढारी लोक चेतावणी देत राहतात तसेच अमेरिकेत पण झाले.

निग्रो पुढारी रॉय विल्किन्स व मार्टिन ल्यूथर किंग ह्यांच्या चळवळींनी ह्या १९६७–६८ मध्ये भेसूर रूप प्रगट केले होते. सभासभांतून खालील प्रकारचे संवाद पुढारी आणि श्रोते ह्यांच्यात ऐकू येत होते :

'What do you want ?'

'EREEDOM'

'Let me hear it again !' 'What do you want ?'

'FREEDOM– Nothing less than freedom !'

'Now !'

राष्ट्रोन्नतीचा रथ हा धीरगंभीरपणे सावकाशच चालत असतो. पायदळी तुडविल्या गेलेल्या समाजाचा आघात बसला की त्या धक्क्याने थोडा लवकर चालतो, इतकेच.

१९६८ च्या निवडणुकांच्या अगोदर वर्षभर निग्रोंच्या तोंडातून 'FREEDOM' हा शब्द जाऊन Black power, Black Leadership, Black administration असे समुच्चार बाहेर पडू लागले, म्हणजे एकूण गोरा अन् काळा हे भेद ते मानत होतेच. ह्या वेळपर्यंत कोणत्याही निग्रोला कोठे कसलीही बंदी नव्हती. Integration Separatism हे शब्द केव्हाच मागे पडले होते. आता निग्रो अमेरिकेतील कोणत्याही शाळेत, महाविद्यालयात, हॉटेल्समधून, कारखान्यांतून, दुकानांतून अगदी गोऱ्यांच्या बरोबर राहात होता, वागत होता. पूर्वी १९६० मध्ये ८००० डॉलर्स वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांची जी संख्या निग्रोंची होती ती ह्या १९६८ मध्ये तिप्पट झाली.

असे असून देखील मार्च १९६६ पासून गढूळ वातावरण निर्माण होऊ लागले. सबळ कारणे अशी कोणतीच नव्हती. पहिल्या प्रथम लॉस एन्जेल्स येथे एका गोऱ्या शिक्षकावर रस्त्यामध्ये निग्रो विद्यार्थ्यांनी हल्ला केला, प्रकरण चिघळले. पोलिसांना परिस्थिती काबूत आणण्यासाठी गोळीबार करावा लागला. ४ निग्रो झटापटीत दगावले. हे दंगे करणारांचे लोण एप्रिल १९६६ मध्ये वॉशिंग्टनला पोहोचले. तेथून पुन: कॅलिफोर्निया भागात, जून महिन्यात क्लेव्हलंड, ओमाहा, डे मॉईन्स, शिकॅगो, ब्रुकलिन, बाल्टिमोर, पर्थ ॲम्बॉय, मिनिपोलिस, डेट्रॉइट, मस्केगाव, ॲटलांटा, डेटन, सेन्ट लुई– अशा ठिकाणी हल्ले व मारामाऱ्या एकंदर ४३ ठिकाणी झाल्या.

१९६७ च्या मार्च महिन्यापासून दंगेखोरांनी फिरून उचल खाल्ली.

'An eye far an eye' an arm for an arm a head for a head and a life for a life!'

असे मोठमोठाले फलक मोठमोठ्या शहरातून झळकू लागले. गोऱ्या लोकांना हबकाच बसला. भीतीचे वातावरण पसरू लागले. दिवेलागणीनंतर साधारणत: गोरी माणसे बाहेर पडेनाशी झाली. एप्रिलमध्ये ओमेहा, नॅशव्हिल, क्लेव्हलंड, लुईव्हिल, वॉशिंग्टन, प्रॅटव्हिल, अलाबामा, नेवार्क ह्या शहरातून गोऱ्यांची वस्ती हलायला लागली व निग्रोंचे प्रमाण वाढू लागले. ६५ टक्के व्हाईट लोकांचे प्रमाण होते ते ३१ टक्क्यावर यऊन पोहोचले. वॉशिंग्टनला ५४ टक्के झाले व नेवार्क येथे तर २० टक्के!

जून महिन्यात दंगे, जाळपोळ, लुटालूट यांना ऊत आला. कारमायकेल व आलाबामा शहरात तर 'We came here to tear this town up and we are going to tear it up!' असे फलक लावले होते. सतत ५ दिवस दंगल राहिली व सिनसिनाटी शहरात तर काय कमालच झाली!

वॉशिंग्टननंतर नेवॉर्कला फार मोठे महत्त्व. ह्या शहरात प्रॉस्टेस्टंटस्, आयरिश, इटॅलिअन्स, ज्यूज हा श्रीमंत वर्ग फार मोठ्या प्रमाणात व अनेक वर्षे स्थायिक होऊन राहिलेला पण त्यांनादेखील सुखी जीवन जगणे कठीण झाले. १२ जुलैला एका टॅक्सी ड्रायव्हरला किरकोळ गुन्ह्याबद्दल पोलीस ठाण्यावर नेण्यात आले. लगेच शहरभर दंगा उसळला. जुलै १७ पर्यंत २३ माणसे दगावली. ही नेवॉर्कसारख्या दाट वस्तीच्या शहराची स्थिती.

प्लेनफिल्ड, फ्रेसनो, दमॉइन्स, एरी, मिनिपोलिस, डरहॅम ह्या ठिकाणी २३ जुलैला दंगा सुरू झाला आणि ४३ माणसे मेली व ४ कोटी ५० लाख डॉलर्सच्या मालमत्तेचे नुकसान झाले. सरकारनी Riot Commission नेमले. त्यांनी अहवाल सादर केला तो तर त्याहूनही भयानक. हजारो लोक पकडले गेले त्यात १८ ते २५ वयाच्या दरम्यानचे काळे निग्रो.

युनिव्हर्सिटयामधून विद्यार्थ्यांच्या चळवळी सुरु झाल्या. पोलिसांचे जबरदस्त पहारे बसले व धरपकडी सुरू झाल्या म्हणूनच महाविद्यालये वाचली नाही तर त्यांच्यावरही संक्रात आलेलीच होती.

INTEGRATION संकलन–एकत्रीकरण

अमेरिकेत गेल्या १ पिढीभर हा शब्द इतक्या वेळा इतक्या ठिकाणी. इतक्या निरनिराळ्या जमातीकडून वदविला गेला होता की त्याचा खरा अर्थ तरी कोणता, हेच कोणाच्या लक्षात येईनासे झाले होते.

White Americans, black Americans, integration, everywhere in education, in processes, in unions in politics, in Government, in amenittes–

गोऱ्या व्यक्तिला जे जे म्हणून काही मिळत होते ते ते आपल्याला मिळालेच पाहिजे हे अट्टाहासाने निग्रो जमात आता सांगू लागली. ह्या १९६७–६८ मध्ये Black Power निग्रोंची सत्ता हा अर्थ रूढ होऊ लागला. गोऱ्यांच्या विरुद्ध वातावरण तापत चाललेले होते.

एच्. रॅप ब्राऊन हा निग्रो पुढारी केंब्रिज– मेरिलॅन्डमध्ये भरलेल्या सभेत म्हणाला–

'BURN this town down, but don't tear down your stuff. When you tear down the white man, brother, you are hitting him in the money. Shoot him to death!'

वॉशिंग्टनमध्ये सभा झाली त्यात तो उद्गारला–

'Black people have been looting– I say that there should be more shooting than looting– so, if you loot– loot/a gun store.'

१९६७ च्या अखेरीस सॅक्रमॅन्टो येथे सुरू झालेल्या कॅलिफोर्निया असेंब्लीच्या अधिवेशनाच्या वेळी भीती उत्पन्न करण्याकरिता व दहशत बसविण्याच्या उद्देशाने 'Black Panthors of Oak–land' हातात खुशाल बंदुका घेऊन हिंडत होते.

फेब्रुवारी १९६८ मध्ये न्यूयॉर्कला Revolutionary Armed movement सुरूच झाली. ऑरेंजबर्ग, दक्षिण कॅरोलिना, उत्तर कॅरोलिनामधील डरहॅम, कॅलिफोर्नियाचा बराचसा भाग, शिकॅगो व न्यूयॉर्क येथील भव्य व मोठमोठाल्या दुकानांची व कार्यालयांची लुटालूट आणि जाळपोळ.

२९ जानेवारी १९६८ ह्यादिवशी उत्तर व्हिएटनाममधील १६ तरुण शूर वीरांच्या Death Squad नी सायगाव ह्या राजधानीच्या शहरातील अमेरिकन वकिलातीवर व शेजाराच्या विमानतळ आणि दारुगोळा कोठार ह्यावर जबरदस्त बॉम्बहल्ले करून जगभर व विशेषत: अमेरिकेत एक नवीनच भीतीचे व आश्चर्याचे वातावरण निर्माण केले. ३० जानेवारीला लगेच प्लेकू, न्हातरंग, कोटम, क्विनॉन, होआॅन, दानांय आणि हचू ही महत्त्वाची शहरे व अमेरिकन लष्कराच्या छावण्या ह्यांवर बॉम्बवर्षाव झाला.

२१ जानेवारीस दुपारी ३ वाजता ही बातमी अमेरिकेत जाऊन थडकली. आणि जनतेत तीव्र संतापाची एकच लाट पसरली. कारण ह्या युद्धावर नकळत प्रत्येक घरातला एकेक तरुण अमेरिकेने दिला होता. तो अशा परिस्थितीत घरी येण्याची शक्यता नव्हतीच. अमेरिकन जनतेला विश्वासात न घेता मुळीच जरूर नसता आणि देशाचा काहीही फायदा नसता, हे युद्ध १९५० पासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष चालूच ठेवीत आहेत. 'हे युद्ध बंद पाडलेच पाहिजे' हा विचार अमेरिकेभर प्रसृत होऊ लागला.

जनता म्हणू लागली, 'युद्ध जिंकत आहोत असे म्हणत आम्हाला राष्ट्रपतींनी फसविले, आमचा विश्वासघात केला.'

तिकडे व्हिएटनाम पेटलेला होता आणि इकडे अमेरिकेत निग्रो थैमान घालीत होते. सर्व ठिकाणी भीती, निराशा आणि अस्थैर्य जीवन.

व्हिएटनाम युद्धबंदी हाच विषय ह्यावेळी राष्ट्रापुढे ठेवून राष्ट्रपतीची निवडणूक लढविण्याची सुसंधी निक्सननी घ्यावयाची ठरविली आणि त्याने आपले दूत सर्व अमेरिकाभर पाठवून दिले.

PRIMARIES सुरू झाल्या. प्रत्येक चांचणी मतदान हे आपण लढविलेच पाहिजे म्हणून निक्सनने ठरविले; परंतु New Hampsheire ची पहिली चांचणी उघड नावावर इतक्यातच जाहीर करू नये ह्या उद्देशाने त्याने पॅट्रिक बुचानन, रेमंड प्राईस आणि डवाइट चॅपिन ह्यांचा सल्ला घेतला. त्याने १ फेब्रुवारी १९६८ ला त्या तिघांसह कोणालाही न कळविता रात्रीच्या विमानानी बोस्टन गाठले. विमानतळावर त्याला नेण्यासाठी निवडवे हाच फक्त आला होता.

नाशुका ह्याठिकाणी हॉवर्ड जॉनसन इन मध्ये प्रेस कॉन्फरन्स बोलावली होती. त्यात सुरुवातीलाच पहिला प्रश्न निक्सनला विचारला गेला. 'What are you going to put forward to the American People as a policy towards Viet-Nam ?'

'I want to make very clear as one member of loyal opposition and as a CANDIDATE FOR THE PRESIDENCY that we may be divided an many issues but the enemy cannot and should not count on American division to gain politically in the U. S. what they cannot gain militarily in Viot-Nam.'

'अमेरिकेतील जनतेत वैफल्याची भावना निर्माण झालेली मला स्पष्ट दिसते आहे. दुमत आणि दुफळी वाढत आहे त्याचा फायदा शत्रू घेत आहे असे मला स्पष्ट दिसते.

'मी एवढेच म्हणेन की व्हिएटनाममधे अमेरिकन सैन्य चांगलेच पुढे सरकत आहे. राष्ट्राध्यक्ष-पदाच्या निवडणुकीसाठी एक उभा राहिलेला उमेदवार म्हणून मी 'हे आश्वासन आपल्याला देतो की अमेरिकेत ह्या मुद्याविषयी दुफळी व दुमत केव्हाही नव्हतं आणि आजही नाही.!'

प्रेस कॉन्फरन्समध्ये निक्सनने सांगितलेले सर्व खोटं, धडधडीत खोटं, फक्त एकच खरं की आपण राष्ट्रपतीच्या निवडणुकीला उभे राहाणार आहोत, ही निक्सनची घोषणा! ३१ जानेवारीलाच अमेरिकन सैन्याची स्थिती जनतेला कळली होती आणि ३ फेब्रुवारीस निक्सनचे हे मुलाखतीतील बिनबुडाचे-विस्कळीत संभाषण, वास्तविक राजकारणी पुरुषाने असेच दुटप्पी बोलावयास पाहिजे म्हणजे तो पुढे पुढे जात असतो. निक्सन त्याला अपवाद नव्हता... कारण.. कारण तो एक मुरब्बी राजकारणी होता.

मार्च १९६८ मध्ये दुसरी प्रेस कॉन्फरन्स झाली-ही तर टीव्हीवरून जनतेला पाहायला व ऐकायला मिळाली. निक्सन म्हणाला-

'I think I am better qualified to handle the great problems of the Presidency than I was in 1960. I must demonstrate to the American People that I can win and that I am prepared to meet that challange. I have decided to test my ability.

When the strongest nation in the world can be tied down for 8 years in the War in Vtetnam, with no end in sight, when the richest nation in the world cannot manage its own economy, when the Nation with the greatest tradition of respect for the rule of law is plagued by rampant Law-lessness— I don't think America can afford four more years of Lyndon Johnson in the White House !'

'मला असं वाटतं की १९६० सालापेक्षा देखील आज १९६८ मध्ये राष्ट्रीय महत्त्वाचे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्याला मी अधिक लायक झालो आहे, राष्ट्रपतीची आगामी निवडणूक मी लढविणार आहे व जिंकणार आहे. आश्चर्य वाटते की, अमेरिकासारखे सुसज्ज राष्ट्र ८ वर्षे व्हिएटनामसारख्या किरकोळ युद्धामध्ये अडकून पडले जावे, इतक्या संपन्न राष्ट्राला सांपत्तिक स्थैर्य का आणता येऊ नये, आणि ज्या राष्ट्रात न्याय हा सर्वांना तोलून-मापून दिला जातो. त्या देशात असे दंगेधोपे, जाळपोळ, लुटालूट असावी. छे... छे... गेली ४ वर्षे लिंकन जॉन्सनची कारकीर्द एक भयानकच म्हटली पाहिजे. अमेरिकेनी आणखी ४ वर्षे असे हाल करून घेऊ नयेत. सर्व खोटं-सगळ्या थापा... खरं फक्त एकच की निक्सन १९६८ मध्ये निवडून आला हे!... १९६९-७०-७१ मध्ये दंगेधोपे, जाळपोळ, लूटालूट, कायद्याचे उल्लंघन पुढील ४ वर्षे चालूच होते. राज्यकारभारात पुरा गलथानपणा होता. डॉलरची बंभेरी उडाली. डॉलर हा व सुवर्ण गंगाजळी ह्यांचा संबंध सुटला. ३५ डॉलर औंसाला हा अनेक वर्षे मुक्रर केलेला सोन्याचा भाव भडकला तो १४० डॉलर-१ औंस ह्या पातळीवर पोहोचला. जॉन्सनची कारकीर्द पुष्कळच बरी अशी म्हणण्याची वेळ आली.

## END THE WAR AND WIN THE PEACE

ही निक्सनची निवडणूक-आरोळी-कांठळचा पडेपर्यंत जनतेच्या कानावर मारा करीत होती, पण जनता नेहमीच असते आंधळी आणि भोळी!

न्यूहॅंपशायरची बाजी तर निक्सनने मारली. आतापर्यंतच्या इतिहासात कोणाही उमेदवाराला पडली नव्हती एवढी मते निक्सनला पडली. ८०,६६७ आणि नेल्सन रॉकफेलरला १२,३७० एवढेच काय पण डेमोक्रॅटस, रिपब्लिकन, व इतर पक्षाच्या उमेदवारांना मिळालेल्या मतांचे एकत्रीकरण केले तरी देखील तो आकडा तोकडाच ठरेल.

लिओनार्ड गारमेंट, फ्रँक शेक्सपिअर, वुइल्यम सफायर, हॅबर्ट क्लिन, बॉब हल्डमन-हे सगळे निक्सनचे सहाय्यक बेहद्द खूष.

४२ वर्षाच्या हल्डमनला तर स्वर्ग दोनच बोटे उरल्यासारखा वाटला. देखणा, तरळ हिरव्या डोळ्याचा, जरा चालण्याबोलण्यात नटासारखा थाटमाट, बोलण्यात लवचिकपणा व नाजूकपणा-जाहिरात वितरक कंपनीच्या विक्रेत्याला शोभणारे असे सर्व गुण ह्या व्यक्तीत. पण बिचारा उगीचच जे वॉल्टर थॉम्सन ह्या जाहिरात वितरक कंपनीमधून आपली नोकरी सोडून निक्सनला येऊन मिळाला. निक्सनला मिळाला अन् पाचच वर्षात आढीतला आंबा नासला आणि त्याने दुसऱ्या चांगल्या आंब्यांना नासवलं.

मार्टिन ल्यूथर किंग-निग्रो चळवळीचा पुरस्कर्ता, शंभर टक्के शांततावादी महात्मा गांधींच्या ध्येयधोरणावर अढळ निष्ठा बाळगणारा-असा अमेरिकेतील निग्रो पुढारी मार्च १९६८ मध्ये ज्या ज्या ठिकाणी निग्रोंनी तंटेधोपे चालू ठेवले होते त्या त्या ठिकाणी जातीने जाऊन सामोपचाराने कार्यसिद्धी कशी होईल हे पाहण्यात जिवाचे रान करीत हिंडत होता-हिंडते हिंडत एप्रिल

**जाहिरात-वितरक कंपनीच्या विक्रेत्याला शोभणारे असे सर्व गुण...**

महिन्याच्या सुरुवातीला तो टेनासी संस्थानात शिरला. तीन ठिकाणी बैठकी व व्याख्याने दिल्यानंतर तो मेंफिस शहरात गेला. तेथे नगरपालिकेच्या झाडूवाल्यांनी संप पुकारला होता, दुपारी कार्यकर्त्यांची बैठक झाली व रात्री ७ वाजता मैदानात सभा होती. लांबलांबून निग्रो लोक किंगला भेटण्यासाठी व त्याचे वक्तृत्व ऐकण्यासाठी मेंफिस शहरात जमा होत होते. संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास लॉरेन मोटेलच्या दुसऱ्या मजल्यावरील कठड्याला टेकून खाली मोकळ्या जागेत काही संपवाले उभे होते त्यांच्याबरोबर तो बोलत होता. त्यांच्यापैकी एकजण गाणारा होता, त्याला त्यांनी वरूनच सांगितले की, आता माझी सभा आहे, त्या ठिकाणी सभास्थानावर तू जा आणि सुरुवातीलाच 'OH PRECIOUS LORD, TAKE MY HAND' हे माझ्या आवडीचे कवन म्हणून दाखव.

त्या व्यक्तीने खालूनच हसत हसत होकार दिला–इतक्यात कोणाला काहीसुद्धा कळलं नाही, कोठून आली हेही समजले नाही, कशी आली तेही उमगलं नाही–पण सूं सूं करीत बंदुकीची गोळी आली आणि किंगचे मस्तक फोडून आरपार निघून गेली. उपचार केले पण तासाभरातच निग्रोचा अनभिषिक्त राजा–मार्टिन ल्यूथर किंग गतप्राण झाला.

वय होते सारं ३९ वर्षांचे. गुरुवार दिनांक ८ एप्रिल १९६८.

रात्री ८ वाजता अमेरिकेतील कानाकोपऱ्यात रेडिओ–टेलिव्हिजन द्वारा बातमी पोहोचली, हाहा:कार उडाला.

खून झाल्याचे कळल्याबरोबर पहिल्या प्रथम वॉशिंग्टनमधील निग्रो चवताळून उठले, खवळले आणि पिसाटाप्रमाणे सैरावैरा धावत सुटले, पेनसिल्हानिया व फ्लोरिडा ॲव्हेन्यू ह्या भागातील मोठमोठाली दुकाने बंद केली गेली.

कंबरेला पिस्तुल लावलेला निग्रो पुढारी स्टोकले कारमायकेल हा आपल्या अनुयायांना जोरजोराने सांगत सुटला–GO HOME AND GET YOUR GUN. जी दुकाने हॉटेल्स उघडी होती तेथील नासधूस, जाळपोळ सुरू झाली. आगीचे डोंब उसळले. ज्वाळा फडकू लागल्या. पोलीस पहारा कडक करण्यात आला. शुक्रवारी सकाळी व्हाईट हाऊसच्या पहारेकऱ्यांना मारून दंगेखोर तळमजल्यातील मोठाल्या दिवाणखाण्यात घुसले–ताबडतोब लष्कराला बोलावून आणून त्यांच्या ताब्यात व्हाईट हाऊस देण्यात आले.

१९६० सालच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकांच्या धांदलीत किंग ह्याला न्यायालयाने किरकोळ गुन्ह्याकरिता ४ महिने कारावासाची शिक्षा दिली होती. ताबडतोब सिनेटर केनेडी त्याला भेटावयाला जाऊन आला आणि निक्सनला मुद्दाम त्याला भेटून येण्यासाठी सांगितले असतानादेखील तो गेला नाही. त्यावेळी केनेडी निवडून आला–निक्सन पडला. त्याच्या पराजयाची कारणपरंपरा शोधून काढताना त्याला निग्रो–मतं फारच कमी मिळाल्याचे दिसून आले व यदाकदाचित तो त्यावेळी किंगला सहानुभूती म्हणून भेटून आला असता तर अपयश आले नसते, असाही एक विचार त्यावेळी निक्सनच्या कानावर आला.

ह्यावेळी १९६८ मध्ये निक्सन निवडणुकीला उभा राहणार होता–मागची १९६० ची किरकोळ गोष्ट पण त्याला आता आठवली. तो डॉ. किंगच्या मृत्युयात्रेला हजर राहिला आणि मिसेस किंगला त्याने सहानुभूतीचा शोक-संदेश धाडला.

किंगचा खून झाल्यावर सबंध आठवडा बोस्टन, डेट्रॉइट, शिकॅगो, फिफॅडेल्फिया, सॅनफ्रान्सिस्को, टोलेडो, पिटसबर्ग ह्या ठिकाणी जाळपोळ, लुटालूट, खून दरोडे.

२०,०००–लोक पकडले गेले, ३९ माणसे मेली व १०० शहरांमध्ये दंग्यामुळे नुकसानी झाली.

शिकॅगोच्या मेयरनी SHOOT TO KILL चा हुकूम दिला. विशेषत: बिन शिकलेली निग्रो तरुण मुले ह्या दंग्यांतून भाग घेत होती, असे नजरेला आल्यावरून लष्करी शिपाई, बिनलष्करी संस्था व पोलीस यंत्रणा अशा तरुणांवर फार बारकाईने लक्ष ठेवत होती.

निग्रोंची वस्ती दक्षिण अमेरिकेत अधिक आणि राज्यकारभार यंत्रणा आणि लष्करातील नोकऱ्या ह्यामुळे उत्तर अमेरिकेतील गोऱ्यांचे प्रमाण अधिक.

निग्रो जवळजवळ सगळाच अशिक्षित शेतकरी वर्ग–४० एकर जमीन व एक खेचर अशाच मालकीचे ९० टक्के निग्रो.

हॉल आणि ओस्ले ह्या लेखकांनी १९४० मध्ये History of the United State हा ग्रंथ लिहिला. त्यात निग्रोंच्याविषयी लिहिताना लेखकद्वय म्हणते :

'Ordinary Prudence demanded that the Negros be controlled and disciplined with they could learn to use their freedom and in this way only, could the Negros be benefited and society protected. The southern legislatures, therefore, passed laws, the so called 'BLACK CODES' against vagrancy and undertook to compel the Negros to work. The perpose of these laws was to initiate the Negro gradually into his freedom. Many people in the North who had little understanding of Negros' real condition, regarded it as an effort to deprive him of his freedom and as in evidence of a rebellious spirit on the part of the South.'

१९३२ सालची आर्थिक मंदी आलेली. अमेरिकेचा सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ वॉल्टर लिपमन् ह्या परिस्थितीचे वर्णन करताना लिहितो :

'A demoralized people is one in which the individual has become isolated. He trusts no body and nothing–not even in himself. He sees only confusion and conspiracies in other men.

That is panic–that is disintigration.'

आणि आता १९६८ च्या अमेरिकेची बरोबर तीच स्थिती होती. महाविद्यालयातून विद्यार्थ्यांच्या चळवळी, निग्रो लोकांचा बेछूट गोळीबार, जाळपोळ, लुटालूट, डॉ. मार्टिन ल्यूथरचा खून, राष्ट्रपतीच्या निवडणुकीला उभा राहणारा रॉबर्ट केनेडी ह्याचा लॉस एन्जेलसमध्ये खून, सुवर्ण किंमतीत भयंकर वाढ, डॉलरची जगाच्या बाजारपेठांमधून चाललेली घसरगुंडी, व्हिएटनाममध्ये होत असलेली अमेरिकन सैन्याची कत्तल अन् पीछेहाट आणि कम्युनिस्टांची मुसंडी......

डेमोक्रॅटिक पक्षातर्फे राष्ट्रपतीची निवडणूक लढणाऱ्यामध्ये ह्या १९६८ सालात दोघांची नावे पुढे होती. ती म्हणजे ह्यूबर्ट हंफे व यूजेन मॅकॉर्थी–

डेमोलॅट ह्यूबर्ट हँफ्रे–निक्सनचे व्हिटियर म्हणून जे गाव होते त्या गावाच्या जवळच्याच खेडेगावातला हा ह्यूबर्ट हँफे. निक्सनच्या वडिलांचे व्हिटियरला किराणामालाचे दुकान होते तर हँफ्रेच्या वडिलांचे औषधे विकण्याचे दुकान होते. पहिल्या महायुद्धानंतर मंदीची लाट आली व त्यामुळे हँफेला शिक्षण घेणे जड झाले. वडिलांनी डोलंड गाव सोडून हूरन ह्या गावी जाऊन तेथे धंदा वाढविला. ६–७ वर्षे दुकानात काढल्यावर हँफ्रेनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पुढे चालू केले.

निक्सन आणि हँफ्रे शेवटपर्यंत एकमेकाचे शत्रू राहिले. दोघांनाही राजकारणाची भयंकर आवड. हँफ्रे हळूहळू चढत चढत, निक्सन-सारखाच, जॉन्सनच्या वेळी उपराष्ट्रपतीपदापर्यंत चढला. १९६८ सालच्या निवडणुकीत तो हरला व निक्सन निवडून आला.

डेमोक्रॅट युजेन मॅकार्थी– गेली वीस वर्षे पक्षाचा मोठा आधार-स्तंभ, हुषार लेखक वाङ्मयातील टिकाकार, कवि, बुद्धिमान, खेळाडू, अत्यंत देखणा आणि दिलदार वृत्तीचा.

तो सेंट जॉर्ज युनिव्हर्सिटीमध्ये प्राध्यापक परंतु राजकारणात पडण्याची मोठी हौस. १९४८ मध्ये कॉंग्रेसमन, १९५८ मध्ये ह्यूबर्ट हँफ्रेच्या बरोबर सिनेटमध्ये. २० वर्षे कामाचा उत्कृष्ट अनुभव. मित्रांच्या मेळाव्यात नेहमीच म्हणायचा–

"You can put it down that I am the best prepared man whoever ran for the presidency of this country."

ह्यूबर्ट हंफ्रे व बॉबी केनेडी ह्यांच्याबद्दल त्याच्या मनात मोठा तिरस्कार. व्हिएटनाम युद्ध अमेरिकेवर युरोपने स्वतःला निसटण्यासाठी लादले अशा म्हणणाऱ्यांपैकी एक. रॉबर्ट मॅकनमारानीं ज्यावेळी अमेरिका कदाचित चायनाविरुद्ध Ballistic Missiles वापरील असे जाहीर केले तेव्हा मॅकार्थीने त्याच्यावर सतत झोड उठविली.– "One man plus the truth makes a majority" अशा वृत्तीचा तो होता. पण त्याला माहीत नव्हतं की, राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी अमाप पैसा व मजबूत संघटना लागतेच लागते. १२ मार्च १९६८ च्या New Hampsheric Primary मध्ये जॉन्सनला २९,०२१ व मॅकार्थीला २८,७९१ मते पडली. आपली निवड नक्की होणार असे मॅकार्थीला वाटले होते कारण काही दिवसांतच जॉन्सन आपण १९६८ ची निवडणूक लढविणार नाही जाहीर करणार होता. मॅकार्थीला स्वप्ने पडत होती– आता विसकॉनसिन–नंतर इंडियाना–नंतर ऑरेगॉन–नंतर कॅलिफोर्निया आणि नंतर शिकॅगो– तो ह्या स्वप्नदुनियेतच रंगलेला होता; कारण हाडाचा तो कवि होता.

१९५२ सालचा, १९६० सालचा व १९६८ सालचा निक्सन–फार फार फरक पडला होता त्यात. १९५२ मध्ये तो धाडसी, आत्मप्रौढी मिरवणारा व कम्युनिस्टांना कर्दनकाळ– असा असलेला निक्सन १९६० मध्ये धोकेबाज, अस्थिर मनाचा व अविश्वासार्ह वाटू लागला– आणि १९६८ मध्ये संथ, शांत, विचारी आणि विशिष्ट गोष्टी अगोदर ठरवून ठेवून करून घेणारा असा दिसू लागला. पूर्वी त्याचीच टकळी चालू असावयाची, आता तो स्वतः कमी बोलतो–दुसऱ्याचे ऐकून घेतो.

## रिपब्लिकन पक्षाची घसरगुंडी

१९६४ च्या निवडणुकीत रिपब्लिकन गोल्डवॉटर हरला आणि हा पक्ष जो उतरंडीला लागला तो १९६७ पर्यंत. लिंडन जॉन्सनला १९६४ मध्ये १ कोटी ६० लाख मते अधिक पडली व गोल्डवॉटरला २ टक्के देखील मते पडली नाहीत. त्याची सांपत्तिक परिस्थिती पार बिघडून गेली. त्याला मदत करणाऱ्यांची दैना तर काही विचारायलाच नको. त्याच्याकरिता अत्यंत सचोटीने व कसोशीने काम करणारा कार्ल हिस ह्याला नोकरी मिळणे कठीण झाले. शेवटी बिचारा वेल्डरचे काम करीत होता पण जात्याच तल्लख बुद्धीचा असल्यामुळे पुढे तो धातूंचे पुतळे तयार करू लागला व त्याने नाव कमावले. मूलतःच रिपब्लिकन पक्षामध्ये गोरे लोक, मध्यम स्थितीतील लोक आणि प्रॉटेस्टंट धर्माचे लोक हे अधिक होते. आणि आताचा प्रश्न होता निग्रो, कामगार-शेतकरी वर्ग. डॉ. किंग ह्याच्या मरणोत्तर निक्सनने निग्रो वर्ग हाताशी धरण्यास सुरुवात केली व त्यात त्याला बरेचसे यश येऊ लागले.

निक्सनच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे ह्या १९६६ पासून रिपब्लिकन पक्षामधून $R^3$ म्हणजे आर त्रिकुट–राष्ट्रपतीच्या १९६८ च्या निवडणुकीवर नजर ठेवून होते व ते म्हणजे : Rockfeller, Reagon and Romney हे तिघेही आपआपल्या परीने लायक होते. काहीही झाले तरी निक्सनला निवडून द्यावयाचे नाही असा तिघांचाही प्रचार चालू होता. हे तिघे होते तरी कसे ह्याची किंचितशी झलक–

रिपब्लिकन रोनाल्ड रीगन– अमेरिकन राजकारणात नव्यानेच उदयास आलेली एक व्यक्ति. १९६२ साली ज्या एडमंड ब्राऊनने कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरपदाची निवडणूक निक्सनच्या विरुद्ध लढून जिंकली होती त्याचा १९६६ मध्ये ह्या रिगनने ९ लाख ९३ हजार मतांनी पराभव केला होता व आता तो कॅलिफोर्नियाचा गव्हर्नर होता. १९६४ सालच्या गोल्डवॉटरच्या निवडणुकीत मोठा पुढाकार घेतलेला व मोठेपणाला हपापलेला रिगन १९६८ सालच्या पक्ष-निवडणुकीत उभा राहिला आणि पडला.

रिपब्लिकन जॉर्ज रोमने– १९५२ पासून अमेरिकन मोटर्स ह्या कंपनीचा डायरेक्टर होता. त्याने कंपनीची स्थिती चांगलीच सुधारली. राजकारणाची आवड असल्यामुळे १९५९ मध्ये तो राजकारणात शिरला. निक्सनशी फार मोठे सख्य पण हळूहळू रॉकफेलरनी आपल्या बाजूला त्याला ओढून घेतले. बॅरी गोल्डवॉटरशी त्याचा नेहमीच बेबनाव. धर्माने रोमन ख्रिश्चन. अत्यंत धार्मिक वृत्तीचा. रविवारी राजकारण व धंदा अगदी वर्ज्य. धूम्रपान निषिद्ध, पिणे तर मुळीच नाही. कामाचा उरक दांडगा. निग्रोच्याविषयी आंतरिक कळकळ आणि सहानुभूती.

मिचिगॉनला तीन वेळा गव्हर्नर म्हणून निवडून आला. गोऱ्या लोकांनी निग्रो जमातीशी समजून उमजून, मिळूनमिसळून वागावयास पाहिजे हे त्याचे नेहमीचे म्हणणे. त्याची गव्हर्नर म्हणून कारकीर्द गाजली कारण तो स्वभावाने मनमिळावू, वर्तनाने अतिशय सरळ

आणि चोख. वागणे बादशाही थाटाचे आणि रुबाबदार. काही वार्ताहरांनी त्याचे वर्णन ' STRAIGHT ARROW ' असे केलेले आहे ते ह्या वृत्तीमुळेच.

रिपब्लिकन नेल्सन रॉकफेलर– आयसेनहॉवर राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून तो थेट १४६८ पर्यंत रॉकफेलरची इच्छा. आपण राष्ट्राध्यक्ष व्हावे ही होती. अमाप संपत्ती होती, नावलौकिक होता, राजकारण चोख होते. गव्हर्नरप्रमुख म्हणून झालेली कारकीर्द वाखाणण्यासारखी होती. पण का कोण जाणे– ते त्याला जमले नाही हे मात्र खरे. ज्या ज्या वेळी रिपब्लिकन पक्षाला पैशाची गरज भासे त्या त्या प्रत्येक वेळी रॉकफेलरने पैसा पुरविला. १९६० साली त्याची फार इच्छा होती की, पक्षाने राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी आपल्याला उभे करावे पण निक्सनलाच उभे करण्यात आले. केनेडी एवढी भयंकर झुंज घेऊनसुद्धा निक्सनला त्यावेळी १ लाख व २० हजार मते कमी पडली.

१९६४ साली प्रयत्न करावयाचा पण १९६२ मध्ये त्याच्या पत्नीने त्याला सोडचिठ्ठी दिली. रॉकफेलरनी दुसरीबरोबर लग्न केले ती एक घटस्फोटिता होती. त्यामुळे पक्षात किंचितशी नाराजी उत्पन्न झाली. बॅरी गोल्डवॉटरपेक्षा आपण कितीतरी पटीने लायक हे पुनःपुनः पक्षाच्या अध्यर्पूना तो सांगे पण कोणालाच ती पटेना. एकतर पक्षाची प्रतिमाच ह्यावेळी डागळल्यासारखी झाली होती तेव्हा तो विचार त्याला सोडावा लागला. मुख्यत: म्हणजे त्याची धरसोड वृत्ति त्याच्या अपयशाला बव्हंशी कारणीभूत झाली. २१ मार्च १९६८ ला त्याने न्यूयॉर्कच्या हिपटन हॉटेलमध्ये ३०० बातमीदार व स्तम्भलेखक जमले होते त्यांच्या समोर सांगून टाकले :

" I have decided to day to reiterate unequivocally that I am not a candidate campaigning directly or indirectly for the presidency of the United States. "

पैसेवाल्यांचा व कारखानदारांचा असा एक विशिष्ट गट होता की, त्यांना रॉकफेलरला राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीला उभा करावयाचा होता. कोट्याधीश जॉन व्हिटने, वॉल्टर थेमर, आर्यविन मिलर, स्टेवॉर्ट मॉट, डेव्हिड रॉकफेलर व एमेट ह्यूजेस ह्यांनी रॉकफेलटरचे मत वळविले. शेवटी अल्बनीहून मंगळवार ३० एप्रिल १९६८ ह्या दिवशी त्याने टेलिव्हिजनवरून जाहीर केले.

' To day, I announce my active candidacy for the nomination by the Republican party. '

ह्या त्याच्या घोषणेचे स्वागत होण्याऐवजी हसे मात्र झाले. परंतु तो खचला नाही त्याने निवडणूक यंत्रणा एकदम सुरू केली. संबंध मे महिना रात्रंदिवस त्याचे कार्यकर्ते काम करीत होते.

५ जून १९६८ ला रॉबर्ट केनेडीचा खून झाला. जरी दोघेजण निरनिराळ्या पक्षाचे होते तरी दोघेही जिवश्च-कंठश्च मित्र होते.

जून-जुलै व ऑगस्ट ७ तारखेपर्यंत सभा-बैठका-संमेलने चालूच होती. ह्या काळात त्याने ४५ संस्थानांना भेटी दिल्या. ६६,२०० मैलांचा प्रवास केला. वक्तव्ये छापवली. रेडिओ-टी. व्ही. वर मुलाखती दिल्या.

मिआमी येथे ८ ऑगस्टला भरलेल्या रिपब्लिकन पक्षाच्या मेळाव्यामध्ये राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी पक्षातर्फे कोणाला उभे करावयाचे हे प्रतिनिधींची मते घेऊन ठरणारे होते.

ते मतदान ८ ऑगस्ट १९६८ रोजी गुरुवारी दुपारी १।। वा. झाले. निक्सनला ६९२, रॉकफेलरला २७७ व रोनाल्ड रीजनला १८२ मते पडली. १९६६ साली रॉकफेलर, रीअन, रोमने हे त्रिकूट राष्ट्रपतीपदाची निवडणूक रिपब्लिकन पक्षातर्फे लढविणार असे कळल्याबरोबर रिचर्ड मिलहूत निक्सन ह्यांच्यातला खरा निक्सन जागा झाला! भाषणावर भाषणे, वक्तव्यावर वक्तव्ये, मुलाखतीवर मुलाखती यांचा सतत मारा चालू राहिला.

रॉकफेलर, रीजन, रोमने ह्यांची वक्तव्ये म्हणजे सिसिरोसारखी. असे सांगतात की, सिसोरोचे भाषण झाले की, श्रोते मंत्रमुग्ध होऊन म्हणत, ' वा, वा काय सिसिरो सुंदर बोलला ? जणू मेजवानीच. '

आणि तेच डेमॉस्थेनिसचे भाषण संपले की, श्रोते बोलत नसत पण वक्तव्याचा पडसादच पडत असे तो असा : ' चला उठा, चला उठा, क्षात्रतेज प्रगटवा ' डेमॉस्थिनिससारखे वक्तव्य होते निक्सनचे. झाले तसेच. त्याने पेरून ठेवलेली माणसे एकदम कामाला लागली ती ऑगस्टच्या ८ तारखेपर्यंत नव्हे तर नोव्हेंबर महिन्यातील निवडणुका होईपर्यंत.

१७ जानेवारी ११६८ ला प्रेसिडेन्ट लिंडन जॉन्सन ह्याने टेलिव्हिजनवर भाषण केले. तो म्हणाला–

' The enemy has been defeated in battle after battle. Enemys military effort was a complete failure. '

निक्सनने जी धडक मारली ती जनतेच्या वर्मी जाऊन भिडली. जॉन्सनच्या सगळ्या थापा कशा आहेत, लाखो अमेरिकन सैनिक व्हिएटनाममध्ये मारले जात आहेत, २० वर्षे युद्ध चालल्या कारणाने अमेरिका कशी दरिद्री बनत चालली आहे ह्याचे चित्रण तांबडतोब ८ दिवसानंतर निक्सनने राष्ट्रापुढे ठेवले.

राष्ट्रपतीला खिजविण्यासाठी, चिडविण्यासाठी राष्ट्रातील तरुण वर्ग पुढे सरसावला. त्यात ज्यू, निग्रो, कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट–सगळ्या धर्माचे लोक होते. शर्टच्या व कोटाच्या बटणावरून, महाविद्यालयाच्या भिंतीवरून खालील मजकूर दिसू लागले–

' Hitler is alive......in the White House ! '

' STERILIZE L. B. J. ' ' No more ugly children '

' King Lyndon the First '

' Lee Harvy oswald, where are you now ? we need you ! '

' How to be a vewish president ? '

एवढेच काय पण अमेरिकेतील निरनिराळ्या शहरातून भव्य चित्रे लावली गेली की, ज्या चित्रावरून असे स्पष्ट दिसत होते की, जॉन केनेडीचा खून व रॉबर्ट केनेडीला ठार मारण्याचा कट प्रेसिडेन्टनीच केला.

मार्च महिन्यात जॉन्सनला जाहीर करावे लागले की, १९६८ च्या निवडणुका आपण लढविणार नाही.

१९६३ सालापासून NIXON–HUDGE–GUTHERIE–ALEXANDER–MITCHELL.

ह्या सॉलिसिटर्सच्या पेढीमध्ये निक्सन काम करीत राहिला. तेथेच त्याची मिचेलशी चांगली दोस्ती झाली. लिओनार्ड गार्मेंट हा

येथेच त्याला मिळाला. ब्रुकलिन Law School चा हा विद्यार्थी वकिली करीत होता. मिचेल हा कर्जे काढून घेण्यात फार हुशार आणि दर्दी. न्यूयॉर्क कॉर्पोरेशनला २५२ कोटी डॉलर्सचे कर्ज व तसेच इतर म्युनिसिपालिटयांना ह्याने मसुदा तयार करून देण्यावर मिळालेली कर्जे–ह्यामुळे मिचेल हा वरवरच्या थरात ओळखीपाळखी झालेला माणूस होता.

१९६३ ते १९६८ ह्या ५ वर्षांत निक्सनला चांगलीच मिळकत झाली. शिवाय Six Crisis हे १९६२ मध्ये पुस्तक लिहून त्याला दरवर्षी २ लाख डॉलर्स मिळत होते.

१९६८ मध्ये त्याची मालमत्ता ८ लाख ५८ हजार डॉलर्सची होती व कर्ज ३॥ लाख डॉलर्सचे होते.

निक्सनच्या निवडक १० मित्रांनी Congress 66 ह्या नावाची संघटना १९६६ मध्ये सुरू केली व तिच्याद्वारे १९६८ मध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी पैशाची जमवाजमव होऊ लागली. १९६६ च्या नोव्हेंबरमध्ये परदेशाचा दौरा करून आल्यानंतर जॉन्सनने टेलिव्हिजनवर भाषण केले. त्यात त्यांनी आपण युद्ध जिंकणार आहोत, अमेरिकेची सर्व ठिकाणी वाहवा झाली आहे, दक्षिण व्हिएटनाममध्ये अमेरिकेचे सैन्य उत्तर व्हिएटनामच्या सैन्याला चांगलेच हैराण करीत आहे अशा थापा मारल्या.

त्याला उत्तर म्हणून निक्सनने भाषणाच्या दुसऱ्याच दिवशी न्यूयॉर्क टाईम्समध्ये लेख छापण्यास दिला. त्याच आठवडयात निरनिराळ्या ठिकाणाहून रिपब्लिकन्स निवडून येत असल्याच्या घोषणा टाईम्सने छापल्या. १९६७ मध्ये रोमने, रॉकेफेलर व रीजन ह्यांचे दौरे सुरू झाले, पण व्हिएटनामविषयी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे काय द्यावयाची हे तिघांच्याही ध्यानात येईना. निक्सनचे Foreign affairs म्हणजे हुकमी पान !

निक्सनचा शत्रू रॉकफेलर ह्याला हाताशी धरून रोमनेनी एक मसुदा तयार केला, त्याचे शीर्षक peace with amnesty हा मसुदा बऱ्याच रिपब्लिकन्सच्याकडे धाडला गेला. त्याचा काहीही उपयोग झाला नाही. न्यूयॉर्कला आपल्या घरी, रिपब्लिकन पक्षातर्फे निवडून गेलेले ७ गव्हर्नर्स, पक्षाची वरच्या थरावरची माणसे, नॅशनल कमिटी चेअरमन, ६ कॉंग्रेसमेन व ३ सिनेटर्स रॉकफेलरने बोलावून घेऊन त्यांच्याबरोबर खल केला. त्याच बिल्डिंगमध्ये ६ व्या मजल्यावर निक्सन राहत होता त्याला ही खलबते काय झाली ह्याची संपूर्ण कल्पना दुसऱ्या दिवशीच मिळाली.

१९५२ सालापासून निक्सनच्या राजकारणातील हालचालींचा पूर्ण अभ्यास केलेला एक स्तंभलेखक अँन्डरसन त्याला मार्च १९६८ मध्ये भेटावयास गेला असताना निक्सन त्याला म्हणाला–

I have always thought that this country could run itself domestically without a President. All you need is a competent cabinet to run the country at home. You need a President for foreign policy–no secretary of–State is important. The President makes foreign Policy. The very first thing I would try to do is to try to get in touch with Red–China, if I am elected. There had to be an understanding with Red China. In ten or fifteen years it would be impossible to run the world if Red–China would not be part of it."

निक्सनने २ एप्रिलला व्हिसकॉन्सिन प्राथमिक चाचणी निवडणूक जिंकली. ७ मेला पेन्सिएव्हानिया जिंकली. ८ मेला इंडिआना जिंकली. १४ मे ला नेब्रास्का जिंकली आणि २८ मेला ओरेगॉन जिंकली.

५ जून १९६८ ला निक्सन आणि त्याचे High Command हल्डमन, मिचेल, क्लेडिन्स्ट, क्लीन, गार्मेन्ट, फ्लॅनिगन आणि ए. एस. बर्ग ही सर्वजण फ्लोरिडा येथील की बिस्कायनीला जमली. आतापर्यंतच्या चाचण्या– निवडणुकांचा आढावा घेण्यात आला. ती वाटणी कशी झाली ह्याविषयीची माहिती देताना न्यूयॉर्क टाइम्सचा वार्ताहर म्हणतो; की इजिप्तमधील पिरॅमिडसारखीच ती रचना केली गेली होती. त्यातील मुख्य मुख्य आधारस्तंभ मिचेल, मॉरिस स्टान्स, झिगलर, चॅपिन व रोझ मेरी वुडस.

## मिआमी बीच

रिपब्लिकन पक्षाचे १९६८ चे अधिवेशन मिआमी बीच येथे भरणार असल्याचे नक्की झाले होते. समुद्रकिनाऱ्यावरचे हे शहर अतिशयच देखणे, आकर्षक आणि नीटनेटके, सृष्टिसौंदर्य तर फारच मनोहारी. लांबच लांब समुद्रकिनारा, किनाऱ्यावर अनेक मोठी भव्य हॉटेल्स आणि मोटेल्स, नाईट क्लबमधून रात्ररात्र सुंदर सुंदर तरुण पोरींचे नाच–गाणी–तमाशे चालूच. सट्टा–जुगार तर काय विचारायलाच नको. पाण्यासारखा पैसा उधळणारे शोकिन दरवर्षी येथे येऊन मजा लुटणारच.

किनाऱ्याच्या अगदी एका बाजूला सगळीकडे शांतच शांत. लहान लहान बंगलीवजा घरे बांधून शांततेत आयुष्य कंठणारी साठ साठ वयाच्या वरची जोडपी ह्या किनाऱ्यावर मजेत फिरताना तुम्हाला दिसणारच. त्यांना मोठासा हव्यास नाही, कसली लालच नाही– ध्येयवाद नाही. मिळणाऱ्या मासिक निवृत्तिवेतनावर व सोशल सिक्युरिटीकडून मिळणाऱ्या पैशावर जगणारे हे निरुपद्रवी मानव– येथे वावरत असणार. समोर दूरवर दिसणारी सौंदर्यनगरी पाहिल्यावर त्यांना खासच वाटत असावे की आपण उगीचच लौकर म्हातारे झालो. नाहीतर त्या भागातील मौज-मजा खासच लुटली असती.

ह्या मिआमी बीचवर रिपब्लिकन पक्षाचा ह्या वर्षीचा मेळावा भरणार होता. ह्या बीचवरील १० मैलांच्या एका बाजूच्या कोपऱ्यातील किनारपट्टीवरील हॉटेलसमधून रिपब्लिकन पक्षाच्या २६६६ प्रतिनिधींनी तळ ठोकला होता. आतापर्यंत शिकॅगो व सॅनफ्रान्सिको येथे भरलेल्या अधिवेशनापेक्षा ह्या ठिकाणी सगळेच नवीन नवीन व प्रशस्त. त्या शहरातून प्रत्यक्ष शहरातच हॉटेल्स, त्यामुळे इतके जमणारे प्रतिनिधी व प्रेक्षक थोडया जागेत कसेतरी सामावून घेत, व वेळेच्या अभावी कामे झटापट उरकली जात.

मिआमी बीचमध्ये तशा काहीच अडचणी नव्हत्या. उत्तम उत्तम

## फॉरिन अफेअर्स म्हणजे निक्सनचे हुकुमी पान

खाद्यपदार्थ, मस्त पेये, उन्हात भटकून नंतर विस्तीर्ण तलावातून पोहणे– असेच प्रतिनिधींचे कार्यक्रम. मुख्य परिषदेत काय कामकाज चालले आहे ते जवळच्या रेडिओ व टेलिव्हिजनवरून समजणार व तेच विषय आपआपसात बोलणार.

अगदी उत्तरेच्या बाजूला AMERICAN HOTEL हे विशिष्ट प्रतिनिधींच्यासाठी राखून ठेवलेले हॉटेल. रॉकफेलर, निक्सन, रिगन, रोमने ह्याच हॉटेलमध्ये उतरलेले.

रोमने व रिजन ह्यांचे म्हणणे रॉकफेलर हा अगदी हुकमी एक्का. नक्कीच निवडला जाणार. पण त्यांना माहीत नव्हतं की रॉकफेलरची ताकद बाहेरच्या जगात फार मोठी– पण पक्षसंघटनेत अगदीच कमी. स्वतः रिपब्लिकन पक्षाचा असून डेमोक्रॅट्समध्ये वजन चांगले व स्वतंत्र उमेदवारात तर उत्तमपैकी. पुरा वर्षभर रॉकफेलरचा प्रचार चालूच होता.

गुप्त मतदान कशा प्रकारचे होईल ह्याचे अंदाज सुरू झाले. निरनिराळ्या संस्था व कंपन्या ह्यांचे अंदाज छापून येत होते. कमीतकमी. ६६७ मते पडणारा निवडून येणार होता. E. B. S. नी निक्सनला ६५७ मते पडतील असा अंदाज दिला होता. A. B. C. नी ६२३ मते पडतील असा अंदाज केला व New York Times नी ६१९ मते पडतील असे छापले.

पहिल्या गुप्तदानाच्या फेरीत निक्सनला ५४१, रॉकफेलरला ३०६ व रिगनला २६७. दुसऱ्या फेरीत निक्सनला ४५९, रॉकफेलरला ४३० व रिगनला ३१८ आणि तिसऱ्या फेरीत निक्सनला ३८७, रॉकफेलरला ४८१ व रिगनला ३३६ अशी मते पडली.

तिघांही उमेदवारांच्या निवडून येण्याच्या आशा दुणावल्या.

५ ऑगस्ट १९६८ परिषदेच्या सकाळच्या अधिवेशनाला अर्धेदेखील प्रतिनिधी हजर नव्हते.

व्हिएटनाम युद्धावरील मोठे वादंग माजले. चर्चेनंतर Breach of Faith 'विश्वासघात' असा जॉनसन सरकारवर निंदाव्यंजक ठराव निक्सनने मांडला व तो सर्वानुमते पसार झाला.

मंगळवार ८ ऑगस्टला मतांची नोंद करून घेण्याला सुरुवात झाली. दुपारी मतमोजणीला सुरुवात झाली. मिचिगनचा जेरॉल्ड फोर्ड ह्या कमिटीचा अध्यक्ष होता. निकाल लागला.

निक्सनला ६९२, नेल्सन रॉकफेलरला २७५ व रोनाल्ड रिगनला १८२ मते पडल्याचे जाहीर करण्यात आले.

हॉटेलबाहेर सकाळपासूनच निदर्शने सुरू होती. पोलीस बंदोबस्त होता. तरीदेखील संध्याकाळी दंग्याला सुरुवात झाली. हजारो निग्रो जमा झाले होते. अखेर गोळीबार करावाच लागला. ९ माणसे दगावली– अनेक जखमी झाली.

त्याच रात्री रॉकफेलरनी निक्सनला टेलिफोन करून त्याची वारेमाप स्तुती करून त्याचे अभिनंदन केले.

उपराष्ट्रपतीपदासाठी कोणाचे नाव सुचवावे हा बिकट प्रश्न होऊन बसला. न्यूयॉर्कचा मेयर जॉन लिंडसे, सॅन डिआगोचा बॉब वुइल्सन, कॅलिफोर्नियाचा रॉबर्ट किंच, युकलाचा Chancellor मर्फी अशी अनेक नावे त्याला सुचविली गेली.

हिएटन प्लाझाच्या १५ व्या मजल्यावरील भव्य व विस्तीर्ण अशा दिवाणखान्यात बोलणी सुरू झाली. आयत्यावेळी Glamour Bay रोनाल्ड रिगन ह्यांचेपण नाव सुचविले गेले.

निक्सनच्या मनात दोन नावे घर करून बसली होती. ती म्हणजे मॅसॅच्युसेटसच्या जॉन व्होल्पे व मेरिलॅन्डचा स्पिरो ॲग्न्यू.

सकाळी ९ वाजता बैठक भरली होती ती दुपारी १ वाजता संपली. बैठकीला पक्षातील काही वजनदार सदस्य, गव्हर्नर्स, मेंबर्स व रॉबर्ट फिंच, हल्डमन, मिचेल, जॉन टॉवर, रॉबर्ट एल्सवर्थ व नॉर्टन पण हजर होते.

शेवटी स्पिरो ॲग्न्यूचे नाव मान्य झाले व निक्सननी बातमीदाराच्या जवळ सांगून टाकले.

कामाला सुरुवात झाली. न्यूयॉर्कच्या Park Avenene मध्ये ५४ व ५७ रस्त्यावरील आलेशाही बिल्डींगमध्ये कार्यालय उघडले गेले. २५० व्यक्ती सतत ३ महिने राबत होत्या. ६२ व्या रस्त्यावर निक्सन राहात होता. तेथून कार्यालयाची जागा जवळच होती. निवडणुक-मंडळाच्या पैशाचा हिशोब मॉरिस स्टान्स हा पाहात होता. हाच मॉरिस स्टान्सपुढे निक्सनच्या मंत्रिमंडळात व्यापार सेक्रेटरी झाला. मनुष्य अतिशय गंभीर. विचारी व शांत. हिशोब ठेवण्यात दर्दी व वाकबगार. आयसेनहॉवरच्या निवडणुकीच्यावेळी पण तो खजिनदारच होता. निक्सन-निवडणुक फंडाकरिता त्याने ८० लाख डॉलर्स जमा केले व पुढील ३ महिन्यात तो २० लाख आणखी जमा करणार होता. त्यापैकीं १० लाख डॉलर्स रेडिओ व टेलिव्हिजन मार्फतचा प्रचार खर्च, २ लाख, खेड्यातून प्रचार खर्च, १६ लाख शहरातील प्रचार खर्च, २ लाख टपाल हंसील, ५ लाख प्रवास खर्च असे महत्त्वाचे आकडे होते.

४४५ पार्क ॲव्हेन्यू येथील कार्यालयात जॉन मिचेल बसत असे व सर्व खात्यावर त्याचे बारीक लक्ष असे. मुख्य त्याचे लक्ष केन्द्रीभूत झाले होते ते एकाच विषयावर की ५३८ Electoral Votes पैकी निक्सनला २७० मते कशी मिळवून द्यावयाची तो ह्याच नादात आणि हिशोब करण्यात गढलेला असावयाचा. त्याच्या अंदाजे न्यूयॉर्क ४३, पेन्सिएव्हानिया २९, न्यू जर्सी १७, ओहिओ २६, मिचिगॉन २१, इलिनॉइस २६ आणि टेक्सास, मिसुरी व कॉलिफोर्निया प्रत्येकी ३५ अशी गणती सारखी चालू असे. निरनिराळ्या ठिकाणचे अंदाज संध्याकाळी हातात आले की पुनः त्याची मोजणी, आकडेवारी व जुळवाजुळव चालत असे व कसेतरी अखेरी बेरीज २७० हा आकडा तो जमवी. निवडणुकीमध्ये निक्सनला ३०२, ह्युबर्ट हंफ्रेला १९१ व वॉलेसला ४५ अशी Electoral Votes अखेरी पडली! अंदाजाच्या बाहेर.

निक्सनचा बाहेर दौरा–परराष्ट्रीय धोरण व्हिएटनाम युद्ध–चीन-रशियाशी संबंध व जॉनसनच्या राज्यकारभारावर झोड सतत चालूच होती.

रविवारी ६ ऑक्टोबरला सेक्रेटरी ऑफ स्टेट डीन रस्क व रशियाच्या परराष्ट्रीय मंत्री ऑन्द्रे ग्रोमीको जेवणासाठी एकत्र जमले होते. व्हिएटनामचा विषय काढला गेलाच. ग्रोमिकोच्या बोलण्यावरून रशियाने उत्तर व्हिएटनाम सरकारवर चांगलीच पक्कड बसविली असून चीन मागे हटत चालला होता, असा अंदाज निघाला. Pro–Chinese Communists बाहेर पडत आहेत तेव्हा आताच्या परिस्थितीत हॅनोई सरकार बोलणी-चालणी करण्यास तयार होईल

असा डीन रस्कने अंदाज बांधला.

ऑक्टोबरच्या १० तारखेला Apollo No. 7 चे उड्डाण व ११ दिवसानंतर पृथ्वीवर परत येणे ही एक डोळे दिपविणारी घटना घडली. पण पृथ्वीवर अपोलो–७ उतरले त्यावेळी निग्रोचे मोठ्या प्रमाणावर चालू झालेले दंगे अपोलो वीरांनी अवकाशातूनच पाहिले.

युनायटेड काँग्रेसचे ९० वे अधिवेशन १४ ऑक्टोबरला संपले. ह्या अधिवेशनच्या काळामध्ये अनेक महत्वाच्या गोष्टी घडल्या– मार्टीन ल्यूथर किंग व केनेडीचा खून, निग्रोंकडून जाळपोळी, खून, दरवडे, अत्याचार, फेडरल इन्कमटॅक्समध्ये १० टक्के वाढ, बंदुकांच्या विक्रीवर कायद्याने बंदी, रशियाची झेकोस्लोव्हाकियावर स्वारी आणि अखेर व्हिएटनाम युद्ध.

११ ऑक्टोबर पासून उत्तर व्हिएटनामचे दूत सल्लागार अमेरिकेच्या सल्लागारांना पॅरिसमध्ये भेटून बोलणी करीत होते व अखेरी बोलणी करावयाचे वेळी दक्षिण व्हिएटनामचे प्रतिनिधी बरोबर घ्यावेत असे ठरले आणि तसे झाले तर अमेरिका करीत असलेले बॉम्बहल्ले बंद करील हे पटवून देण्यात आले.

बोलणीचालणी अगदी गुलदस्त्यात चालली होती परंतु अखेर २८ ऑक्टोबरला बातम्या फुटल्या.

आपण जाण्याच्या अगोदर काहीतरी चांगले करून जावे ह्या उद्देशाने ३१ ऑक्टोबरला प्रेसिडेंट लिंडन जॉन्सन ह्यांनी राष्ट्राला उद्देशून भाषण केले, त्यात तो म्हणतो–

'I have now ordered that all air naval and artillary bombardment of North Viet-Nam cease at 8.00 A. M. Washington time, Friday morning.'

जॉन्सनने पुढे सांगितले की पूर्ण युद्धविराम कसा करावयाचा ह्यासंबंधी वाटाघाटी निरनिराळ्या राष्ट्रांचे प्रतिनिधी करतील.

२४ तास उलटले नाहीत तो न्यूयॉर्क टाईम्सच्या पहिल्याच पानावर ठळक बातमी–' SAIGHON OPPOSES PARIS TALKS PLANS'

हे उद्योग कोणी, कुठून कसे चालविले होते त्याची अमेरिकन जनतेला काहीच कल्पना येईना.

डेमोक्रॅटिक उमेदवार ह्यूबर्ट हँफ्रे हा निवडून द्यावयास आता काहीच हरकत नाही असे लोकमत तयार करण्याचा हा रचला गेलेला एक डाव.

जॉन्सनची इच्छा चांगली होती पण झाले भलतेच. दक्षिण व्हिएटनाम समेटची पॅरिसला होणारी बोलणी व त्यात भाग घेणार नाही हे वृत्त बाहेर पडल्याबरोबर जॉनन्सनची व डेमोक्रॅट पक्षातील जबाबदार व्यक्तींची एकच कल्पना झाली व ती म्हणजे ह्या प्रकरणाच्या बुडाशी दुसरे कोणी नसून निक्सन ही व्यक्ती आहे.

५ दिवसावर निवडणुका आल्या. अमेरिकाभर व्याख्यानाचे दौरे, रेडिओ-टेलिव्हीजनवर मुलाखती प्रचाराचा धुमधडाका, गाठीभेटी-कार्यक्रमांना उत आला होता. निक्सनने गेली ४ महिने जेवढी व्याख्याने दिली त्यात एकच मुद्दा–

I say that after 4 years of war in Asia, after 35,0000 dead and 2 lacs causalites, America needs new leadership––

५ नोव्हेंबर १९६८ मतदानाचा दिवस येऊन ठेपला, ७ कोटी, १० लाख अमेरिकन आज मतदान करणार होते.

निक्सन आज विमानातूनच सारखा प्रवास करीत होता. खाली न्यूयॉर्कला जॉन मिचेल ह्याच्याशी तो मतदानाच्याविषयी माहिती घेत होता. त्याच्याबरोबर विमानात प्राइस, बुचॉनिन, सफायर, गार्मेन्ट, शेक्सपिअर, क्लीन, एल्सवर्थ, फिंच, मॅकहार्टर, बेब रेबे होते. खालून सारखे टेलिफोनने विमानात मतदानाचे अंदाज धाडले जात होते.

मतदान संपले, रातोरात मताची मोजणी झाली. एकंदर मतदान ७३,१८६,८१९ झाले. निक्सनला ३१,७७०,२३७ मते पडली व तो सिनेटमध्ये ५७, डेमोक्रॅटस व ४३ रिपब्लीकन्स निवडून गेले.

३१ रिपब्लिकन्स गव्हर्नर्स निवडून आले. हाऊसमध्ये २४३ डेमोक्रॅटस व १९२ रिपब्लीकन्स निवडले गेले. ३२ संस्थानांमधून निक्सनला Electoral Votes ३०२ पडली.

२० जानेवारी १९६९ ला लिंडेन जॉन्सन निक्सनच्या हातात सूत्रे देऊन व्हाईट हाऊसमधून निघून जाईल. लिंडन जॉन्सन हा सरळ, नाकासमोर चालणारा मनुष्य. केवळ केनेडीचा खून झाला म्हणून तो १९६३ मध्ये राष्ट्राध्यक्ष झाला पण १९६४ मध्ये निवडून आल्यावर त्याला परराष्ट्रीय राजकारण हाताळता आले नाही. एकवेळ त्याने युद्धबंदी १९६४ मध्येच केली असती तर पुष्कळ अनर्थ टळले असते व त्याची कारकीर्द नाव घेण्यासारखी झाली असती.

जॉनन्सने निक्सनवर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकल्या. आयसेनहॉवरनी केनेडीवर टाकलेल्या जबाबदाऱ्यापेक्षा कितीतरी पटीने त्या अधिक होत्या.

निक्सननी त्या जबाबदाऱ्या संभाळल्या का ?

एकच उत्तर : त्या जबाबदाऱ्या संभाळण्याला निक्सन नालायक ठरला.

कॅलिफोर्निया संस्थानात वर्षानुवर्षे राहिलेला निक्सन, ८ वर्षे वॉशिंग्टनला काढून, नंतर १९६२ पासून जवळ जवळ १९६८ पर्यंत न्यूयॉर्कमध्येच राहात होता. त्याला न्यूयॉर्कचे काहीच आकर्षण नव्हते. त्याचे सगळे ध्यान वॉशिंग्टनकडे होते.

१९६८ मध्ये राष्ट्रपतीपदावर निवडणुक झाल्यानंतर तो पियर हॉटेलमधील Presidential Suite मध्ये राहावयास गेला. नजिकचे ब्लॉक्स येणारे जाणारे गव्हर्नर्स, सिनेटर्स, काँग्रेसमन ह्यांच्यासाठी राखून ठेवलेले होते. हॉटेलच्या सर्व भागात कडक पोलिस बंदोबस्त होता.

आपले मंत्रिमंडळ कसे बनवावयाचे, कोणकोणाला आत घ्यावयाचे ह्याविषयी त्याच्याशी सल्लामसलत करण्यासाठी त्याच्याकडे येणाऱ्याची रीघच रीघ !

## जबाबदाऱ्या सांभाळायला निक्सन लायक ठरला.

नोव्हेंबरच्या अखेर त्याने Press Conference घेतली त्यात त्याने आपले विचार स्पष्ट केले. तो म्हणाला–

संबंध आशिया खंड कम्युनिस्ट करून टाकावयाचा ही चीनची प्रबल इच्छा आहे व त्या दिशेनेच त्याची पावले पडत आहेत. ह्या वृत्तीला शह द्यावयाचा असेल तर आशिया खंडातील प्रत्येक राष्ट्र मजबूत बनविणे हे आपल्या हिताचे ठरणारे आहे. तसे झाले तरच आशियातील राष्ट्रे Collective Security चा विचार करू लागतील. जपान ह्या बाबतीत पुष्कळच आघाडीवर आहे त्याचाही आपल्याला उपयोग करून घेता येईल.

युरोपमधील राष्ट्रे जेव्हा Collective Security चा विचार करू लागली. तेव्हाच रशिया एकत्र बसून विचार करू या असे म्हणू लागला. त्याच्या अगोदर नाही; तेच आशियाच्या बाबतीत व्हावयास पाहिजे.

दुसरे, आपल्या राष्ट्राचे अंदाजपत्रक पाहता संरक्षण ह्या खात्यावर अवाढव्य खर्च होत आहे त्याला पहिल्यांदा काटा लावला पाहिजे, आणि त्यासाठी युद्धबंदी असून ARMS RACE शस्त्रसंभार वाढवित राहाणे ह्याला पायबंद घातला गेला पाहिजे. ह्या योगाने नाहीतर आपण इतके दडपून जाऊ की, राष्ट्राचे स्वातंत्र्य टिकविणे हे देखील दुरापास्त होऊन जाईल.

व्हिएटनाम युद्धात १९६८ सालातच १६,५११ अमेरिकन सैन्य मारले गेले होते, आणि अमेरिका हे युद्ध जिंकण्याची तिळमात्रही आशा नव्हती. फार काय पण तहनामा करून शांतता प्रस्थापित करणे हे देखील कठीण होऊन बसले होते.

खुद्द अमेरिकेत वैफल्य आणि नैराश्य तरुण वर्गात पसरलेले होतं. २० जानेवारी १९६१ ला राष्ट्रपतीपद स्वीकारताना केनडी म्हणाला होता–

'Ask not what your country can do for you, but see what you can do for your country.'

ह्या शब्दांची निक्सनला सारखी आठवण होत होती. आपणही स्वत: हे निवडणुक मंडळ स्थापन करावयाच्या वेळी म्हटले होते, 'The country needs the lift of a driving dream.' विधान त्याला सतावत होते. २० जानेवारी १९६९ ला राष्ट्रपतीपदाची धुरा खांद्यावर घेताना केलेल्या भाषणात निक्सन म्हणाला :

'The greatest Honour history can bestow, is the title of PEACE MAKER——We find ourselves rich in goods, but ragged in spirit, reaching for the magnificent precision for the Moon, but falling into rancous discard on earth. We are cought in war–Wanting PEACE. We are torn by divisions-wanting unity.

My friends, let me make one thing clear. This is the nation of laws and, as Abraham Lincoln has said, 'No one is above law, No one is below the law–And we are going to enforce the law.'

[ क्रमशः ]


प्रसिद्ध झाले !




लेखक : पु. ल. इनामदार

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

पुस्तके

# The Ultra Secret

By F. W. Winterbotham

(Dell Books, Pages 286 $ 1·75)

दुसऱ्या विश्वयुद्धात हिटलर काय काय हुकुम सोडीत होता ते १९३९ पासून चर्चील, रुझवेल्ट व आयसेनहॉवर यांना अचूक माहिती होते हे बऱ्याच लोकांनी ऐकले नसेल. ह्याचे मुख्य कारण म्हणजे एक पॉल (जो एका जर्मन फॅक्टरीत काम करीत होता.) १९३८ मध्ये मित्र राष्ट्राकडे (Allies) defect झाला व त्यानी Enigma नावाच्या एका Coding machine ची माहिति शक्य तेवढ्या तपशीलवार दिली. ब्रिटनच्या क्रिप्टोग्राफर्सने बरेच कष्ट घेऊन हा वायरलेस मधील कोड 'भाषांतर' करायला सुरवात केली. उदाहरणार्थ Enigma वर असे आकडे आले १३४८. ९९०४. ८४७०. ९६०९ म्हणजे त्याचा असा अर्थ निघतो 'To the Commanding Officer, the Division will move on Monday.' ह्या सर्व प्रकरणाला Ultra हे नाव देण्यात आले. जवळ जवळ ३५ वर्षेपर्यंत ह्या 'अल्ट्रा सीक्रेट' बद्दल फार कमी लोकांना माहिती होती. विंटरबॉथॅमनी हे पुस्तक बहुतांशी घटनांच्या आठवणीवरून लिहिले आहे. ब्रिटनमध्ये 'अल्ट्रा'चे नाव सुद्धा उच्चारण्यास अगदी अलीकडे बंदी होती. ती नुकतीच उठवली आहे. 'अल्ट्रा' मुळे जी जी माहिती हाती आली होती ती व्हाइटहॉलमध्ये अगदी सुरक्षित व चिरेबंद जागी ठेवण्यात आली आहे. ह्या कारणामुळेच विंटरबॉथॅमला पुस्तक निव्वळ स्मरणशक्तीच्या सहाय्याने लिहावे लागले.

कधी कधी तर हिटलरने त्याच्या जनरल्सना वायरलेसने दिलेले ऑर्डर्स अवघ्या एक तासात भाषांतर करून चर्चीलसमोर ठेवण्यात येत असत. चर्चीलने तर एकदा 'अल्ट्रा' म्हणजे 'माझे अगदी गुप्त आयुध आहे' असा उल्लेख केला होता.

सन १९४० मध्ये जर्मन विमानांनी इग्लंडच्या कव्हेन्ट्रीवर बेसुमार बॉंब फेकले त्यात कितीतरी नागरीक ठार झाले. विन्सटन चर्चीलला ह्या हल्ल्याची माहिती बरीच आधी मिळाली होती. तरीपण त्याने कव्हेन्ट्रीच्या लोकांना हालवायचा हुकूम दिला नाही व कित्येक जीवांचा त्याने अक्षरशः बळी दिला. अर्थात ह्याचे मुख्य कारण म्हणजे जर कव्हेन्ट्रीतील लोकांना हलवले असते तर हिटलरला निश्चितच शंका आली असती की मित्र राष्ट्रांनी आपला Code फोडला आहे. इतर काही ठिकाणीही चर्चीलला ह्याच कारणामुळे असेच कठीण निर्णय घ्यावे लागले. हिटलरचे अगदी सुप्त हुकूम त्याच्या फील्ड कमांडर्सना पोचण्याच्या आधीच चर्चीलच्या हाती येत असत! दुसरे महायुद्ध मित्र राष्ट्रांनी जिंकले त्याला हे 'अल्ट्रा ऑपरेशन' फारच मोठ्या प्रमाणात कारणीभूत झाले. हिटलरचे वायरलेसवरील गुप्त-संदेश संख्येच्या आकड्यावरून 'भाषांतरीत' करायचे मुख्य काम ह्या पुस्तकाचा लेखक विंटरबॉथॅमच करीत असे. आता विंटरबॉथॅमचे वय ७७ वर्षे आहे. व त्यानी म्हटले आहे की माझी स्मरणशक्ती आहे तोपर्यंत मला आठवणाऱ्या सर्व गोष्टी मी ह्या पुस्तक रूपाने लिहून काढल्या आहेत.

ह्या पुस्तकामुळे आतापर्यंतच्या दुसऱ्या विश्वयुद्धाच्या रूढ कल्पनांना बराच धक्का बसेल. कारण दुसऱ्या महायुद्धातील प्रख्यात जनरल मोंटगोमेरीविषयी बऱ्याच 'आख्यायिका' पसरल्या आहेत. आणि त्या आख्यायिका पसरविण्यात खुद्द मोंटगोमेरीनीच पुढाकार घेतला असेल! उदाहरणार्थ रॉमेल El Alamein वर कधी हल्ला करणार, ह्याचा अचूक 'अंदाज' मॉंटगॉमेरीला आला, असा समज आहे. पण 'अल्ट्रा'मुळेच त्याची अचूक माहिती मिळाली असावी.

ब्रिटनवर जेव्हा हल्ला केला गेला त्यावेळी गॉरींगने '३ विमानास एक' असा एक बेत आखून Rayal Air Force ची राखरांगोळी करावी असे ठरवले होते. पण 'अल्ट्रा'मुळे ब्रिटनने आपली विमाने अगदी जपून व वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन गॉरींगचा हा बेत डावलला व शेवटी शेवटी लुफ्तवाफ इतक्या डबघाईला आले की, ह्या बेतावर त्यांना पाणी सोडावे लागले.

वर उल्लेख केलेल्या El Alamein च्या उत्तर आफ्रिकेच्या रणातल्या युद्धामुळे दुसऱ्या महायुद्धास (विशेषतः ब्रिटनला) एक वेगळीच कलाटणी मिळाली. जसजसे D-day landings नॉर्मंडीच्या जवळजवळ येत गेले तसतसे 'अल्ट्रा'वर पाळत ठेवून नाझी सावध तर झाले नाहीत ना, त्याचा ठाव घेण्यात आला. पण नाझी सावध झाल्याची 'अल्ट्रा'वर कोणतीच चिन्हे दिसेनात. त्यामुळे Oporatin Overlord नी सर्व स्तिमीतच झाले!

हिटलरला जेव्हा जेव्हा काही चुकले आहे असे वाटले की, तो रिमोट कंट्रोलने वायरलेसवरून हुकूम सोडीत असे. ह्या कारणामुळे मित्र राष्ट्राला हिटलरचा मास्टर प्लॅन त्याच्याच तोंडून मिळाला! नाझी Falaise मध्ये गुंतले असता आयसेनोवरनी जनरल पॅटनला जर्मनीच्या पूर्वेकडे पाठवले. विंटरबॉथॅम म्हणतो की, आमच्याकडे जर 'अल्ट्रा' नसते तर रशियाशी आमची गाठ Elbe जवळ न पडता ऱ्हाईनजवळ पडली असती!

ह्या 'अल्ट्रा'मुळे जशी मॉंटगोमरीची युद्धातली 'तोलामोलाची' कामगिरी थोडी कमी तोलाची झाली. तशीच चर्चिल, आयसेनॉवर वगैरे नेत्यांच्या तोलामोलाच्या कामगिरीचा पुनश्च आढावा घेण्यात येईल का?

जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| १. | **रघुनाथाची बखर** : (चरित्रात्मक कादंबरी) श्री. ज. जोशी | रु. ४०/- |
| २. | **आषाढमेघ** : (कथासंग्रह) सौ. सुमती क्षेत्रमाडे | रु. १८/- |
| ३. | **राजवैरागी** : (ऐतिहासिक) गो. मा. पुरंदरे | रु. २०/- |
| ४. | **वाळूचा किल्ला** : (कथासंग्रह) व्यंकटेश माडगुळकर | रु. ८/- |
| ५. | **चंद्रोदय** : (कथासंग्रह) मधु मंगेश कर्णिक | रु. ११/- |
| ६. | **माळरान** : (कथासंग्रह) रा. रं. बोराडे | रु. १०/- |
| ७. | **एकेकाचं नशीब** : (कथासंग्रह) सौ. इंद्रायणी सावरकर | रु. ७/- |
| ८. | **गलोल** : (लेखसंग्रह) अनंत मनोहर | रु. ८/- |
| ९. | **कुंकू पुसणारा हात** : (पोलीस कथा) व. कृ. जोशी | रु. १८/- |
| १०. | **टेकाडेभाऊजी** : व. पु. काळे | रु. १८/- |

☐ दोन ते चार पुस्तकाची एक ते तीन वर्षांपर्यंतची वर्गणी भरल्यास आपला भरपूर फायदा होईल!

**दि फिनिक्स लायब्ररी, सदाशिव पेठ, पोस्टासमोर, पुणे ३०.**

# विराट वासनेचे विस्कळित वखवखलेले प्रदर्शन !

# माय-स्टोरी : कमला दास

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी, मिरज

कमला दास या कवयित्रीचे 'कमला' हे नामकरण करताना ते किती सार्थ ठरणार आहे याची तिच्या मातापित्यांना ४५–४६ वर्षांपूर्वी सुतराम कल्पना नसेल. प्रस्तुत ग्रंथाची लेखिका आणि तिची आत्मकथा यांच्याबाबतीत चिखलातले कमल हा दृष्टान्त लागू पडण्यासारखा आहे. अर्थात हे विधान करताना माझ्या मनात चिखल म्हणजे घाण हा अर्थ अभिप्रेत नाही; उलट कमलाच्या धारणेसाठी असलेली चिखल ही अटळ अपरिहार्यता आहे. कमला दास ही स्वनामधन्य लेखिका बऱ्याच रसिकांना इंग्रजीमध्ये कविता करणारी (Indo-Anglican) सरस कवयित्री म्हणून ज्ञात आहे. (बाईंना १९६३ सालचे PEN चे पारितोषिकही मिळाले आहे.) तिच्या कवितांतून सूक्ष्म, सरल प्रेमभाव, वासना, लस्ट अँण्ड पॅशन, एक्स्टसी अँण्ड अँगनी, उदासीन हतप्रभ हळुवारपणा अनुभवायला मिळतो. मला स्वतःला कमला दासच्या कविता आकर्षक वाटल्या तरी 'ग्रेट' वगैरे वाटल्या नाहीत कधीच. सध्या कमला दास हे नाव, आणि 'माय-स्टोरी' ही तिची आत्म–काम–कथा गाजत आहेत, अनेक साहित्यबाह्य कारणांनी.

'माझी गोष्ट', 'एन्ते कथा' (मल्याळम्–१९७४), 'माय-स्टोरी' (इंग्लिश १९७६) शीर्षकावरून सरळ साधे आत्मचरित्र वाटते. अर्थात ते तसे नाही. कमला दास ही वादळी, वादग्रस्त व मुक्त सेक्स–कल्पना असणारी भारतीय स्त्री आहे. म्हणजे प्रारंभीच कमला दास या व्यक्तीला सहानुभूती (खरी) असणाऱ्यांची संख्या घटते. त्यातच भर म्हणजे तिच्या लिखाणाने 'मुक्त–स्त्री' या संकल्पनेचा जेवढा विपरीत अर्थ लावता येईल तेवढा लावण्याची सोय, तिने आपल्या आत्मचरित्राने उपलब्ध करून ठेवली आहे. मुळात 'एन्ते कथा' मल्याळम् साप्ताहिक 'मातृभूमी' मध्ये दर आठवड्याला एक प्रकरण या स्वरूपात लिहिली गेली. साप्ताहिक मातृभूमीचा खप २–३ लाखांच्या घरात आहे. साप्ताहिक हप्ता लिहायचा ठरल्याने प्रत्येक प्रकरण साचेबंद झाले आहे. ही माला साधारण वर्षभर चालली असावी, कारण आत्मकथेत छोटी पन्नास प्रकरणे आहेत. वर्तमानपत्री लिखाण म्हणून की काय न जाणे, कमला दासच्या आत्मकथेच्या प्रकरणांची शीर्षके निष्कारण कामुक–सनसनाटी आहेत. शिवाय साप्ताहिकाच्या लाखो वाचकांची करमणूक करण्याच्या दृष्टीने बाईने बहुतेक भर आपल्या प्रेम–काम–जीवनावर–चेष्टितावर दिल्याचे स्पष्ट दिसते. संपूर्ण आत्मचरित्र वाचून झाल्यावर आठवण राहते ती बाईंच्या 'सेक्सी' तन–मनाची. आठवतात फक्त दोनच दोन व्यक्तिरेखा–कमला व तिचा पती मि. दास. बाकीची मंडळी–तिचे आईबाप, गणगोत, मुले आणि प्रियकर (बहुतेक सर्व निनावी) सारी धूसर, ओझरती दूर दिसणाऱ्या पार्श्वभूमीसारखी आठवतात. या चरिताचा एकूण 'Milien' प्रकर्षाने जाणवत नाही.

कमलाची कथा हॉस्पिटलमध्ये–शरीराच्या (आणि मनाच्या पण ?) अधु अवस्थेत जन्माला आली. तिचा शेवटही हॉस्पिटलातच होतो. नायिकेचे विविध आजार, ऑपरेशन्स्, मुलांचे आजार यांचे विस्तृत उल्लेख हे या आत्मचरित्राचे वैशिष्टय आहे. कथेतील 'इव्हेन्ट्स्' नाट्यपूर्ण घटना म्हणजे आजार आणि सेक्स्. संपूर्ण आत्मकथाभर प्रत्ययाला येते ते हे–कमला दासचे आकर्षक तरीसुद्धा आजारी (neurotic / न्यूरॉटिक) शबल व्यक्तिमत्त्व. तिला हृदयविकार आहे, तोही 'द्वयर्थी' स्वरूपाचा. आत्मकथा लिहिण्याचे कारण, कमलाच्या भाषेत : मनाला सतत ग्रासणाऱ्या अचानक मृत्यूच्या भीतीतून सुटका करण्यासाठी मी लिहिले... ' त्याचबरोबर 'हॉस्पिटलची बिले भागविण्यासाठीही लिहिले,' असेही कमला सांगते. एक हेतू जेवढा उदात्त, दुसरा तेवढाच इहवादी–पक्का व्यवहारी. (बाईंचे पती रिझर्व बँक ऑफ इंडियामध्ये बरीच वर्षे अधिकारी होते.) म्हणजे जी कथा हृदयाच्या आणि आर्थिक कमकुवतपणाच्या अवस्थेत लिहिली गेली, तिने कमलाला 'झपाटून' टाकले होते, असा तिचा दावा आहे. प्रारंभापासून वाटू लागते की, कमला एक 'पोज्' घेत आहे–देत आहे. 'माझ्या अंतःकरणाच्या सांदीकोपऱ्यात दडलेली रहस्ये, गुपिते उघड करण्यासाठी हे लिहिले कारण मृत्यूला सामोरे जाताना माझे मन स्वच्छ असावे अशी माझी इच्छा आहे. ' मात्र ही 'आत्म्याची निःश्वासिते' केवळ सनसनाटी, विक्राळ–शारीरिक–वासनेचे 'अँनेमिक' सांगाडे वाटावेत अशी उतरली आहेत. 'भरपूर' शरीरासोबत 'भरपूर' अनुभवशक्ती गाठीशी असलेल्या कमला दासच्या चरित्राला 'कनफेशन्सचे' करुण–उदात्त परिमाण लाभत नाही. वर्तमानपत्राच्या रविवारच्या चविष्ट मसालेदार पदार्थाच्या चवीएवढेच यश ही आत्मकथा गाठू शकते.

या 'आत्मकथेची' जाहिरात (ब्लर्ब–Blurb) 'मोस्ट सेन्स्युअस लाईफ-स्टोरी एव्हरटोल्ड' अशा अमेरिकन स्टाईलीत आहे. प्रत्यक्षात आपण वाचतो ती एक 'स्पायसी, सिझलिंग, टिटिलेटिंग स्टोरी' असते. या आत्मकथेच्या लिखाणाने कमलाच्या परिवारात, गणगोतात, गावात हाहाःकार उडवून दिला म्हणे. (असे 'अपूर्व' हाहाःकार प्रत्येक वर्तमानपत्रात रोज एक याप्रमाणे उडत असतातच की !) कमलाच्या लेखी 'माय–स्टोरी' ही तिची सर्वोत्कृष्ट कला–

कृती आहे ! अर्थात ज्या धीटपणाने, धारिष्ट्याने कमला आपले कामजीवन वर्णन करते, पावलापावलांवर प्रेम आक्रंदते ते विलक्षण आहे. या आत्मकथेचा घाट 'सिरीयलचा' असल्याने एकूण घाट चटकदार 'ट्रेलरचा' आहे. चटकदार शैलीत लिहिलेले चमकदार चरित्र फारतर 'बॅड न्यूजवरील' इतके बोअर वाटत नाही, एवढेच.

आत्मकथेचा प्रारंभ कलकत्त्याला राहणाऱ्या कमलाच्या शालेय जीवनाच्या वर्णनाने होतो. तपकिरी कमलाची गोऱ्या, युरोपियन शाळेतील अवस्था त्यात येऊन जाते. एकदा काही अर्धांग्ल व गोरे मुलांनी कमलाच्या भावाला रक्त वाहीपर्यंत मारले व रक्त वाहू लागल्यावर मुजोर निर्लज्जपणाने ती उद्गारली : 'च्यायला, या काळ्याचे रक्त लाल आहे की !' कमला किंवा तिचा भाऊ अशा 'गंभीर' गोष्टीदेखील आईवडिलांना सांगत नाहीत. कमलाला आईबापांची माया फारशी लाभली नाही. (वडिलांची कमलाला 'सलणारी' आठवण म्हणजे त्यांचे एरंडेल पाजणे !) या सामान्य रूपाच्या कमलाला बालपणापासून, इंग्रजी कविता रचण्याचे वेड होते–गतीही होती. एकदा तर तिच्या बाईंनी तिची एक कविता शर्ले नावाच्या मुलीच्या नावावर खपविली ! कमला तशी लहानपणापासून आत्मरत–आत्ममग्न आणि नार्सिसिस्टिक वाटते, कारण 'प्रत्येक स्वरचित कवितेने माझे डोळे भिजविले' असे तीच सांगते. तिला बालवयात स्मशानभूमीत फिरण्याचा जगावेगळा छंद होता. 'फ्रॉम द डेड नो हार्शनेस कुड इमेनेट, नो क्रूएल्टी.' 'आपली कातडी गोरी का नाही ?' हेही कोडे तिला बालपणी उलगडले नाही.

## प्रियकर क्रमांक १, २, ३

कमला मूळची नालपतची (मलबार–केरळ) बालपण कलकत्त्यात. नंतर तारुण्य वगैरे मुंबई, दिल्ली, कलकत्ता आणि केरळातल्या गावी. कमलाला पहिले 'प्रेमपत्र' लिहिले ते देवकी नावाच्या मुलीने; मात्र तिला ओढ होती ती गोविंद कुरूप नावाच्या शाळू सोबत्याची. (कमलाच्या 'अनेक' प्रियकरांपैकी आपल्याला समजते ते हे एकच नाव !) कमलाच्या हृदयात लहानपणापासून एक 'सॅफो' आणि एक 'राधा' दडून बसल्यासारखे दिसतात. तिला आत्मकथाभर ओढ लागली आहे ती वेणुगोपाळाची ! स्वतःला मीरा मानून त्या 'पुरुषोत्तमाची' असफल आस उरी बाळगून ती आत्मकथाभर वावरते. कमलाचे एक आजोबा 'रती–साम्राज्य' या ग्रंथाचे लेखक होते; तरी कमलाच्या किशोरकाळात सेक्स् हा शब्द 'टॅबू' होता. स्त्रियांच्या डोक्यात सेक्स् आणि रक्तपात असे विचित्र समीकरण नांदत होते. कमलाने आपल्या शालेय जीवनात लेस्बियन–प्रेमाचे दर्शन व अनुभवही घेतला.

कमला आपल्या रजोदर्शनाचे आठ ओळी वर्णन करते: फ्रॉक कसा रक्ताने भिजला, मांडीवरून रक्ताची धार लागली वगैरे. ऋतुप्राप्तीनंतर तिला कुंतीप्रमाणे सूर्याकडून पुत्र मागून घ्यावासा वाटू लागले व त्यासाठी ती आपल्या खोलीत नग्नावस्थेत सूर्यप्रकाशात उभी राहून प्रार्थना करते. ऋतुप्राप्तीनंतर झालेल्या शारीरिक परिवर्तनाविषयी ती लिहिते, 'एक दोन ठिकाणी केस फुटले आणि घामाचा वास बदलला.' (ही शब्दांची काटकसर रजोदर्शन वर्णनाच्या वेळी आढळत नाही.) मासिक पाळी सुरू झाल्यानंतर कमलाच्या पिताजींनी तिचे नृत्यशिक्षण बंद केले. कमलाला आपण दिसायला बरी आहो, हे दाताच्या डॉक्टरकडून कळते; नंतर ती जरा नटूथटू लागते. गोविंद कुरूपनंतरचा कमलाचा दुसरा प्रियकर एक विद्यार्थी नेता आहे. कमलाने प्रेम व्यक्त केल्यावर तो नेता काय म्हणाला– 'कमला, तू वेळ न दवडता मार्क्स–एंजल्स वाचायला लाग !' कमलाला स्वतःचे उघडे शरीर दाखविण्याची लाज वाटत असे; परंतु धडाधड प्रेम व्यक्त करायला ती लाजत नाही. कमलाचा प्रियकर क्रमांक तीन आहे तिचा कला–शिक्षक. त्याचे वय २९ आणि कमलाचे १४. त्या शिक्षकाने कधीही प्रेम व्यक्त केलेले नाही, तरी ती त्याला 'मूर्ख' म्हणते; कारण त्याने कमलाच्या ओठांचे चुंबन घेतले नाही. नंतर शिकवणी बंद होते. (कारण ऋतुप्राप्ती) एक दिवस मुसळधार पावसात ओलेनी कमला त्या शिक्षकाच्या घरी जाते. तो तिचे ओले कपडे आपल्या हाताने उतरवितो, सुकवितो, नंतर चुंबन न घेता तिला परत पोचवून देतो. मात्र त्याच्या ओल्या पाठीवरच्या उबदार स्पर्शाची याद कमलाला रडविते. अखेर कमलाचे पहिले चुंबन घेतले जाते; पण एका लेस्बियन मैत्रिणीकडून ! जरी कमलाची 'मनीषा' पुरी होत नाही, तरी शरीर स्त्री–पुरुषांकडून कुस्करले जातेच– ते देखील वारंवार !

ज्या मिस्टर दासची कमला पत्नी आहे, त्याचे विशेष नाम आपल्याला चरित्रभर कळत नाही. त्याचे वर्णन पहा. 'फार छान तरुण, एकदम अवगुणरहित–' (परंतु याच मिस्टरांची 'दासी' होण्यापायी आयुष्य फुकट गेल्याची तक्रार वारंवार आम्हाला ऐकावी लागते त्याचे काय ?') हा गुणी तरुण 'उंच असल्यामुळे थोडा पोका आणि त्याचे दात फार वाईट होते. तो सशक्त नसला तरी बुद्धिमान–इंटुक वाटतो.' मि. दास अर्थशास्त्राचा सुवर्णपारितोषिकविजेता असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामध्ये अधिकारी होता. या अशा तरुणाने पहिल्याच भेटीत कमलाच्या चेहऱ्यावर लाळचा-धसमुसळचा (स्लॉपी) चुंबनाची बरसात केली, ब्लाऊजवरून स्तन कुस्करले. कमला नाराज झाली, तरी अखेर वरमाला तिने त्यालाच घातली. (कमला दुसऱ्या पुरुषासंगे विवाह करू इच्छित होती; पण त्याला नोकरी नव्हती !) तिचे लहानपणचे श्रीमंत पतीची राणी बनण्याचे स्वप्न होते, ते थोडेफार पुरे झाले, पूर्णतः नव्हे. (कमला तेवढी व्यवहारी प्रत्येक बाबतीत आहे. म्हणून पुढे कितीही संबंध बिघडले तरी ही 'मुक्त' स्त्री घटस्फोटाचे नाव घेत नाही, तसेच आत्मकथेचे संपूर्ण मानधन घेण्याची चतुराई तिच्याजवळ आहे !) मि. दासशी झालेल्या विवाहापूर्वीच्या भेटी व विवाहोत्तर जन्मगाठ ही तर निव्वळ वखवखलेल्या वासनेची उघडीनागडी 'कुरूपे' आहेत. ती शारीरिक दृष्टया कोल्ड (cold) तर तो आक्रमक पशु ! हीच कमला वयाच्या तेरावर्षांपासून अर्पणोत्सुक तनमनाने वावरत आहे; परंतु प्रत्यक्ष पतीची तिला 'ॲलेर्जी' का ? तिला जो चाहतो, त्याला ती चाहत नाही. विवाहापूर्वीच्या एका भेटीत मि. दास तिला स्तन उघडे करायला सांगतो व एकीकडे त्याने घरातल्या मोलकरणीशी घेतलेल्या संभोगाचे वर्णन करतो.

विवाहाच्या पहिल्या रात्री बाहेर कथकलीचा कर्कश ठेका ऐकू येत होता, इकडे मि. दास तिच्या शरीराचे लचके तोडत होता– श्वापदाप्रमाणे. सारे 'भोगत' मनोमन ती कृष्णाची प्रार्थना करते.

प्रथम संभोगाचे वर्णन कमलाने बलात्कार असे केले आहे. अंगभर वळ आणि वेदना, हत्या आणि हिंसा. कमलाला वाटते, 'एकूण कायदेशीर लैंगिक संबंध रानटी, रासवट असतात.' मि. दासला कमला हवी होते असे नाही, रोज रात्री तुटून पडायला हवे होते एक स्त्री-शरीर. कमलाचा बालविवाह झाला होता हे खरे, परंतु म्हणून तिचे शरीर संभोगक्षम नव्हते हे तिचे मत 'शास्त्रीय' वाटत नाही. शिवाय १४ वर्षे वयात जिने तिघांवर प्रेम केले ती शरीराने 'गाभुळली' असली, तरी मनाने 'पिकलेली' होती. ती जेव्हा म्हणते : 'परहॅप्स् आय् वॉज नॉट नॉर्मल,' तेव्हा ते खरे पटते. शिवाय रोज रात्री वारंवार बलात्कार होऊन देखील कमला '१५ दिवस मी कुमारीच होते' हे सांगते तेव्हा वाचकाला धक्का बसतो. ज्याला कमला बलात्कार म्हणते ते खरे का? असे वाटू लागते. 'विवाहानंतर एक महिन्यात मी मुलगी होते, ती बाई झाले.' फुलपाखराचे सुरवंट झाले! नंतर गर्भारपणी देखील पतीने आपल्याला वारंवार भोगल्याची ती तक्रार करते. (पण त्यात तसे अनैसर्गिक काही नसल्याचे तज्ज्ञ डॉक्टर सांगतील.)

## देअर्स द् रब

नवरा आणि कमला शरीराने आणि मनाने दोन ध्रुवावर आहेत. कमलाची वृत्ती रोमँटिक आहे. अशक्याचा ध्यास तिला, अमृताची प्यास तिच्या ओठांना आहे. ती गोपाळकृष्णाची मुरली व्हायची खरी! तिला शरीरभोगापेक्षा इतर गोष्टींची ओढ आहे. 'त्याने मला मांडीवर घ्यावे, कुरवळावे, कानात काहीसे कुजबुजावे, मैत्री आणि उब द्यावी-घ्यावी. त्याच्या एका स्पर्शाने माझ्या जीवनातील उदास, एकाकीपणाला ओहोटी लाभावी,' वगैरे. ही 'हुरहुरी वृत्ती' खरी मानावी तर 'माझ्याशी लग्न करून मि. दासला सामाजिक प्रतिष्ठा, पैसा (की हुंडा?), माझे शरीर आणि भरदार स्तन यांची प्राप्ती झाली,' हीव्यवहारी वकिली-अक्कल पाहून काय म्हणायचे? विवाहात खरे प्रेम मिळत नाही, त्यासाठी विवाहबाह्य संबंधाची गरज कमला प्रतिपादन करते. (इथे प्रेम म्हणजे सेक्स का? कारण मि. दासच्या कोशात प्रेम याचा अर्थ लालसा असा आहे.) कमलाच्या पतीचेही तेच मत असावे, म्हणून तर तो सर्रास कमला आणि इतर स्त्रियांचा (आणि पुरुषांचाही) भोग घेताना दिसतो. कमला बाळंतपणासाठी माहेरी आली असता, मि. दास निःसंकोचपणे कमलाच्या चुलत बहिणीला मिठ्या मारतो. (मि. दास हा पुरुषी लैंगिकतेचा 'आयडियल टाईप' मानावा लागेल.) दासचा हा स्वैराचार पाहून कमला 'शरीराने' तरी व्यभिचार करण्याचे ठरविते. ज्या शारीरिक संभोगाचे (निदान मि. दासपासून) कमलाला वावडे होते, नेमके तेच करण्याचे ठरविते. म्हणजे कमलाला व्यभिचारासाठी निमित्त (scapegoat/स्केपगोट) हवे होते की, तिला तेच पाहिजे होते? शिवाय मनाने पतिव्रता राहून शरीराने व्यभिचार करण्याचा कुठला फ्रायडियन हट-योग असल्यास माहिती नाही! आपल्या माणसांच्या संस्कृतीत व्यभिचाराचे पाप मोजण्यासाठी शरीराचेच माप वापरतात. मानसिक व्यभिचार मोजता येत नाही, म्हणून बरे, नाहीतर शेक्सपियरच्या हॅम्लेटच्या शब्दात नो वन् वुड एस्केप व्हिपिंग!

व्यभिचारासाठी साहसी कमलाने कुणाला निवडले? गवंड्याला, पण तोही बेटा व्यभिचारासाठी ठरलेली फी-एक सोन्याचे नाणे घेऊन पसार होतो. कमला त्यावेळी म्हणते, 'मी प्रेमासाठी, सेक्ससाठी थक्क होते.' फक्त मि. दास वगळून इतरांशी हे असे का? कमला दासप्रमाणे खरंच का काही स्त्रियांचे जन्माच्या जोडीदाराशी असे love-hate 'लव्हहेट' नाते असते. कमलेच्या व्यभिचारोत्सुक शरीराचा तिच्या मावसभावांना वास येतो की काय, ते तिला जिन्यात, कोपऱ्यात गाठून चोंबाळायला, चुंबायला प्रारंभ करतात.

कमलाचे आजारपण, 'अंगावरून जाणे,' अपत्यजन्माच्या वेणा यांच्या बरोबरीने जीव देण्याच्या इच्छेचे, उल्लेख येतात. हे सर्व वाचताना वाटू लागते की, 'मॉर्बिडीटी'/morbidity आणि कलावंतकृती यांच्यात घनिष्ठ परस्परसंबंध असावेत. इकडे कमला आत्महत्येचे विकार कुरवाळत आहे, तिकडे मि. दास कमलाच्या देखत पुरुषमित्राशी समसंभोग घेतो. कमलाचा विवाह 'फ्लॉप' झाल्यात जमा होण्याची ही सर्व सामग्री असते. हे एवढं असून कमला घटस्फोट का घेत नाही? देअर्स द् रब! (There's the rub!)

पतीच्या कायदेशीर बलात्काराला भर पडते ती एक दिवस रात्री. एक दिवस कमलाची आयाच मध्यरात्रीच्या सुमाराला एक दारुड्या, रांगड्या 'नराला' कमलाच्या बेडरूममध्ये सोडते. तो चक्क बलात्कार करतो. बलात्कार संपल्यावर तो खलनायक क्षमा मागतो व साध्वी कमला त्याला क्षमा करते. (क्षमा फक्त पतीच्या 'बलात्काराला नाही!) आता तिच्या जीवनात राजरोसपणे येतो तो एक ग्रे आईड (grey-eyed) गोर तरुण. नवरा-मुले घरात असताना कमलाचे व त्याचे प्रेमकुजन चालू राहते. हा 'ग्रे-आईड' आत्मकथेत वरचेवर डोकावून जातो-कृष्णाच्या बरोबरीने त्याचेही अधूनमधून उल्लेख येतात-भावपूर्ण भाषेत. ती म्हणते : 'माय लव्ह वॉज लाईफ आम्स् (alms) लुकिंग फॉर ए बेगिंग बाऊल' कमला म्हणते मी स्वभावाने बुजरी म्हणून पूर्ण समर्पण करायला शिकले. (हे पूर्ण समर्पण आत्मकथेच्या ओघात एकदाही येत नाही.) पुढे येणाऱ्या प्रत्येक थाळीत ती प्रेमाचे नाणे फेकू पाहते.

ती पार्टीला जावो की, घराच्या एकांतात असो पुरुष तिच्यावर वखवखून तुटून पडल्यासारखे दिसतात, तिच्या शरीराच्या मऊ, मांसल भागावर. त्यानंतरचा पुरुष क्रमांक सहा आहे. मि. दासचा एक मित्र. तो तिची सेवा करतो, पाठ-मान चोळतो, गाल चुंबितो, तिला शिकवितो, तिच्या वेणींत मोगरा माळतो-मि. दास या सर्वांचा थंड साक्षीदार असतो-'दास म्हणे उगी राहावे। कमला दाखवील ते ते पाहावे॥' पुरुष क्रमांक ७ आहे एक अज्ञात फोन करणारा चाहता! त्याचे वाह्यात फोन बंद व्हावेत म्हणून कमला काय करते? ती त्याला घरी बोलावून घेते. तो सांगतो : 'तुला पाहिल्यावर मला माझ्या पत्नीची याद येते.' त्यावर कमलाची प्रतिक्रिया-'जावो, माफ कर दिया।' नंतर येतो तो क्रमांक आठ. हा असतो कमलाचा वयस्क शेजारी. तो तिला संस्कृत शिकवितो, तिला 'गायत्री' नावाने पुकारतो, तिच्या फोटोला झेंडूची माळ घालतो. आता क्रमांक घालणे बंद करू या का? अजून हाताची दोन बोटे शिल्लक आहेत ना? नंबर नऊ आहे पुन्हा मि. दासचा एक मित्रच (मित्र या शब्दाची केवढी कुचेष्टा ही!) बोलता बोलता कमलाला जाणवते की, या मित्राचा हात तिच्या मांड्यात गेलेला असतो!

या सर्व पुरुषांना कमलाबद्दल आणि तिला त्यांच्याबद्दल काय वाटते ? ही वासना आहे की विकृती ? इतके वासना विकृतीमय अनुभव कमलाच्या अभागाला कसे काय येतात ? यावर कमलाची मल्लीनाथी अशी की, 'हे सर्वजण धाकटचा बहिणीला चाहत होते तसे मला चाहत होते–अर्थात काही 'नंबरी' वगळून ! आपल्याकडे बहिणी चंद्राला भाऊ मानतात, फरक एवढाच, अभागी कमलाचे हे बंधू 'काचेचे चंद्र' वाटतात ! दसनंबरीने घेतलेल्या 'दीर्घचुंबनाची' हकीगत मि. दासना जेव्हा कमल सांगते, तेव्हा तो पुरुषसिंह उत्तरतो 'आमी (Amy) तू पोर आहेस, तू प्रेमाभोवती रुंजी घाल, बागड, पण 'प्रेमासाठी' सवंगडी पारखून घे. फुकट तुला त्रास व्हायला नको !'

कमलाच्या अंगी आलेला हा उद्धट धीटपणा ती सांगते ग्रंथांनी दिला. त्यामुळे तिला मांसाहार-मद्यपान निषिद्ध वाटेनासे होतात. त्या ओघात एका हिंदी परदेशस्थ 'मुलुख 'गिरी करणाऱ्या 'आनंदी' लेखकाने दिलेल्या पार्टीत बेहोष होईपर्यंत केलेल्या मद्यपानाचे वर्णन येऊन जाते. आता आपल्या हाताची बोटे संपली, तेव्हा पुन्हा गणती ठेवायलाच नको. एक लॉरेल-हार्डीतल्या जोडीतल्या लॉरेलसारखा दिसणारा वृद्ध कमलावर रुंजी घालू लागतो. कमला वृद्धांची 'हॉट-फेनरीट' असते. ती लुंगी-कुडता (बुश-शर्ट) घालणारी पहिली स्त्री लेखिका असते. कमलाच्या मते तिची त्वचा तेलकट असल्याने ती तिच्या 'असली' वयापेक्षा तरुण दिसते. तो लॉरेल-वृद्ध तिचे गाल चुंबायचा ! कमला त्याला काका म्हणत असते तेव्हा ते 'तसले' प्रेम नसावे ! कमलाचे काका-प्रियकर मात्र 'मुक्तपणे' हाताळत असतात तिला. स्वतःच्या 'लव्ह-अफेअर्स' कमी पडतात असे वाटू लागताच कमला आपल्या १५ वर्षांच्या थोरल्या मुलाच्या पहिल्या-पागल-प्रेमाची कथा सांगून टाकते. (खाण तसा दगड !) कमला अशी स्त्री आहे की तिचे केव्हा, कुणावर, कशासाठी प्रेम बसेल याचा थांग आपल्याला लागत नाही. एकदा चर्चगेटच्या एका दुकानातून बाहेर पडणाऱ्या पुरुषाशी तिचा 'सामना' होतो. कमला विद्ध होते. तो पुन्हा विमानतळावर भेटतो. तो तात्काळ कमलेचा कृष्ण-सखा बनून जातो. चुटचुट स्तनपान करणारा पुत्र तोही कृष्णच ! एकूण अखिल पुरुषजातच कमलेचा कृष्ण आहे. 'व्यक्तीगत' पुरुषात तिला फारसा रस नाही.

कमलाची आत्मकथा अधूनमधून काही विचार व्यक्त करत राहते. उदा० 'शहरातील बहुतेक स्त्रियाप्रमाणे' मी व्यभिचार केला, पण मला तो फारसा पटला, आवडला नाही.' राधा ही कमलाचा आदर्श आहे आणि ती पण व्यभिचारी–'अॅडल्ट्रेस' होती ! (मग राधेला व्यभिचार–अभिसार जमला की नाही ?) राधा-कृष्ण हे कमलाचे Fetisn (फेटीश) बनून राहते. कमला पुरुषा-पुरुषात कृष्ण शोधते आहे, अखेरपर्यंत त्रिखंड (त्रिशहर !) धुंडुनी शोधतसे। परी न पाहिजे ते गवसे। अशी सैरभैर अवस्था तिच्या वाटणीला आलेली दिसते. 'टीनएज' मुलीला स्वतःच्या मुलासारखे खेळणे नाही, असे ती अनुभवातून सांगते. आपल्या पुत्रात ती रमलेली दिसते. मुलांशी खेळ खेळते तेही कृष्णाचेच.

कमला ग्वाही देते की मी पापी असेन तर सांगाल ती शिक्षा भोगेन. कमलाच्या दृष्टीने तिचे वर्तन पाप नसेलही; परंतु ज्या सामाजिक चौकटीत ती वावरते तो समाज कमलासारखीच्या वर्तनाला 'पापच' मानतो, त्याचे काय ? 'मला प्रेम हवे होते म्हणजे पुरुष पाहिला की कपडे उतरविणाऱ्यांपैकी मी नव्हते.' (असे वेश्यादेखील म्हणत नाहीत !) मी 'निंफो' (नित्य-नूतन-पुरुष-प्यासी स्त्री) नाही. ग्रंथ, रोग, वेदना यांनी मला घडविले तशी मी जगले...' वगैरे. (कधीकधी कवितेचा लॉजिकशी संबंध नसतो म्हणतात, ते इथे पटू लागते.) अखेर पतीवर एवढी नाराज असणारी कमला आपले 'पपयांसारखे स्तन आणि पृथ्वीच्या नकाशावर पोरकट रेषा मारल्या-सारखे ऑपरेशन्सच्या व्रणांनी भरलेले ओटीपोट चवीने भोगणाऱ्या नवऱ्याला अर्पण करत राहते.' गरीबीत पाप नाही हे कविमंडळींना इतरांनी सांगण्याचा उपदेश नाही, तरीसुद्धा तिच्या (नेमक्या) काखेत उसविलेल्या पोलक्यांची व लग्नातल्या तीनच रेशमी साड्या मला होत्या, थकलेली वाण्याची बिले यांचे उल्लेख कुणाला 'उल्ले-खून मारण्यासाठी' येत राहतात ?

'मी आता बेड-वर्दी (संभोग योग्य) नाही' ही खंत की जाणीव आत्मकथेच्या अखेरीस ती व्यक्त करते. वास्तविक कमला ही कधीच बेडवर्दी स्त्री नसते. जी पुरुष या कल्पनेवर जगते व प्रत्यक्ष पुरुष-स्पर्शाने कोमेजून जाते, ती रुढ अर्थाने 'शयनेषु रंभा' कधीच नसते. (फार तर ती मॅटर्निटी-मशीन असू शकते !)

अशी आहे कमलाची 'कॉंप्लेक्स-होल' (Complex whole) नसलेली आत्मकथा. एका भीषण, जगावेगळ्या प्रेमकहाणीचे पोचट, पसरट चित्रण. कोलेरिजने 'लिटररिया–बायोग्रॅफिया' लिहिले, कमलाच्या आत्मकथेला 'पॉर्नोग्रॅफिया' Parnographia) म्हणावे लागेल का ? (तसे काहीजणांनी म्हटलेही आहे.) आत्मकथाभर आपण वहिवाटीची 'मळवाट' सोडून बिकट वाट धरल्याची जाणीव कमलाला होत राहते. शरीरापलीकडच्या, अपार्थिव प्रेमाच्या समंधाने झपाटलेले, काम आणि कवितेचे खतपाणी प्यालेले, कमलादास नामक 'वेडचा बाभळीचे' हे झाड आहे. प्रेमाची ज्योती शरीराच्या समईत राहते, हिला समईबाहेर पडून वीज धरण्याची आस होती, असे वाटते. संसार करून अभिसारिका, माता-पत्नीचे सुरक्षित जीवन जगून वर व्यभिचाराचा सोस, असे हे विलक्षण रसायन आहे. स्त्रीला पुरुषसंदर्भ विरहित अस्तित्वच नाकारणाऱ्या संस्कृतीत कमलादासचे नेमके स्थान, कार्य काय ? तिची आवस्था ही स्त्री जातीच्या निषे-धाची शोक-कथा बनू शकत नाही. प्रस्थापित पुरुषी-दुटप्पी नीती-चौकटीविरुद्ध मारलेली बांग, तशी कुठे जाणवत नाही. ही परमे-श्वराची पृथ्वी स्त्रियांसाठी नंदन-जीवन-वन केव्हा बनणार आहे ! हे तिच्या कथेचे वास्तविक मर्म आहे. पण ही मर्म बंधातली ठेव वाचकांप्रत पोचविण्यात कमलाचे शब्द अपुरे ठरले आहेत.

आत्मकथेच्या अखेरीस 'सर्पिणीने कात टाकावी तशी मी कात टाकली आहे', असे कमला सांगते. वास्तविक वासना या काती-सारख्या टाकता येणारा प्रकार आहे का ? सामान्य मर्त्य माणसांना त्या कवचकुंडलासारख्या मिरवाव्या लागतात, असा सार्वत्रिक अनु-भव नाही काय ? आत्मकथेच्या अखेरीस कमला सत्यच सांगून टाकते जणू, 'या आत्मकथेत मी माझे 'विद्रूप' सादर केले.' आपल्याला तर ते पानोपानी वाटत राहते. शारीरिक भोगांचे महत्त्व कमलेच्या लेखी नाही, तर प्रकरणाप्रकरणातून त्याचीच पखरण (ड्रेसिंग) का ?

ज्यांना कमलाच्या शरीराचा भोग घेता आला नाही, त्यांनी तिच्याविषयी कंड्या पिकविल्या, असे ती सांगते; पण मुळात सामाजिक दृष्टचा कंड्या पिकविण्याला (स्कँडलस) साजेसे जीवन कोण जगत होते? नवऱ्याने केलेल्या कायदेशीर बलात्काराला आमची संस्कृती क्षमा करते, हे जरूर अन्यायकारक आहे, पण परक्या गुंडाने केलेल्या बलात्काराला कमला क्षमा करते, त्याचे काय? कमलेच्या लेखी शरीराला काही किंमत नसेल, ठिक आहे. मग वारंवार आजारीपणाने, वेदनेने, आत्महत्येच्या विचारांनी ती का कण्हते? 'अंगावर फुटणाऱ्या घामोळ्याइतक्या नैसर्गिकपणे' जिला कविता होतात, तिचेच हे चरित्र का असे वाटण्याइतके फसले आहे. पुरुषशरीराच्या गर्दीत घुसमटलेल्या एका स्त्रीमनाची हळुवार अबोध कथा वाटण्याऐवजी, एका बेमुर्वत, मुजोर प्रमदेची कामलीलांची 'अॅपोलॉजेटिक' सुरस चित्र चमत्कारिक कथा वाटते. म्हणूनच वाचकांप्रमाणेच कमला देखील 'आय् मिक्सड् माय प्लेजर्स केअरलेसली अॅण्ड पासड् आऊट टू सून', या विषादपूर्ण जाणिवांनी विषण्ण होते. वेद लिहिण्याऐवजी केवळ शरीर वेदनांचा पट उलगडत जातो. प्रेमाच्या लाव्हाची लसलस प्रत्यक्षात थंड हिमनगाच्या पायरीवर घोटाळत राहते.

जर कमलाला आत्मकथा 'कन्फेशन्स्'च्या स्वरूपाची लिहायची होती तर फक्त कामजीवन हेच केन्द्रीय तत्त्व करायला हवे होते का? काम (sex) मानवी जीवनात केन्द्रीय महत्त्वाचे आहे, हे मान्य करून देखील सेक्स म्हणजे मोक्ष किंवा मानवी जीवनाची इतीकर्तव्यता कुणीच मानत नाही. 'आय् वॉज इनफॅच्युएटेड वुईथ हीज चार्म्स' 'हीज हॅन्ड्स् ब्रूईज्ड् माय बॉडी वुईथ ब्ल्यू अॅण्ड रेडमार्क्स', वॉज् एव्हरी अॅडल्ट ए क्लाऊन इन् बेड?' ही सनसनाटी शिर्षके काय उघडे करतात? कमलाचे बोजड बहिरंग की आसुसलेले अतरंग? लैंगिक उद्दीपक साहित्य (pornography) वाचून स्त्रियांना पुरुषाएवढी kick 'किक्' मिळत नाही, असे तज्ज्ञ सांगतात (म्हणून का कमलाला हे सारे लिहिताना देखील काही वाटले नाही? क्षणभंगुर पार्थिव 'किक्'च्या मोहात, कमालीच्या सोन्यासारख्या अनुभवांची 'चांदी' उडून जाते, त्याचे काय?

कमलादास हे व्यक्तिमत्त्व सिझोफ्रेनिक आहे की अॅंबिव्हॅलंट? जे आहे, ते तिला नको आहे. असे तिला वाटते; नेमके उलटे तिला हवे आहे, आणि ते मिळून देखील ती शांत होत नाही. तिच्या कवितात पसरणारा मनविभोर प्रणयाचा मत्त पिसारा आत्मकथेत अधूनमधून आढळतो, बाकी सारा 'मांसल प्रेमाचा' मसालेदार खकाणा. कमला दासला ही आत्मकथा लिहून मिळालेच असेल तर ते विकृत सुख असावे.

'खरा मजा आहे त्यातच। नागडे चालत जाण्यातच' असे केल्यावर तरी लोकांनी माझ्याकडे लक्ष द्यावे, भाव द्यावा, असा आकस्ताळी आकान्त तर या लेखनामागे नाही ना?

या लिखाणातून विद्वेषी, सूडकरी वृत्तीचा प्रत्यय येत राहतो.

'Wipe out the paints, unmould the clay,
Let nothing remain of that yesterday!' अशा रम्य ओळी लिहिणाऱ्या मनाच्या ट्रॅजेडीचा मागोवा या आत्मकथेत घेता येत नाही, उलट वाचकाला घोर फसवणुकीचे दुःख होते. Man is greater than his work, चा प्रत्यय कमलाची 'स्टोरी' देत नाही. त्याऐवजी वाचकापुढे येते काय? 'एकदोन ठिकाणी केस फुटणे, पपयासारखी लोंबणारी छाती, तिच्या आत्म्याची शारीरिक ओली जखम (=योनी), रक्तस्त्राव, अंगावरचे लाल–निळे वळ' मला प्रसिद्धीच्या झोतापासून (लाईम–लाईट) दूर राहणे आवडते म्हणणारी व्यक्ती इतके सवंग कुणासाठी लिहिते? बेछूट लैंगिक वर्णनांनी पुरुष वाचकांना चेकाळल्यासारखे होईलही, पण मग त्यासाठी ४५ वर्षे स्त्री म्हणून, कवयित्री म्हणून जगायला हवे कशाला? त्यासाठी पंधरा मिनिटांची ब्लू (Blue-film) फार सोयीस्कर!

'Tragedy is not death, but growth. The growing out of needs' हे वाक्य वाचायला मिळते, तसा अनुभव वाटत नाही. काव्यात्म वाक्ये, कल्पना स्वरचित कवितांच्या ओळी पानोपान पसरल्या आहेत.

'My senses were like lotuses that folded
into tight (टाईट) buds at Sunset'
किंवा
'leaves of her books yellowed
like autumn leaves'

'मायस्टोरीचा' शेवटचा परिच्छेद तर गीतांजलीत शोभेल इतका भव्य, उदात्त, चिंतनपर असा आहे. पण हे सारे सोंग–स्यूडो वाटते. अभंग गात कॅबेरे नाचल्यासारखे, म्हणजे धड कुठलेच एक नाही.

कमला या आत्मकथाच्या लेखनाने झपाटून गेली होती असे सांगते, वाचकही झपाटतो किंवा अस्वस्थ होतो; पण तो वेगळ्या विचाराने–एक चांगले चरित्र–बीज निव्वळ मांसाच्या चिखलात जिरून गेले या जाणीवेने. लेखिकेप्रमाणेच वाचकालाही अखेरीस वाटते. इट ईन इनफ्, मोअर दॅन इनफ! मीरा आणि मेरीलीन मन्रो यांचे गुणावगुण घेऊन घडविलेले कमला दास नामक जीवन आत्मकथेत फारसे तग धरल्याचे दिसत नाही. Truth indeed, is stranger than fiction असे उद्गार काढायला लावेल असे जगावेगळे जीवन तिच्या भाळी विधात्याने लिहिले होते, पण वाचकापर्यंत येतो तो केवळ त्या जीवनाचा शुष्क 'फेस'. 'मायस्टोरी' हे कमला दास या कवयित्रीचे चरित्र वाटत नाही, निव्वळ 'कामुक–कलेवर' वाटते. पावसाळी रात्री बागेत रत्नजडित वाटणारे, हिरण्मय काजवे दिवसा पाहवत नाहीत, तशी अवस्था 'माय-स्टोरी'ची झाली आहे. एरवी सूक्ष्म जीवनव्यापी काम–प्रेम–अनुभवाचा साक्षात्कार घडविण्याची क्षमता असणारी लेखणी, इथे निव्वळ लेखन 'कामा'ठी करताना दिसते.

शेवटी एवढंच की कमला दासने ही आत्मकथा अशा स्वरूपात पेश करायला नको होती. एके ठिकाणी ती लिहिते 'माझे गणित चांगले असते तर माझे लग्न एवढ्या लवकर झाले नसते,' आपल्यालाही वाटू लागते आजारीपणाची बिले भरण्याची जबाबदारी मि. दासनी घेतली असती, तर ही 'मायस्टोरी' कदाचित या बेछूट 'पोझ्'मध्ये सांगितली गेली नसती. तर कदाचित कमलाची ही 'पोझ्' आहे की 'इनबॉर्न क्वालिटी' आहे याचा उलगडा वाचकांना झाला असता! परंतु अशा 'जर–तारी' गोष्टींनी 'जीवन–पट' उलगडत नाही, याची मर्त्य जाणीव मला आहे. □

माय–स्टोरी / कमला दास / स्टर्लिंग प्रकाशन, नवी दिल्ली, १९७६
मूल्य रु. ६ फक्त.

# साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

८।१।७७ ते १४।१।७७

### भारताच्या राजकारणावर मकर संक्रमणाचा अनुकूल परिणाम

रवी हा ग्रहांचा राजा आहे. तो राजकारण व सामर्थ्याचा ग्रह आहे. त्याचा मकरराशीत होणारा प्रवेश म्हणजे अनुकूल स्थित्यंतराची मुहूर्तमेढच होय. दि. १३ जानेवारीला रवी हे मकर संक्रमण घडवीत आहे. त्याचा परिणाम भारताच्या राजकारणावर व विविध पक्षांवर होणे स्वाभाविकच होय. मंगळ अजून काही काळ बारावा राहणार आहे. त्यामुळे सत्तेचे राजकारण व सत्तासंघर्ष अजून काही काळ राहील. स्थिर सरकारे आपसातील दुहीने अस्थिर बनण्याचा धोका राहील. तरी पण केंद्रसरकार व केंद्रसरकारच्या प्रमुख पंतप्रधान इंदिरा गांधी अधिक प्रभावी होतील. विरोधी पक्ष व त्यांच्याबाबतचा गैरसमज कमी कमी होत जाईल. कम्युनिस्ट पक्ष हा सबंध देशाचाच टीकाकेंद्र बनेल. उजव्या पक्षातील स्वतःला डावा समजणारा जनसंघ काँग्रेसच्या अधिक जवळ जाण्याची प्रक्रिया सुरू होईल. अर्थकारण, समाजकारण, परराष्ट्र धोरण यात भारताची प्रतिमा जगात अधिक चमकेल. भारतातील निरनिराळया पक्षांत–काँग्रेसमध्येदेखील नवे नेते राजकीय रंगमंचावर चमकू लागतील.

### मेष : यशाची चढती कमान

आज पाचवा चंद्र व त्याचा मंगळ–बुधाशी नवपंचमयोग ही ग्रहाची परिस्थिती म्हणजे तुमच्यावर भाग्यदेवतेची भरपूर कृपाच होय ! राशीच्या चंद्राबरोबरदेखील भाग्यातील ग्रह चांगला योग करीत आहे. त्यामुळे तुमची सारी स्वप्ने साकारणार आहेत. यावेळी कर्तबगारीची अनेक क्षेत्रे दृष्टिपथात येतील. कामाचे चीज होईल. आजवर जे दालन तुम्हाला उपलब्ध झाले नव्हते ते आता खुले होईल. कोणतेही काम यावेळी यश मिळवून देणार आहे. नोकरी-व्यवसाय प्रगतीचे नवे रूप धारण करणार आहे. नव्या योजना प्रत्यक्षात येणार आहेत. आर्थिक बाजू भक्कम होऊन राहणीमान उंचावणार आहे. तुमच्यापैकी जे विवाहेच्छु असतील त्यांचे विवाह पार पडतील. अपत्यलाभाचा योगही आहे. शुभ दिनांक १०–११.

**महिलांना :** नोकरीसाठी प्रयत्न केल्यास मोठे यश पदरात पडेल.

**विद्यार्थ्यांना :** एखाद्या वेगळ्या भाषेचा अभ्यास करावा.

### वृषभ : कोंडी फुटेल

यावेळी तुमच्या केंद्रस्थानी अनेक महत्त्वाचे ग्रह स्थानापन्न झाले आहेत. ते प्रतिकूल नाहीत. मात्र अजून तरी अडचणींवर मात करून, अडचणींशी संघर्ष करून तुम्हाला पुढे गेले पाहिजे. यश येईल व अपेक्षित लाभदेखील पदरात पडतील. तुमच्याभोवती आता प्रतिष्ठेचे नवे वलय निर्माण होणार आहे. आर्थिक बाजू प्रामुख्याने धंद्याच्या मार्गाने सुधारेल. रवी दि. १२ ला भाग्यस्थानी मकर संक्रमण करीत आहे. तेव्हापासून तुमच्या प्रगतीला, तुमच्या अंगीकृत योजनांना गती येईल. नोकरीधंद्याची परिस्थिती अपेक्षित अनुकूल वळण घेईल. तुम्ही एखाद्या धंद्याचे मालक होऊ शकाल. तुम्हाला रेसमध्ये पैसे मिळू शकतील. तुम्ही लॉटरीची तिकिटे नेहमी घेत असाल तर यावेळी तुमचे भाग्य उजळून निघेल. शुभ दिनांक १०–१२.

**महिलांना :** अपेक्षित यश मिळेल. स्वतंत्र धंदा सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** मानसिक स्वास्थ्य कमी प्रमाणात मिळेल.

### मिथुन : प्रवासाचा योग

तिसरा चंद्र असताना हा आठवडा सुरू होत आहे. परंतु खरे भाग्य उदित होईल ते दि. १३ च्या मकर संक्रमणापासून. तुमची सारी रेंगाळत पडलेली कामे यावेळी अनुकूल निर्णयाप्रत येतील. प्रामुख्याने यावेळी महत्त्वाच्या कारणासाठी प्रवास होईल. ज्याच्या त्याच्या जन्मग्रहाप्रमाणे एखादा भाग्यवान परदेशी प्रवासही करू शकेल. तुम्ही लेखक असाल तर तुमची एखाद्या धनिकाबरोबर मैत्री होईल. आगामी भविष्यकाळाची ती नांदी ठरेल. तुमच्या घरात एखादे मंगलकार्य होईल. मैत्रीचे क्षेत्र व्यापक होईल. नोकरीत वरिष्ठांच्या मर्जीचा लाभ होऊ शकेल. सातवा मंगळ सांसारिक जीवनात काहीशी कटुता निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहे. शुभ दिनांक ११–१३.

**महिलांना :** पुरुषांच्या कठोर वागण्याचा संसारात व इतरत्र अनुभव येईल.

**विद्यार्थ्यांना :** कोणत्याही विषयात यश पदरात पडेल.

### कर्क : बदलाचे वारे

राशीत शनी असून त्याच्याशी रवी व मंगळाचा षडाष्टक योग होत आहे. एका अर्थाने शत्रूस्थानी असलेले रवी-मंगळ तुम्हाला उपकारकच ठरणार आहेत. तुमच्या अवतीभवती तुमच्याविरुद्ध चालू असलेल्या कारवाया हे दोन्ही ग्रह आता चांगलेच मोडून काढणार आहेत. धंद्यात एखादी स्पर्धा तुम्ही सहज जिंकू शकाल. नव्या उद्योगाची मुहूर्तमेढ याचवेळी रोवणे हितकारक ठरेल. तुमचा कोणताही धंदा असो तो यावेळेपासून अडचणीवर मात करून प्रगतिच्या दिशेने जाणार आहे. आर्थिक व तांत्रिक अशी दोन्ही बाजूने भक्कम परिस्थिती निर्माण होईल. नोकरीच्या दृष्टीने प्रगतीची पावले पडतील. उत्पन्नात वाढ होईल. दुय्यम धंदा करा. नोकरीत अधिकार वाढतील. प्रवासाचा योग आहे. अपेक्षित बदलाचे वारे वाहू लागणार आहेत. शुभ दिनांक ९–१०.

**महिलांना :** तब्येत सुधारेल, मनःस्वास्थ्य व कौटुंबिक सुख मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक क्षेत्रातील स्पर्धात भाग घ्या.

### सिंह : अपूर्व यश

तुम्ही आता विनाकारण पिरपिरत बसावे व परिस्थितीच्या नावाने रडत बसावे हे तुमच्या राशीला शोभणारे नाही. तुम्ही सिंहासारखी माणसे आहात व सध्याचे तुमचे

ग्रहमान तर तुमच्या व्यक्तीमत्त्वाला उठाव देणारे, यशस्वी करणारे आहे. तुम्ही धूर्तपणे व कौशल्याने पावले उचला व तुमच्याविरुद्ध असलेली परिस्थिती उधळून लावा. यश तुमच्या हाती आहे. हाच या वेळेचा तुम्हाला ग्रहांचा संदेश आहे. पाचवा रवी व दि. १३ पासून त्याचे घडणारे मकर संक्रमण तुम्हाला अत्यंत लाभदायक होणार आहे. मंगळ तर पांचवा आहेच. राजकारणात तुमच्यावाचून पान हालणार नाही व नोकरीत वरिष्ठांना अथवा मालकांना तुमच्यावाचून कोणतेच काम यशस्वी करता येणार नाही.

शुभ दिनांक ८–११.

**महिलांना :** नोकरीत अधिकार वाढतील व पैसाही वाढेल.

**विद्यार्थ्यांना :** सर्व प्रकारच्या अडचणी कमी होऊन प्रगतीकडे वाटचाल कराल.

## कन्या : अडचणीवर मात

आठवडा प्रगतीकारक आहे. आठवा गुरू उगाचच भीती निर्माण करीत राहील. पण त्याची भीती बाळगू नका. चौथे रवि-मंगळ काही चांगले व कांही मानसिक क्षोभ निर्माण करणारे अनुभव देणार आहेत. पण तरीही तुम्ही मागे पाऊल घेऊ नका. दिनांक १३च्या रवी-मकर संक्रमणापासून तुमचे ग्रह अधिक समर्थ बनणार आहेत. एखादे नवे क्षेत्र पादाक्रांत करू शकाल. उच्चपदावरील व्यक्तीबरोबर घनिष्ठ संबंध जुळणार आहेत. जुन्या स्मृतींना चालना मिळणार आहे. अपेक्षित बदल होणार आहेत. नोकरीत कामाचे चीज होणार आहे. नव्या योजना प्रभावशील ठरणार आहेत. तुम्ही वरिष्ठ जागेवर काम करीत असाल तर खाताखालच्या लोकांबरोबर सहकार्याचे वातावरण निर्माण करा. त्यामुळे यश भरीव ठरेल. आर्थिक बाजू सुधारणेचे वळण घेईल. शुभ दिनांक ८–११.

**महिलांना :** प्रसन्नता व उमेद निर्माण होईल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात अधिक लक्ष देणे आवश्यक होईल.

## तूळ : सारे ठीक होईल

तिसरा रवि दि. १३ ला बदलणार आहे. पण तोपर्यंत त्याचे व मंगळाचे तुम्हाला भरपूर सहकार्य आहे. गुरू तर सातवा आहे. त्यामुळे तुमचे व्यक्तिमत्त्व फारच उंचावणार आहे, प्रभावशाली होणार आहे. संसारात शुभयोगकारक घटना घडणार आहेत. अपत्यलाभ होईल. प्रेमात अधिक आपुलकी निर्माण होईल. तुमच्यापैकी जे कुणी विवाहाच्या प्रयत्नात असतील त्यांचे विवाह पार पडतील. प्रेमविवाहाचाही योग आहे. धंद्याची परिस्थिती सुधारेल. आर्थिक मदत मिळेल. धंद्यातील अडचणी दूर होतील. नव्या क्षेत्रात प्रवेश मिळेल. धंदा वाढवता येईल. सौंदर्यप्रसाधने, खते, कापड हे धंदे अधिक लाभदायक होतील. नोकरीची परिस्थिती खूपच अनुकूल राहील. गैरसमज, अडचणी दूर होतील. कामाचे चीज होईल अनेकप्रकारे हा आठवडा लाभ मिळवून देईल.

शुभदिनांक १२, १३.

**महिलांना :** संसारात गोडवा व प्रसन्नता येईल.

**विद्यार्थ्यांना :** घरगुती वातावरण प्रसन्न राहील.

## वृश्चिक : धनलाभ होईल

बारावे ग्रह आर्थिक बाजू कमकुवत ठेवतात. पण त्याचबरोबर इतर ग्रह बरे असले तर पैसा मिळण्यात काही अडचणी येत नाहीत. सध्या तरी राहू-हर्शल पैसा हिरावून घेत असले तरी दुसरे रवि-मंगळ पैसे मिळवून देत आहेत. पैसे मिळवण्याचे अनेक मार्ग तुमच्यासमोर उभे करीत आहेत. माणसाने आडमार्गाने पैसा मिळवू नये. तुम्ही तसा मिळवत असाल तर तो मार्ग चोखाळू नका. प्रयत्न, परिश्रम व कर्तबगारी याच मार्गाने खरे तर तुमचे हीत साधेल. धंद्यात बरकत येईल. अडचणींवर मात करू शकाल. एखाद्या धनिक व्यक्तीची मर्जी संपादन होईल. स्थावर व इतरप्रकारे मिळकतीत भर पडेल. मिळकतीची वारसदारी मिळेल. तडजोड लाभदायक ठरेल नोकरीत वरिष्ठांच्या कृपेने बरेच काही साधू शकाल. यावेळी तुमच्या मागण्या त्यांच्यापुढे मांडा.

शुभदिनांक १३, १४.

**महिलांना :** गुरू चांगला नाही. तरीपण मकरसंक्रमणापासून परिस्थिती सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत अपेक्षेइतके यश मिळेल.

## धनू : यश जिंकाल

आजच्या आघाडीवरल्या राशीत धनू राशी ही अधिक सामर्थ्यशाली राशी झाली आहे. कारण राशीत रवि व मंगळासारखे संपन्न व सामर्थ्यशाली ग्रह आहेत. हे ग्रह म्हणजे जे अपेक्षित आहे ते प्रदान करतात व जे मिळवायचे आहे ते मिळवण्याचे सामर्थ्य देतात. विशेषत: दिनांक १३ च्या मकर संक्रमणापासून तुमचे यश आणि तुमची प्रगती वाऱ्यासारखी पसरत जाईल. यावेळी नोकरीधंद्याची स्थिती अत्यंत समाधानकारक राहील. तुमचा प्रभाव एवढा वाढेल की, तुमचे वरिष्ठ तुमच्याभोवती स्तुतीचे दिवे ओवाळू लागतील. तुम्ही यावेळी स्थिर मनाने कोणतीही योजना ठरवा व त्याच्या उभारणीसाठी कामाला लागा. यश तुमच्यापाठून आपोआपच येईल. प्रतिमा उंचावेल. आर्थिक स्थैर्य येईल, आरोग्य सुधारेल.

शुभदिनांक १०, १३.

**महिलांना :** विवाहेच्छु तरुणींचे विवाह ठरतील. नोकरीत समाधान.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात केलेले प्रयत्न कारणी लागतील.

## मकर : शुभयोगकारक

राशीसमोर शनी व रवी-मंगळ बारावे अशा कात्रीत सध्या तुम्ही सापडला आहात. मनाला खूप खूप काही करावेसे वाटते पण ते प्रत्यक्षात होत नाही. कारण ग्रहांची ही कोंडी निर्माण झाली आहे. पण हाच आठवडा कळ सोसा. म्हणजे या कोंडीतून तुमची मुक्तता होईल. विशेषत: मकरसंक्रमणापासून तुमच्या जीवनाची गाडी पुन्हा चांगले वळण घेईल. मंगळ बारावा आहे. थोडीफार तरी ठेंचकाळत जाईल. तरी पण मकर राशीला मंगळ तेवढे वाईट फळ देत नाही. नोकरीत सरळ वागणे आवश्यक आहे. वरिष्ठांवर विश्वासून राहू नका. तुमचे डावपेच त्यांच्यावर उलटवणे सध्यातरी शक्य होईल, असे वाटत नाही. मात्र कार्यक्षमता वाढेल. यश हुलकावणी देत हाती येईल. शुभ दिनांक ८–११.

**महिलांना :** घरगुती उद्योग सुरू करता येईल. नोकरीत स्थैर्य.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षा जवळ येत आहे. परिश्रम करणे आवश्यक आहे.

**कुंभ : अपेक्षा पूर्ण होतील**

सध्या अनेक ग्रह तुमच्यावर खूष आहेत. रवीचे मकर संक्रमण आठवड्याच्या शेवटी होत आहे. तो तुम्हाला प्रतिकूल ठरणार नाही. सार्वजनिक कार्य, राजकारण, स्वतंत्र उद्योग यात तुम्ही विशेष आवडीने रस घेता. या सर्वच आघाडीवर तुमचे कर्तृत्व यावेळी चमकणार आहे. राजकारणात तुमचे कौशल्य मोठाच प्रभाव पाडून राहील. सत्ताधारी पक्षात जर तुम्ही असाल तर तुम्ही मोठ्या पदांवर आरूढ होणार आहात. लोकांचे हीत करण्याचे मोठे सामर्थ्य तुम्हाला प्राप्त होईल. नोकरीत असणाऱ्यांच्या अपेक्षा पुऱ्या होतील. प्रमोशन मिळणार आहे. ज्यांच्या नोकऱ्या कायम नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. वरिष्ठांवर तुमचा मोठा प्रभाव राहील. परदेशात प्रवास होईल. लॉटरीत लाभ. शुभ दिनांक ११–१३.

महिलांना : नोकरी व धंदा यात प्रगतीला अनुकूल वाव मिळेल.

विद्यार्थ्यांना : तुमचे मन, बुद्धी प्रसन्न राहील.

**मीन : साफल्याचा आनंद**

राशीस्वामी गुरू दुसरा आहे. पण तो केतूच्या सान्निध्यात असल्यामुळे त्याची मदत फारशी होणार नाही. मात्र रवी-मंगळ असे कर्तृत्वसंपन्न ग्रह एवढे अनुकूल आहेत की, जिथे हात लावाल तिथे मातीचे सोने होईल. फार छान आठवडा आहे. विशेषत: रवीच्या मकर संक्रमणापासून तुमच्या आर्थिक जीवनात अक्षरश: संक्रमण घडणार आहे. रेस, लॉटरी भाग्य उजळून टाकील. आहे त्या परिस्थितीत नेत्रदीपक बदल होईल. तुम्ही कोणताही धंदा करा किंवा तुमचा सध्या कोणताही धंदा सुरू असू द्या तुम्ही 'समृद्ध' होणार आहात. आर्थिक स्थैर्य व कार्यक्षम कारभार हे यावेळचे वैशिष्ट्य आहे. विशेष कारणासाठी प्रवास होईल. जमिनीचा प्रश्न सुटेल. नोकरीत बदल व अनुकूल वातावरण राहील. लेखकांना पैसा मिळेल. शुभ दिनांक १२–१३.

महिलांना : तुम्ही लेखक असाल तर तुमचे नाव गाजणार आहे.

विद्यार्थ्यांना : यशाची गुरुकिल्ली सापडेल.

□

## जोन्ससाहेब : पृष्ठ ४ वरून

रेखीव दिसत होती. क्लबचं फाटक उघडून मी हिरवळीवरून पुढे व्हरांड्याच्या पायऱ्या चढून तिथंच उभी राहिले. सकाळी क्लब बंद असणार पण निदान लायब्ररी आणि तिथला व्यवस्थापक भेटणार असं वाटलं होतं ! पण लायब्ररी बंद होती; व्यवस्थापक वर तिथं नव्हताच. मला पाहून क्लबचा माळी मात्र पुढे येऊन सेक्रेटरीच्या रुबाबात मला सांगत होता, 'क्लब शामको खुलता है.'

त्यानंतर त्यानं मला मराठीत विचारलं, 'बाईजी, आपुन पल्याडच्या चार नंबरच्या कोठीत ऱ्हायला आलात नव्हं का ?'

मी मान हलवली, अन् सांगितलं, 'मला क्लबात आत्ता जायचं नाही, जरा लायब्ररी पाहायची आहे. हे माझं मेंबरशिपचं कार्ड !' मी जरा जोरानं म्हटल्याचा परिणाम असा झाला की, त्यानं लगेच 'ऱ्हाऊ द्या. त्येचा काय पण वांधा नाय. म्या आजच हतं काम करत नाय. तीस वर्सं हतं या शंकर माळ्याला समदी वळखतात. चला ! या दाराचं कुलूप खोलतो म्हंजे तुमी मुख्य हालात याल.'

शंकरनं जुडग्यातल्या एका किल्लीनं क्लबच्या मुख्य हॉलच्या दाराचं कुलूप उघडलं. व्हरांड्याच्या पायऱ्या चढून मीही त्या हॉलमध्ये शिरले. हॉल प्रशस्त होता. दोनशे माणसं बसू शकतील इतका मोठा होता. हॉलच्या चारी भिंतींना लगत एका ओळीनं रचलेल्या खुर्च्यांना जुनेपणाची कळा आली होती. तिथल्याच कोपऱ्यात एक जुना पिआनो पडलेला होता. त्याच्या तीन-चार पांढऱ्या पट्ट्या निखळलेल्या होत्या. पिआनोची एक बाजू जरा मोडलेली होती, त्याला फळी लावून आधार दिला होता.

हॉलच्या बाहेरच्या बाजूला सभोवती खुले व्हरांडे होते आणि चार कोपऱ्यांना बिलीयर्ड रूम, बार, लेडीज रूम, आणि लायब्ररी अशा चार खोल्या होत्या. लेडीज रूममधल्या ड्रेसिंग टेबलाच्या आरशाला तडा गेलेला होता. बिलीयर्ड रूममधल्या बिलीयर्ड टेबलावरचं हिरवं फेल्ट एका जागी फाटलं होतं, तिथं ठिगळानं शिवलं होतं !

क्लबची हिंडून पहाणी केल्यानंतर मी लायब्ररीत गेले. लायब्ररी मात्र हॉल, इतर तीन खोल्यांच्या मानानं नीटनेटकी आणि व्यवस्थित लावलेली होती. लायब्ररीच्या चारी भिंतींशी पुस्तकांची कपाटे, आणि काही शेल्फे होती. खोलीच्या मध्यभागी एक भलंमोठं गोल टेबल आणि त्याच्याभोवती सहासात खुर्च्या होत्या. टेबलावर काही वर्तमानपत्रं, फेमिना, फिल्मफेअर वगैरे मासिकं, साप्ताहिकं नीट जुळवून ठेवली होती. एका कोपऱ्यात मात्र एका छोट्या टेबलावर बुद्धीबळाचा पट आणि सोंगट्या मांडून खेळाची जय्यत तयारी केलेली दिसत होती. तिथंच टेबलाच्या समोरासमोर दोन खुर्च्या होत्या. जणू आताच कोणी बुद्धीबळाचा डाव खेळायला यायचं होतं !

शंकरनं जुडग्यातल्या किल्ल्या घेऊन तीन कपाटाची कुलूपं भरभर उघडली. मी कपाटातल्या पुस्तकांवरून नजर टाकली. कपाटातल्या आणि शेल्फमधल्या कप्प्यांच्या डाव्या बाजूच्या वरच्या अंगाला इतिहास... युद्धकथा, ...चरित्र, ...काव्य, प्रवासवर्णन... ...चरित्र अशा विविध विषयांची क्रमांकानुसार पुस्तकं व्यवस्थित रचलेली होती. जेम्स हॅडली, पेरी मेसन, हॅरॉल्ड रॉबिन्स ही नावं सरावलेल्या माझ्या डोळ्यांना त्या कपाटात शेल्फवर फारच निराळी ग्रंथसंपत्ती आढळली. चर्चिल, जॉर्ज बर्नार्ड शॉ, थॉमस हार्डी यांचं समग्र वाङ्मय जाड पुठ्ठ्यांच्या बांधणीत होतं. ब्रिटीश एन्सायक्लोपिडीया, वंडरलंड ऑफ नॉलेजचे बारा खंड चांगल्या स्थितीत होते. ललित वाङमय तर पहायलाच नको. शेक्सपिअर बेकन, डान्टे यांच्यापासून आजच्या काळातले आर. के. नारायण, मुल्क राज आनंद, मनोहर माळगावकर यांच्यापर्यंत सारे लेखक, कवी खांद्याला खांदा लावून तिथे उभे होते. एका शेल्फवर नुसती जंगलखात्यावरची पुस्तकं, भारतीय जंगलखात्याचे वार्षिक अहवाल, भारतातील विविध जातींचे नाग, सापांच्या विविध जाती अशी निराळ्या विषयांची पुस्तकं तिथं होती. इतकंच नव्हे तर दुर्मिळ खोडांचे नमुने, वीतभर रुंदीची

मृत फुलपाखरे तिथं नीट जतन केलेली होती. त्या दिवशी जंगलविषयक दोन तीन पुस्तकं माझ्या नावावर मी नोंद करून ठेवली आणि पुस्तकं घेऊन घरी निघाले.

शंकरनं कुलूप लावून सारं बंद केलं !

त्यानंतर रोजचा सकाळचा कार्यक्रम ठरल्यासारखाच होता. साडेदहाला आमच्या माळीबुवाला एका लहानशा वाटीत दूध व लाह्या स्वाधीन करून मी घर बंद करून क्लबच्या लायब्ररीत जायची; तिथं मनसोक्त वाचन करून शिवाय दोन पुस्तकं घेऊन घरी यायची. एक दिवस अशीच साडेदहाची वेळ होती. मी सागर क्लबाच्या फाटकातून आत शिरले अन् एक तपकिरी पांढऱ्या रंगाचा सुंदर साप सळसळत माझ्याच समोरून गेला. मी झटकन् पायऱ्या चढून क्लबच्या व्हरांड्यात येऊन उभी राहिले. तो साप गेल्यानंतर मी ओरडले, 'साप, साप कुणीतरी मारा..'

माझ्या आवाजानं लायब्ररीत साफसफाई करीत असलेला शंकर माळी तिथं आला. 'हतनं जनावर ग्येलं व्हय् ! ' देवावाणी हाये. काय बी करणार नाय.'

'साप देवासारखा असतो ? काहीतरीच तुझं बोलणं ! अरे इथं संध्याकाळी मेंबर क्लबात येतात तर मग ही जागा स्वच्छ नको ? इथं साप येऊन चालेल कसं ?'

हळूहळू मी नॉर्मल झाले आणि लायब्ररीतल्या माझ्या ठराविक खुर्चीवर जाऊन बसले. खंकर पितळी पुष्पपात्रांना ब्रासो लावण्याचं काम करीत होता. काम करता करता तो सांगू लागला, 'ह्यो फोटू हाय ना,' ...त्या फोटोला सलाम करीत तो म्हणाला, 'हा गोरा सायब जंगल खात्यात फार मोठा सायब व्हता. त्यांचं नाव व्हतं... जोनसायब.'

भिंतीवरच्या फोटोतही मि. जोन्स रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे गृहस्थ वाटत होते. एक दोन पुस्तकांच्या कपाटावरसुद्धा पितळी पाटीवर अक्षरं कोरलेली होती.. Donated by Mr, Rudolf Jones.

'जोनसायब कलपात रोज यायचे. त्येंचा लई जीव व्हता त्या सापावर ! त्यांच्या पायाच्या आवाजानं त्यो साप बी त्येंच्या मागं यायचा. ते त्येंच्या अंगावरनं हात फिरवायचे.'

'अस्सं होय ? नवलच आहे. सापाशी दोस्ती म्हणजे काय विचित्र तरी.' मी स्वतःशीच म्हणाले.

'वाई, जोनसायब म्हंजे राजा आदमी, त्ये हतं यायचे तवा कलपाचा रुबाब काय व्हता ! सायब रोज सांजला सा वाजता जीपमधनं हतं यायचे. त्येंचा बराबर केवी सिव्हाचा छावा असायचा. छावा व्हता दोन म्हैन्याचा.'

'काय रे जोन्साहेबानं लग्न केलं नव्हतं का ? एकटेच रहायचे बंगल्यात ?' मी विचारलं.

'हां हां ! सायब यकटेच व्हते ! कुनी सांगितलं की त्यांची बायकु पूर्वीच गुदरली. कुनी सांगायचं की तिला या देशाची हवा मानवत नाय, ती हमेशा परदेशाला असत्ये. पन सायब मात्र एकटेच र्‍हायले... त्येना शौक दोन गोष्टींचा ! यक म्हंजे शतरंज आणि दुसरं म्हणजे साप.'

'काय सापांची आवड ?' मी आश्चर्यानं किंचाळले !

'हां हां, सापांची लई आवड. अवो त्यांच्या बंगल्यावर त्येनी साप बाळगले व्हते. सायबाला सापाच्या जातीची म्हाईती लई व्हती.' शंकरचा सूर लागला होता.

'सायब शतरंज असं फास्ट खेळायचे. आपली प्यादी खुशाल पहिली मारू देयाचे. मंग यकदम जलदीनं डाव ! दुसऱ्यावर जलदीचा ॲटॅक करायचे ! त्यांचा खेल चालू असताना त्येना कुनी बातचीत केलेली खपत नसेच. हतं कुनी आलं की खुर्चीवर बसून साऱ्यांनी त्येंचा खेल पाह्यलाच पायजे. जोनसायब वरच्या स्टेकनी खेलायचे. त्ये हरले तर पैशाचं पाकिट तितल्या तितं खाली करून हिसाब पुरा करायचे. भिडू हरला तर त्येच्याकडनं कंदी वसुल करायचे नाय. कुनी खेलायला नसलं तर त्ये मलाच खेलायला बसवीत.' ...'सायब त्या यका खुर्चीवर बसायचे आणि रुबाबात, चिरूट ओढीत शतरंज खेलायचे.' शंकरनं तिथल्या उंच पाठीच्या विशिष्ट खुर्चीचा निर्देश करीत सांगितलं. !

इतर खुर्च्यांच्या मानाने ती उंच पाठीची खुर्ची प्रामुख्यानं उंच माणसाला आरामात बसता यावं अशा तऱ्हेनं बनवलेली होती, 'जोन्स उंचपुरे होते का रे ?' मी माझं कुतूहल व्यक्त केलं !

त्या उंच खुर्चीच्या पाठीवरून मायेनं हळुवारपणे हात फिरवीत सांगू लागला, 'हो ना ! ह्या दारातनं आत येताना त्या सायबांना जरा वाकून यावं लागे. सायब हतं यायचे तवा त्ये खाकी शर्ट, अर्धी तुमान या कपड्यात असायचे. नशापाण्याचा शौक नव्हता. खान्याकडं चित्त नसे.'

दुसऱ्या एका दिवशी शंकर सांगत होता... 'जोन्सायबाचं नागाचं सापाबद्दलचं प्यार भलतंच व्हतं ! त्येन्ला सापाच्या जाती म्हाईत व्हत्या. सापाच्या चालीवरून सायबाला वळखता यायचं, नर हाय का मादी, त्याचे वय किती, विषारी का, बिनविषारी ! साप पाहून समजायचं, आपल्या बंगल्यात त्यानं पाच-सात साप बाळगले व्हते...हतं त्या सायबाचा चार वर्सांचा मुक्काम व्हता ! जंगलात जाताना



त्यांनी जीपगाडी एकदा थांबवली.डरायव्हरला सांगितलं, गाडी थांबव. जवळपास अजगर हाये. आवाज येतोय ? पन मग म्हनाले, असं करू या. आत्ता नुको उद्या चार मानसं घेऊन पकडू या. दुसरं दिसाला चार गारुड्यांना बरोबर घिऊन गेला अन् त्या अजगराला पकडून आपल्या बंगल्यावर न्येलं. त्याला ज़ाळीचा पिंजरा करून त्यात डांबून ठिवलं. सा म्हैने त्यो अजगर त्यांच्यापाशी व्हता.'

'पुढं त्या अजगराचं काय झालं ?' मी विचारलं !

'जोन्सायबानं अजगराला ममईला धाडलं म्हनत्यात. यकदा काय झालं, पावसाला सुरुवात झाली व्हती. सांजंला जोन्सायब जीपनं आले, रातचे धा वाजले तशी घरी जायला उठले. जीप सुरूच व्हईना, पावसाचा जोर कमी व्हईना. त्ये चालत जायला उठले. म्या म्हटलं, मैं साथ चलूंगा ! त्ये बरं म्हनाले. जीपमंदी त्येंचा पावसाळी कोट व्हता. त्येंनी त्यो अंगावर चढविला. माज्यापाशी छत्री, घोंगडी, कंदील व्हता. त्ये सारं घिऊन म्या त्यांच्या सांगाती चालू लागलो. वाटेमंदी सायबाचा पाय कशावर तरी पडला नि जिवाणु त्यांच्या डाव्या पोटरीला डसलं! सायब मटकन् दगडावर बसले. माज्या ख़िशात हमेशा चाकू असतो. सायबाच्या पोटरीला चावा घ्येतला व्हता त्या भागाला म्या जरा छाटून टाकलं, तिथलंच रगत शोषून थुंकून टाकलं. जवळपास फुरसुंगीचा झाडपाला मिळाला त्यो म्या दगडावर ठेचून त्येचा रस पोटरीवर चोळला. दोन मिनिटांत आग थांबली. आमी चालू लागलो. रस्ताभर सायबाला बोलायला लावलं. बंगल्यावर गेल्यावर त्येन्ला काफी दिली. मीही द्येवाचं भजन करीत झोपलो. दुसरे दिसाला सायब साफ बरे जाले. त्येंनी मला इच्यारलं, 'शंकर, तुला बक्षीस किती देयाचं ! बोल !'

'म्या म्हटलं, मला काय बी नुंको. पन त्येंनी माज्या लेकाला परदेशी इमानाच्या कंपनीत नोकरी मिळवून दिली.'

'पन्नास साली जोन्सायब हतनं ग्येले. शंकरनं सांगितलेल्या वर्णनावरून कधी तुटक तर कधी संलग्न शब्दरेषेतून माझ्या डोळ्यासमोर एक चित्र साकारलं. क्लबच्या लायब्ररीत बसल्या बसल्या मी त्याला मनानं पाहू शकत होते, त्याला समजू शकत होते. रोजच्या दोन, अडीच तासांच्या अवधीत मी एका न पाहिलेल्या जीवनाचा कणाकणानं परिचय करून घेतला.

माझ्याप्रमाणं ह्यांनाही जोन्सबद्दल कुतूहल होतंच ! दुपारी दीड वाजता हे जेवायला घरी यायचे, तेव्हा यांचा पहिला प्रश्न 'जोन्स काय म्हणतात ?' बाकीं त्या लायब्ररीच्या इतिहासात तुझ्यासारखा हौशी वाचक कधी मिळाला नसणार.'

रोज मीही त्यांना जोन्सबद्दलची थोडी थोडी माहिती सांगायची...दोन महिन्याच्या अखेरीला ती माहिती संपत आली. अखेरीला, 'आज १९५० च्या जंगल खात्याच्या वार्षिक अहवालात फक्त इतकंच होतं की मध्यप्रदेशातील जंगल खात्यातले एक श्रेष्ठ अधिकारी आपल्या ३३ वर्षांच्या नोकरीनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्याजवळ सापांचा छान संग्रह होता. एक अजगरपण त्यांच्या संग्रही होतं. हे सारे त्यांनी मुंबईच्या हाफकीन इन्स्टिटयूटला देणगी म्हणून देऊन टाकले.' मी वाचलेली माहिती ह्यांना सांगितली.

या नंतर आमचंही सागरमधलं वास्तव्य संपून आम्ही रामगडला गेलो. रामगड, रांची, कलकत्ता आणि सिकंदराबाद नंतर अखेरीला मी मुंबईत स्थाईक झाले. ह्यांनी आपला स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. मुंबई मला परकी कधीच नव्हती. तिथल्या धाईगर्दीचा यंत्रवत जीवनक्रमाचा मला चांगला परिचय होता; सिनेमा, नाटक, प्रदर्शन, परिसंवाद यांची रोज धमाल असायची—या कार्यक्रमाच्या धमालीत माझी पूर्वीची वाचनाची सवय अन् हौस बरीच कमी झाली होती... एकदा हाफकीन इन्स्टिटयूटमध्ये त्याच्या कार्यपद्धतीची माहिती करून देण्यासाठी प्रदर्शन सुरू होतं. माझ्या मनात तिथं जायचं होतं, ते प्रदर्शन पाहायचं होतं म्हणून नव्हे तर जोन्सचा तो सुप्रसिद्ध अजगर पहायला मिळेल म्हणून !

पण तिथं जायचा योग आला नाही. दोन दिवसानंतरच्या टाईम्सच्या अंकात त्या प्रदर्शनाचा संपूर्ण वृत्तांत मला वाचायला मिळाला. त्या वृत्तांताच्याच कॉलममध्ये खालच्या बाजूला छापलेल्या बातमीकडे माझं नकळत लक्ष गेलं !

...१९५० साली भारताच्या जंगल खात्यातून सेवानिवृत्त झालेले एक श्रेष्ठ अधिकारी मि. रुडॉल्फ जोन्स हे इंग्लंडमध्ये स्थाईक झाले होते. नौरोबी येथे होत असलेल्या स्नेक पार्कच्या कामगिरीवर त्यांची नियुक्ती दोन वर्षांपूर्वीच झाली होती. त्यासाठी त्यांनी अविश्रांत मेहनत घेतली होती. योजना सप्टेंबरमध्ये पूर्ण होणार होती पण त्यापूर्वीच म्हणजे १५ ऑगस्टलाच त्यांचा मृत्यू झाला.

त्या छोटया बातमीमुळं मला मात्र उगाचच उदास उदास वाटलं ! ऐकलेला आणि थोडासा वाचलेला व्यक्तिपरिचय आज अचानकपणे संपुष्टात आला होता. □

पॅपिलॉन
पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | ग[illegible]तील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | को[illegible] आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १५ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १६ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १७ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १८ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| १९ | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २० | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |
| २१ | लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २० – ०० |

**आगामी**

| | |
|---|---|
| प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे / श्री. ग. माजगावकर |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे |
| सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आ.) |
| संध्याकाळ | गजानन जागीरदार (दु. आ.) |
| शतपावली | रवींद्र पिंगे (दु. आ.) |
| टॉलस्टॉय - एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे (दु. आ.) |
| मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**